
१८६५

म. ग्रं. सं. ठाणें
य
क्र. 9558

# कार्ल मार्क्स



## चरित्र आणि विचार

•

लेखिका : सरला कारखानीस

REFBK-0014527

पी. पी. एच. बुकस्टॉल
१९० बी, खेतवाडी मेन रोड, मुंबई ४.

४९५८५
चरित्र
७-९-६८
१४३७

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम.
अनुक्रम ४९५८५ वि: चरित्र
क्रमांक १४२१७ नों दि ७/९/६८

# कार्ल मार्क्स

## चरित्र आणि विचार

ग्रंथ संग्रहालय ठाणे
१४५२७

: लेखिका :

सौ. सरला कारखानीस

REFBK-0014527
REFBK-0014527

पी. पी. एच. बुकस्टॉल,
मुंबई ४.

दुसरी आवृत्ति
नोव्हेंबर, १९६५

●


किंमत : दोन रुपये

●

मुद्रक व प्रकाशक :
**व्ही. आर. बिरोडकर**
**मुद्रणस्थळ** : न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
१९० बी, खेतवाडी मेन रोड, मुंबई ४.
**प्रकाशनस्थळ** : पी. पी. एच. बुकस्टॉल,
१९० बी, खेतवाडी मेन रोड, मुंबई ४.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | बालपण व शालेय जीवन | ३ |
| २. | प्रेमसाफल्य | ४ |
| ३. | बर्लिनमधील पहिले वर्ष | ५ |
| ४. | हेगेलवादी तरुणांचे मंडळ | ७ |
| ५. | राजकीय जीवनाला प्रारंभ | ८ |
| ६. | संघर्षाचे पाच महिने | १२ |
| ७. | विवाह आणि मातृभूमींतून निर्गमन | १५ |
| ८. | जर्मन–फ्रेंच वर्ष–पत्रातील लेख | १६ |
| ९. | पॅरिसच्या " समाजवादी " वातावरणातील एक वर्ष आणि हद्दपारी | १९ |
| १०. | " पवित्र कुटुंब " मधील विचार | २२ |
| ११. | " जर्मन विचारप्रणालि " | २४ |
| १२. | " तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य " | २६ |
| १३. | " कम्युनिस्ट लीग " चा जन्म | २९ |
| १४. | " कम्युनिस्ट जाहीरनामा " | ३२ |
| १५. | युरोपमधील १८४८ च्या क्रांतीचे उठाव | ३४ |
| १६. | पुन्हा एकदा हद्दपारीची कुऱ्हाड | ३९ |
| १७. | क्रांती का थंडावली ? | ४२ |
| १८. | लुई बोनापार्टच्या लष्करी कटाचा अर्थ | ४४ |
| १९. | कोलोन कम्युनिस्ट खटल्याचा बोजवारा | ४७ |
| २०. | निर्वासित जीवनातील सत्वपरीक्षा | ४९ |
| २१. | राजकीय अर्थशास्त्राचे समालोचन | ५१ |
| २२. | भारतीय परिस्थितीचे समालोचन | ५४ |
| २३. | कामगारवर्गाच्या सर्वाधिकारी सत्तेसंबंधीचा सिद्धांत | ५६ |
| २४. | पुन्हा एकदा क्रांतीच्या लाटेवर | ५९ |
| २५. | " भांडवल " | ६० |
| २६. | आंतरराष्ट्रीय श्रमिकांची संघटना | ६४ |
| २७. | अखेरची दहा वर्षे | ६७ |
| २८. | उपसंहार | ७० |



कार्ल मार्क्स

# प्रास्ताविक

जगाच्या इतिहासात कार्ल मार्क्स हा एक अद्वितीय पुरुष होऊन गेला, असे त्याचे वर्णन केले तर ते बिलकूल अतिशयोक्तीचे ठरणार नाही, इतका मार्क्स मोठा आहे.

मार्क्सने निर्माण केलेले तत्त्वज्ञान आणि त्याने जगापुढे मांडलेली विचारसरणी " मार्क्सवाद " या नावाने ओळखली जाते. या मार्क्सवादी विचारसरणीने गेल्या शंभर वर्षांत कोणालाही आश्चर्य वाटावे इतका मोठा प्रभाव पाडला आहे.

मार्क्सवादी विचारसरणीच्या प्रभावाखाली जगात शेकडो संघटना निर्माण झाल्या, हजारो लढे लढविले गेले आणि अनेक क्रांतिकारक परिवर्तने झाली.

सोविएत युनियन, चीन व पूर्व युरोपमधील राष्ट्रांनी आपल्या सबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जीवनाचे तत्त्वज्ञान म्हणून मार्क्सवादाचा स्वीकार केला आहे.

अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स वगैरे भांडवलदारी विचारसरणीच्या राष्ट्रांचाही मार्क्सवादाशी फार निकटचा संबंध आहे. या राष्ट्रांचे सत्ताधारी मार्क्सवादाला कट्टर शत्रु मानतात आणि त्यांचे सर्व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जीवन मार्क्सवादाला विरोध करण्यावर आधारलेले असते. परंतु या राष्ट्रातील कामगार, शेतकरी व बुद्धिजीवि लोक यांचा मोटा व वाढता विभाग मार्क्सवादच मानतो आणि हे तत्त्वज्ञान आपल्या राष्ट्राचे तत्त्वज्ञान बनावे म्हणून तो कार्य करीत आहे.

याशिवाय आशिया–आफ्रिकेतील व मध्य पूर्वेकडील नवोदित राष्ट्रांमध्ये मार्क्सवादाबद्दल फार मोठी उत्सुकता असून, त्यांच्यावरही निरनिराळ्या प्रकारांनी मार्क्सवादाचा प्रभाव आहे.

थोडक्यात सांगायचे तर आज जगातील प्रत्येक व्यक्तीला, आणि विशेषतः सार्वजनिक व राजकीय क्षेत्रातील नेत्यांना मार्क्सवादाबद्दल आपले निश्चित मत बनवावे लागते आणि ते राष्ट्रासमोर मांडावे लागते. प्रत्येक राजकीय व राष्ट्रीय नेता एकतर मार्क्सवाद मानतो, त्याचे मार्गदर्शन विचारात घेतो आणि त्याप्रमाणे

राष्ट्राची उभारणी करण्यासाठी कार्य करतो; नाहीतर मार्क्सवादाचा धिक्कार करतो, त्याचे तत्त्वज्ञान चुकीचे असल्याचे सांगतो आणि आपल्या राष्ट्रीय जीवनावर मार्क्सवादाचा प्रभाव राहू नये म्हणून धडपड करतो. परंतु मार्क्सवादाबद्दल माहिती नसलेला, मार्क्सवादी विचारसरणीबद्दल निश्चित मते नसलेला, मोठा माणूस जगाच्या पाठीवर आढळणार नाही. आणि ही अवस्था आज मार्क्सच्या मृत्यूला ७६ वर्षे झाल्यानंतरची आहे. यावरून मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व, त्याचा प्रभाव व जिवंतपणा यांचा प्रत्यय येतो.

मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा जन्म झाल्यापासून भारतीय राजकारणावरही त्याचे परिणाम झालेले आहेत. परंतु तो एक स्वतंत्र व निराळा विषय आहे. आज या छोट्या पुस्तिकेत मराठी वाचकांना थोडक्यात मार्क्सची व त्याच्या विचारांची ओळख करून देण्यात येणार आहे. मार्क्सचे जीवन कसे होते, त्याचे व्यक्तिमत्व कसे होते, त्याच्या विचारसरणीचे स्वरूप काय आहे, भारताबद्दल त्याने कोणते विचार व्यक्त केले आहेत, इत्यादी संबंधीचे संक्षिप्त निवेदन वाचकांना या पुस्तिकेत मिळेल. मार्क्सवादाबद्दल अधिक अभ्यास करण्यापूर्वी प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी ह्या पुस्तिकेचा उपयोग होईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १४५२७

# कार्ल मार्क्सचे जीवन

## १. बालपण व शालेय जीवन

कार्ले मार्क्सचा जन्म ता. ५ मे १८१८ रोजी पश्चिम जर्मनीतील ऱ्हाईनलंड भागातील ट्रीयर शहरात झाला. त्याचे वडील एक यहुदी वकील होते. हे कुटुंब सुखवस्तु व सुसंस्कृत होते पण क्रांतिकारक मात्र नव्हते. त्याच्या आई वडिलांचा संसार अत्यंत सुखसमाधानाचा होता; त्यामुळे त्याचे बाल्य व शालेय जीवन आनंदात व निष्काळजीत गेले. आपल्या मुलावर सदोदित लक्ष्मीची कृपा रहावी अशी त्याच्या आईची मनीषा होती. तर मुलगा विद्वान् व्हावा आणि त्याने मानवजातीची सेवा करावी, अशी अपेक्षा त्याच्या वडिलांच्या मनात उत्पन्न झाली होती. मात्र त्याने स्वतःवर सरकारचा रोष ओढवून घ्यावा असे त्यांना कधीच वाटले नव्हते.

कार्ल ६ वर्षांचा असताना त्याच्या वडिलांनी यहुदी धर्माचा त्याग करून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. त्या काळी यहुदी व ख्रिश्चन समाजात बरीच तेढ होती; सरकारची कृपा ख्रिस्ती धर्माच्या पाठीशी होती आणि त्याचबरोबर ख्रिस्ती धर्म सामाजिक विचारांच्या दृष्टीने अधिक पुढारलेलाही होता. या दोन्ही कारणांमुळे हे धर्मपरिवर्तन घडून आलेले असावे. कार्लचे वडील आधीच उदारमतवादी होते; त्यात यहुदी धर्माच्या संकुचित वर्तुळातूनही ते बाहेर पडले, यामुळे कार्लला रूढिबद्धता व पुराणमतवाद यांविरुद्ध कधी झगडा करावा लागला नाही.

१८३५ च्या ऑगस्टमध्ये, वयाच्या १७ व्या वर्षी कार्लने ट्रीयरमधील शिक्षणक्रम पूर्ण केला. त्याच्या शालेय जीवनासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही. मात्र ग्रीक व लॅटिन ग्रंथातील अवघड परिच्छेदांचा अर्थ सहज सांगण्याइतके प्रभुत्व त्याने त्या भाषांवर मिळविले होते, अशी शिफारस त्याच्या गुरुवर्यांनी केलेली आढळते. अखेरच्या परीक्षेच्या वेळी त्याने दिलेल्या निबंधातील विचारांची खास स्तुती परीक्षकांनी केली आहे. निबंधाचा विषय होता– " व्यवसायाच्या निवडीसंबंधी एका तरुणाचे विचार." त्यात त्याने लिहिले होते, " आपल्याला

योग्य वाटणाऱ्या व्यवसायाची आपण नेहमीच निवड करू शकत नाही. आपण ठरविण्यापूर्वीच आपले समाजातील संबंध निश्चित झालेले असतात." पुढे जगप्रसिद्ध झालेल्या सिद्धांतांचे प्रतिबिंब बीजरूपाने या कल्पनेत उमटलेले पाहून आश्चर्य वाटते. याच निबंधात, "मानवजातीची निःस्वार्थी सेवा करणे हे आपले जीवनध्येय राहील," असा विचारही त्याने मांडला आहे. या तारुण्यसुलभ ध्येयवादाचेही त्याने किती कसोशीने पालन केले हे त्याच्या पुढील आयुष्यावरून दिसून येईल.

## २. प्रेमसाफल्य

कार्लने पुढील शिक्षणासाठी बॉन येथे रहावे आणि आणि वकील व्हावे असे त्याच्या वडिलांच्या इच्छेप्रमाणे ठरविण्यात आले. बॉनमध्ये तो एक वर्षभर राहिला पण वकिलीचा अभ्यास मात्र त्याने फारसा केला नाही. या काळात, पैशाच्या उधळपट्टीबद्दल व हिशोब व्यवस्थितपणाने न ठेवल्याबद्दल त्याला वडिलांनी रागारागाने पत्रे लिहिली होती.

वर्षाअखेर कार्लच्या जीवनातील एक अत्यंत महत्त्वाची घटना घडली; आयुष्यातील पहिली सफलता त्याने प्राप्त केली. त्याची बालपणापासूनची मैत्रीण जेनी व कार्ल यांनी एकमेकांजवळ परस्परांवरील प्रेमाची कबूली दिली आणि गुप्तपणे विवाहाच्या आणाभाका घेतल्या.

कार्ल मार्क्स व जेनी फॉं वेस्टफालेन यांचे हे प्रेम एक प्रकारे अत्यंत स्वाभाविक होते; कारण दोन गुणी व्यक्तींची ती परस्परांवरील अनुरक्ती होती, परंतु व्यवहाराच्या दृष्टीने हे प्रेमसाफल्य विलक्षण होते. जेनीचा जन्म बड्या सरदार घराण्यातील. तिच्या आईचे कुटुंब राजघराण्याशी संबंध सांगणारे. जेनी अत्यंत सौंदर्यवती, त्यामुळे तिच्यावर अनेक अमीरउमरावांची नजर होती. कार्लच्या वडिलांचा व जेनीच्या वडिलांचा घनिष्ट परिचय असला तरी कार्लच्या वडिलांना या घटनेमुळे प्रथम अत्यंत चिंता वाटली. आपल्या मुलाच्या "अनिश्चित व संकट-ग्रस्त" जीवनाशी जेनीने स्वतःला बांधून घेऊं नये, असे त्यांना वाटत होते. अर्थात् त्यांच्या कल्पनेपेक्षा कार्ल मार्क्सचे जीवन कितीतरी अधिक कष्टाचे ठरले आणि सुदैवाने त्या सर्व संकटांना हंसतमुखाने टक्कर देण्याइतके जेनीचे त्याच्यावरील प्रेमही सामर्थ्यशाली ठरले, ही गोष्ट निराळी. तेव्हा मात्र जेनीच्या आईवडिलांच्या नकळत या दोघांनी लग्नाचा निर्णय घेतला म्हणूनही कार्लचे वडील अस्वस्थ

झाले होते. परंतु या शंकाकुशंका लवकरच काहीशा दूर झाल्या. जेनीच्या वडिलांनी त्यांच्या विवाहाला मनापासून संमति दिली.

जेनीचे वडील लुडविग फॉं वेस्टफालेन यांची जेनीच्या जन्मानंतर दोन वर्षांनी ट्रीयरमध्ये सरकारी सल्लागार म्हणून नेमणूक झाली होती. ते अत्यंत स्वतंत्र विचारसरणीचे गृहस्थ होते. सरंजामदारी विचारप्रणालीला बाजूला सारून उदयास येत असलेल्या नव्या उद्योगपतींचे प्रतिनिधित्व करण्याची त्यांच्यात धमक होती. ते अत्यंत सुसंस्कृत होते. जेनीपेक्षा ४ वर्षांनी लहान असलेला कार्ल लहानपणापासून त्यांच्या घरी खेळला, वाढला. आणि या बुद्धिमान मुलाबद्दल त्यांच्या मनात आपलेपणा निर्माण झाला. होमरच्या कविता आणि शेक्सपिअरची बहुतेक नाटके त्यांना पाठ होती. त्यांच्या घरात साहित्य व शिक्षणाचे सुंदर वातावरण होते; त्याच्या आकर्षणाने तेथे रममाण झालेला कार्ल त्यांच्या घरचाच बनला होता. पुढे या धनसंपन्न पण उदार मनाच्या पित्याने आपल्या कन्येच्या इच्छेला मनापासून संमति दिली. त्यांचे व कार्लचे संबंध अखेरपर्यंत जिव्हाळ्याचे राहिले. कार्ल त्यांना " पितृतुल्य मित्र " मानीत असे.

या वेळी कार्ल १८ वर्षांचा होता. जेनीबरोबर प्रेमाच्या आणाशपथा झाल्या असल्या तरी विवाहाला अद्याप खूप अवकाश होता. अद्याप त्याला शिक्षण पूर्ण करावयाचे होते. यापुढचे शिक्षण त्याने बर्लिनला जाऊन पूर्ण करावे, असा त्याच्या वडिलांनी निर्णय दिला. त्यांनी ही गोष्ट मुद्दाम केली असली तरी जेनीपासून झालेली ही ताटातूट कार्लला बरीच जाणवली; वडिलांनी मोठ्या मिनतवारीने तिच्याबरोबर पत्रव्यवहार करण्यास अनुमती दिली होती.

## ३. बर्लिनमधील पहिले वर्ष

१८३७ च्या नोव्हेंबरमध्ये कार्लने वडिलांना लिहिलेल्या एका पत्रात बर्लिनमधील पहिल्या वर्षातील घडामोडींचा अहवाल अत्यंत स्पष्टपणे मांडला आहे. यावरून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे बरेच दर्शन होते. ज्ञानाची दुर्दम्य लालसा, अविरत श्रम करण्याची शक्ती आणि लढाऊ कणखर बाणा हे त्याचे गुण या काळात विकसित होत होते.

या वर्षात त्याने कायद्याचा, तत्त्वज्ञानाचा व इतिहासाचा अभ्यास केला; पण कॉलेजच्या प्राध्यापकांची व्याख्याने ऐकून नव्हे. तेथे फक्त आवश्यक तेवढ्या व्याख्यानांनाच तो उपस्थिती लावीत असे. खरा अभ्यास त्याने स्वतंत्रपणानेच

केला. या रीतीने त्याने जे ज्ञान मिळविले ते प्राध्यापकांची व्याख्याने ऐकून १० वर्षांतही मिळाले नसते.

बर्लिनमधील पहिले काही महिने त्याने प्रेमकाव्ये लिहिण्यात घालविले. त्याने तीन वह्या भरून कविता लिहिल्या, आणि १८३६ च्या डिसेंबरमध्ये त्या जेनीला पाठवून दिल्या. या कवितांबद्दल वर्षभरातच त्याने अनादर व्यक्त केला असला तरी त्या वाचून जेनीला धन्यता वाटली आणि प्रेमाश्रूंनी तिने त्याचे स्वागत केले यात कोणते आश्चर्य?

अर्थात् त्याने आपला सर्व वेळ काही काव्य-लेखनात घालविला नाही. त्याने ग्रीक कायदेपंडितांचे ग्रंथ वाचून काढले, त्यातील काहींचे जर्मन भाषेत भाषांतर केले, मग स्वतःच कायद्याच्या तत्त्वज्ञानासंबंधी स्वतंत्र ग्रंथ लिहावयास घेतला. हे कार्य यशस्वी होणार नाही हे लक्षात येताच त्याने तत्त्वज्ञानाच्या सिद्धांतासंबंधी नवा ग्रंथ लिहायला घेतला. त्यातील व्यर्थता लक्षात आल्यानंतर त्याने व्याकरणाच्या पुस्तकांच्या सहाय्याने इंग्रजी व इटालियन भाषांच्या अभ्यासाला प्रारंभ केला. तेही विशेष जमले नाही. दरम्यान त्याने जर्मन, ग्रीक व लॅटिन भाषांतील शेकडो पुस्तके वाचली. ती वाचताना त्यांचा संक्षिप्त गोषवारा लिहून काढावयाचा आणि त्यांच्यावरील आपले अभिप्राय लिहून ठेवावयाचे अशी त्याची वाचनाची पद्धत होती. या पद्धतीने त्याने इतिहास, तत्त्वज्ञान व कला या विषयांवरील कितीतरी पुस्तकांचे संक्षिप्त अनुवाद केले आहेत. अशा रीतीने, त्याच्या स्वतःच्या शब्दात वर्णन करावयाचे म्हणजे, त्याने या काळात, "अनेक रात्री जागून काढल्या; अनेक लढाया केल्या आणि नाना प्रकारच्या आंतरिक व बाह्य प्रेरणा मिळविल्या."

या सर्व परिश्रमाचा परिणाम त्याच्या प्रकृतीवर होऊन, बर्लिनजवळच्या स्ट्रालाइ या खेड्यात राहून विश्रांती घेण्याची त्याच्यावर पाळी आली. पण लौकरच तो पूर्ववत् बरा झाला आणि कॉलेजच्या दुसऱ्या सहामाहीतही त्याने पुनश्च धुमधडाक्याने लेखन व मनन चालू ठेवले; आणि याच क्रमात हळुहळु त्याचे लक्ष हेगेलच्या तत्त्वज्ञानावर केंद्रित होऊ लागले.

हे परिवर्तन आणि मानसिक व बौद्धिक संघर्ष वडिलांना समजावून सांगण्यासाठी ट्रीयरला जाऊन त्यांना भेटण्याची कार्लला अत्यंत उत्कट इच्छा झाली आणि वर उल्लेख केलेल्या पत्रात त्याने ती व्यक्त केली. परंतु या तळमळीचा अर्थ त्याच्या वडिलांना तेवढासा कळला नाही; त्यांना वाटले, प्रेमविव्हल

तरुणाचा हा कमकुवतपणा आहे. म्हणून हे मनोदौर्बल्य व बालिशपणा टाकून देण्याचा, लक्ष्मीधराप्रमाणे चाललेला पैशाचा अपव्यय थांबविण्याचा आणि आयुष्यात शिस्त निर्माण करण्याचा त्यांनी त्याला उपदेश केला आणि घरी येण्यास परवानगी दिली नाही. कार्लने अत्यंत दु:खित मनाने त्यांची आज्ञा पालन केली आणि मनाचा निश्चय करून, वडिलांची परवानगी असताही, त्यानंतरच्या सुट्टीतही तो घरी गेला नाही. ज्ञानार्जनाच्या धुंदीत व पैशाबद्दल बेफिकीर असणाऱ्या आपल्या मुलाला वडिलांनी जरी कठोर मनाचा म्हणून त्याची निर्भत्सना केली असली तरी या गुणांच्या जोरावरच पुढे त्याने सर्व जगातील दु:खीकष्टी मानवजातीवरील प्रेमाचे तत्त्वज्ञान विकसित केले. परंतु कार्लच्या वडिलांना मात्र दुर्दैवाने ते दिवस पहावयाला मिळाले नाहीत. वर उल्लेख केलेल्या घटनेनंतर थोड्याच दिवसांनी, काही काळ आजारी असलेले त्याचे वडील, दुखण्याचा जोर होऊन १० मे १८३८ रोजी एकाएकी मरण पावले. कार्लचे वडिलांवर अत्यंत प्रेम होते आणि त्याच्या हृदयात त्यांची आठवण आमरण ताजी राहिली.

## ४. हेगेलवादी तरुणांचे मंडळ

वडिलांच्या मृत्यूनंतरही कार्लने तीन वर्षे बर्लिनमध्येच अभ्यास करण्यासाठी घालविली. या काळात तो हेगेलच्या तत्त्वज्ञानाने पूर्णपणे भारला गेला. हेगेलवादी तरुणांच्या गटात शिरून तो त्यांच्यातील एक प्रमुख बनला.

या तीन वर्षांत त्याचा वैचारिक पिंड तयार झाला. हा काळ त्याने ज्या मंडळीत घालविला त्यात बर्लिन विश्वविद्यालयातील शिक्षक, अध्यापक व अनेक लेखक होते. यावेळी मार्क्स केवळ २० वर्षांचा होता आणि या विद्वान मंडळी-कडून त्याला पुष्कळच शिकता येण्यासारखे होते आणि ते तो शिकलाही. पण गंमत म्हणजे थोड्याच दिवसांत तो या मंडळाचा मध्यबिंदु बनला आणि त्याच्यापेक्षा १०–१२ वर्षांनी मोठे असलेले कोपेन, ब्रूनो बॉयर, आर्नोल्ड रूगे यांच्यासारखे विद्वान विचारवंत त्याच्या मैत्रीची व सहकार्याची अपेक्षा करू लागले.

या तरुण हेगेलवाद्यांनी "हालिशे यारब्यूशर" (हाले वार्षिकपत्र) या नावाचे मुखपत्र चालविले होते. त्यात साहित्य व तत्त्वज्ञानासंबंधी लेख प्रसिद्ध होत असत. जुन्या (अगर सुधारणावादी) हेगेलवाद्यांचे मुखपत्र "बर्लिन वार्षिकपत्र"

याबरोबर वैचारिक संघर्ष सुरू करण्याच्या इच्छेने आर्नोल्ड रूगे या क्रांतिकारकाने हे पत्र सुरू केले होते. त्यात त्याने स्ट्राउससारख्या प्रभावी लेखकांना लेख लिहिण्यास संधी दिली. हेगेलचा भौतिक–विकासाचा सिद्धांत धर्माच्या कल्पनेला व विशेषत: ख्रिश्चन धर्माच्या सिद्धांताला लावून स्ट्राउसने एका नव्या विचार–धारणेला चालना दिली. येशू ख्रिस्ताच्या जीवनातील घडामोडींचा विचार ऐतिहासिक दृष्टिकोनातून झाला पाहिजे असे त्याने प्रतिपादन केले आणि त्यानुसार बायबलमधील गोष्टींना व ख्रिस्ताच्या जीवनातील चमत्कारांना साध्या ( मानवी जीवनातील ) घटना लेखून त्याने त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. या त्याच्या प्रबंधामुळे सर्व समाजात फार मोठी खळबळ उडाली.

या वेळेपर्यंत प्रशियाचे सरकार हेगेलवादी विचारसणी प्रमाणभूत मानीत असे. व्यक्तीपेक्षा राज्यसत्ता श्रेष्ठ आहे, असे मत हेगेलने मांडलेले असल्यामुळे हेगेलवादाला राज्याश्रय होता. विद्यापीठातून हेगेलच्या तत्वज्ञानाचा खास अभ्यास होत असे. तरुण हेगेलवादी ब्रूनो बॉअर यासही १८३९ मध्ये बॉन विश्वविद्यालयात अध्यापकाची जागा मिळाली होती आणि पुढील वर्षी तो बर्लिन विश्वविद्यालयात प्राध्यापक होणार होता. परंतु " वार्षिक पत्रिकेत " त्याने लिहिलेल्या लेखाच्या परिणामी परिस्थिती बरीच बदलली.

स्ट्राउसने बायबलमधल्या चमत्कारांना साध्यासुध्या घडामोडी लेखून त्यांचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न केला होता. परंतु ब्रूनो बॉअरने आपल्या लेखात लिहिले की, बायबलमधील सर्व गोष्टी साफ खोट्या आहेत आणि लोकांना फसविण्यासाठी मुद्दाम त्या बनविण्यात आलेल्या आहेत. हा लेख प्रसिद्ध होताच सरकारच्या शिक्षणखात्याची त्याच्यावर नाराजी झाली. ही ( डावी ) हेगेलवादी मंडळी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने क्रांतिकारक मतांची असली तरी राजकीयदृष्ट्या अत्यंत राजनिष्ठ होती. तरीसुद्धा त्यांनी धर्मासंबंधी स्वतंत्र विचार मांडण्यास प्रारंभ करताच सरकारी नोकरीतील त्यांचे स्थान हिरावून घेण्यासही आरंभ झाला. या घटनेचा मार्क्सच्या जीवनावर फार मोठा परिणाम झाला.

आपल्या मित्राप्रमाणेच विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम करण्याचे मार्क्सने ठरविले होते, पण ते स्वप्न आता दूर गेलेले दिसू लागले. तरीसुद्धा अखेरचा प्रयत्न म्हणून, "तत्त्वज्ञानाचा डॉक्टर" ही पदवी प्रशियाच्या बाहेरच्या विद्यापीठातून मिळवून नंतर तिच्या आधारावर बॉन विश्वविद्यालयात स्वतंत्र प्राध्यापकाची जागा मिळविण्याचा त्याने बेत केला. त्याप्रमाणे त्याने " डेमॉक्रिटस

व एपिक्युरिअस यांच्या तत्त्वज्ञानातील फरक " या विषयावर प्रबंध लिहून येना विद्यापीठाची डॉक्टरची पदवी १८४१ साली संपादन केली.

प्राचीन ग्रीक शास्त्रज्ञात डेमॉक्रिटस हा जवळजवळ पूर्णपणे भौतिकवादी होता. कोणताही पदार्थ अभावांतून (शून्यामधून) निर्माण होत नाही; कोणत्याही पदार्थांचा संपूर्णपणे नाश होत नाही; अणू–परमाणू व आकाश यांच्याखेरीज जगात (आत्मा, ईश्वर वगैरे) काहीही अस्तित्वात नाही; जगातील सर्व पदार्थ अणू-परमाणूंच्या वियोग-संयोगातून निर्माण होतात, असे डेमॉक्रिटसचे मत होते. त्याचे हे सर्व तत्त्वज्ञान मान्य करून एपिक्युरिअसने मांडले होते की, डेमॉक्रिटस म्हणतो त्याप्रमाणे, पृथ्वीवर येताना अणू सरळ रेषेत येत नाहीत, अलग होऊन वेडेवाकडे, निरनिराळ्या प्रकारांनी येतात; त्यामुळे जगात निरनिराळ्या प्रकारचे व्यक्तिमत्व निर्माण होते. वक्र अणू–पतनाच्या या कल्पनेचा त्या काळातही फार उपहास झाला आणि आजच्या शास्त्रीय दृष्टीनेही ती चुकीची आहे. परंतु मार्क्सने मात्र तिच्यावरून हा अर्थ काढला की, एपिक्युरिअस डेमॉक्रिटसच्या पुढे गेला आहे, कारण त्याने व्यक्ती–स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. या प्रबंधात मार्क्सने मांडलेली मते एकतर हेगेलच्या अध्यात्मवादाच्या प्रभावाखाली मांडली गेलेली आहेत. शिवाय एपिक्युरिअसने मांडलेल्या आत्म-चेतनेच्या तत्त्वाचाही स्वतंत्र वृत्तीच्या मार्क्सवर फार मोठा प्रभाव पडला. प्रबंधाच्या अखेरीस त्याने तत्त्वज्ञानाच्या जगातील महान संत व हुतात्मा प्रोमेथिअस याचे उतारे दिले आहेत. प्रोमेथिअस देवदूतांना म्हणतो, " माझ्या दुःखमय जीवनाच्या ऐवजी तुमचे हीन दास्याचे जीवन मी कधीच स्वीकारणार नाही. "

स्वतंत्रपणे विचार करण्याची ताकद, स्वातंत्र्यलालसा व लढाऊ बाणा या मार्क्सच्या गुणांचे दर्शन याही प्रबंधांत होते. त्याची भाषाही अत्यंत प्रभावी व प्रगत झालेली आढळते. त्या काळच्या विचारवंत लेखकांत मार्क्सचा क्रमांक फार वरचा असल्याचे या त्याच्या प्रबंधावरून दिसून येते.

## ५. राजकीय जीवनाला प्रारंभ

मार्क्सने उच्च पदवी मिळविली पण तो प्राध्यापक काही होऊ शकला नाही. ब्रूनो बॉअरलाच शिक्षकाच्या जागेवरून काढून टाकण्यात आले; त्यामुळे प्रबंध प्रसिद्ध करून शिक्षणखात्यात शिरण्याची कल्पना मार्क्सने अजिबात सोडून दिली.

याच सुमारास वर्तमानपत्रांच्या सेन्सॉरशिपबद्दलचे नवे हुकूम प्रशियाच्या राजाने काढले आणि त्यामुळे रूगेला १८४१ चे आपले वार्षिक-पत्र प्रसिध्दीपूर्वीच

सेन्सॉरच्या स्वाधीन करावे लागले. तेव्हा त्याने " डॉयत्शे यारब्यूशर " ( जर्मन वार्षिक-पत्र ) ड्रेस्डेनहून प्रकाशित केले. त्यात " अखेरचे हुकुमाचे पान " या नावाचा टोपण नावाखाली लिहिलेला एक लेख प्रसिद्ध झाला. एपिक्युरिअसच नव्हे तर हेगेलही संपूर्णपणे निरीश्वरवादी होता, असे हेगेलचे उतारे देऊन त्यात सिद्ध करून देण्यात आलेले होते. त्याच्या प्रकाशनाने सर्वत्र फार मोठी खळबळ माजली. त्या लेखाचा लेखक ब्रूनो बॉअर हाच होता. आपल्या लेखातील विचारसूत्र पुढे चालू ठेऊन, ते हेगेलच्या सौंदर्यशास्त्राला व कायदेशास्त्राला लागू करण्याचे कार्य मार्क्सच्या मदतीने पूर्ण करावे असे त्याने ठरविले आणि तसे मार्क्सला कळविले. इतक्यात सरकारने वार्षिकपत्र जप्त केले.

याच सुमारास मार्क्स आजारी पडला आणि तीन महिने अंथरूणाला खिळून असलेले जेनीचे वडील मरण पावले. त्यामुळे मार्क्सच्या हातून फारसे लेखन झाले नाही. तरीसुद्धा, सेन्सॉरशिपसंबंधीच्या नव्या कायद्यावर कडक टीका करणारा विस्तृत लेख त्याने रूगेकडे प्रसिद्धीसाठी पाठविला; अर्थातच सेन्सॉरने तो प्रसिद्ध होऊ दिला नाही. तेव्हा सेन्सॉरने प्रसिद्ध होऊ न दिलेल्या अशा लेखांचा संग्रह स्वित्झरलंडमधून प्रसिद्ध करण्याचे रूगेने ठरविले आणि तसे त्याने मार्क्सला कळविले. दरम्यान, मार्क्सने लिहिलेला " खिश्चन कला " हा लेखही प्रसिद्ध करण्यास सेन्सॉरने परवानगी दिली नाही; त्यामुळे रूगेने आपले वार्षिकपत्र नाव बदलून झुरिचहून " अनेक्डोटा " नावाने प्रसिद्ध करायचे ठरवून त्यात या लेखाचा समावेश करावयाचे ठरविले. परंतु मार्क्सने आपला लेख पुन्हा नव्या पद्धतीने लिहावयास घेतला आणि वार्षिकपत्राच्या प्रकाशनापर्यंत तो काही रूगेकडे पाठवू शकला नाही. लिहिता लिहिता त्या लेखाचा एक ग्रंथच बनला होता.

सेन्सॉरशिपच्या नव्या कायद्यावरील लेख लिहिल्यापासून मार्क्सचे लक्ष आता केवळ तात्त्विक विषयापेक्षा राजकीय विषयावर अधिक आकृष्ट होऊ लागले होते. त्याने कोलोनहून प्रसिद्ध होणाऱ्या " ऱ्हाईनिशे त्सायटुंग " या वर्तमानपत्रात स्तंभलेखक म्हणून प्रचलित घडामोडीवर लेख लिहिण्यास प्रारंभ केला.

" ऱ्हाईनिशे त्सायटुंग " हे ऱ्हाईनलंडच्या उगवत्या भांडवलदारांचे मुखपत्र. राष्ट्रीय स्वातंत्र्य व आर्थिक विकास या संबंधीच्या मागण्या त्यातून मांडण्याची त्यांची इच्छा होती, सरकारला विशेष विरोध करण्याची त्यांची तयारी नव्हती. परंतु वर्तमानपत्र लोकप्रिय होण्यासाठी सरकारवर सौम्य टीका करण्याच्या धोरणाला

त्यांचा विरोध नव्हता. वर्तमानपत्राच्या संपादक-मंडळावर त्यांनी नियुक्त केलेल्यांपैकी बरेचजण डाव्या हेगेलवादी विचारसरणीचे होते.

त्यावेळी ऱ्हाईनलंडची स्वतंत्र विधानसभा होती. या विधानसभेच्या वर्षभरातील बैठकीच्या कामकाजाचा परामर्श घेण्यास मार्क्सने प्रारंभ केला.

पहिल्या लेखात त्याने विधानसभेच्या सदस्यांच्या "पडदानशीन" वृत्तीचा व ढोंगबाजीचा खरपूस समाचार घेतला. विधानसभेच्या बैठका गुप्तपणे होत असत. याचा सर्वसाधारण नागरिकांना अत्यंत तिटकारा वाटत असे. कारण आपल्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर कोणत्या प्रतिनिधीने कोणती बाजू घेतली हे त्यांना समजत नसे. म्हणून त्यांनी सह्यांची मोहीम करून मागणी केली की, विधानसभेची अधिवेशने सर्वांना खुली असावीत, तिच्या कामकाजासंबंधीचे संपूर्ण अहवाल प्रसिद्ध करण्यात यावेत आणि त्याच्यावर चर्चा करण्याचा सर्व नागरिकांना हक्क असावा. लोकमत लक्षात घेऊन प्रशियाच्या राजानेही नावे न घालता अहवाल प्रसिद्ध करण्याच्या सूचनेला पाठिंबा दिला आणि ती सूचना विधानसभेकडे पाठवून दिली. परंतु तिच्या सभासदांनी मात्र ती उधळून लावली. या त्यांच्या वृत्तीवर मार्क्सने या पहिल्या लेखात चांगलेच कोरडे ओढले आहेत. वृत्तपत्र-स्वातंत्र्यासंबंधीचे या लेखातील परिच्छेद अत्यंत ओजस्वी व तिखट आहेत. ऱ्हाईन नदीच्या तीरावरच्या द्राक्षाच्या मळ्यात, वसंत ऋतुतील सूर्यकिरणे खेळत असल्याचे दृश्य नजरेसमोर उभे करणारे स्वतंत्र व सुखसंपन्न मातृभूमीचे अद्वितीय वर्णन त्याने या लेखात केले आहे.

दुसरा लेख त्याने "आर्च बिशप प्रश्नावर" लिहिला. कोलोनच्या कॅथॉलिक धर्मगुरूला सरकारने बेकायदेशीरपणाने अटक केली होती. त्याच्यावरचे आरोप कायदेशीरपणाने सिद्ध करावेत आणि तत्पूर्वी प्रथम त्याची सुटका व्हावी अशी मागणी मार्क्सने केली. हाही लेख सेन्सॉरच्या कात्रीतून सुटू शकला नाही.

त्यानंतर मार्क्सने पाच लेखांची एक लेखमाला लिहिण्यास प्रारंभ केला.

त्यातील पहिले दोन लेख त्याने जंगलातील लाकूडफाट्याच्या चोरीसंबंधीच्या विधेयकावर तेव्हा विधानसभेत चालू असलेल्या चर्चेवर लिहिले, आणि तिसरा, तुकडेतोडीला बंदी घालण्यासंबंधीच्या विधेयकावर लिहिला. हे प्रश्न तेव्हा अत्यंत सार्वजनिक बनले होते. १८३६ साली प्रशियातील न्यायालयात दाखल झालेल्या २,०७,४७८ गुन्हेगारी तक्रारींपैकी १,५०,००० तक्रारी लाकूडतोडी वगैरे संबंधीच्या होत्या. वास्तविक ऱ्हाईनलंडचा उगवता भांडवलदारवर्ग आणि

जर्मनीतल्या सरंजामदारी व्यवस्थेतील सामुदायिक मालकीचे अवशेष यांच्या संघर्षातून निर्माण झालेले हे प्रश्न होते. अशा प्रश्नांवर लिहिण्यात मार्क्स अद्याप प्रविण झाला नव्हता. तरीसुद्धा राजकीय अगर सामाजिक हक्क नसलेल्या भूमिहीन लोकांची बाजू घेऊन त्याने जमीनदारांवर हल्ला चढविला. गरीबांना न्याय मिळाला पाहिजे या भावनेने लेखात मुद्दे मांडण्यात आलेले आहेत. अर्थशास्त्रावर आधारलेल्या विवेचन–पद्धतीचा अंगिकार त्याने अद्याप केला नसल्याचे या लेखावरून दिसून येते. तुकडेतोडीच्या प्रश्नावर मार्क्सचे म्हणणे होते की शेतकऱ्यांच्या आपल्या जमिनीचे तुकडे पाडण्याच्या हक्कावर बंदी घालण्यात येऊ नये. हे मत ऱ्हाईनलंडच्या भांडवलदारांच्या मतांशी इतके मिळतेजुळते होते की, बंदी बसविण्यासंबंधी सरकारने पाठविलेली सूचना ऱ्हाईनलंड विधानसभेने पार उधळून लावली.

मार्क्सने लिहिलेल्या या लेखाचा वृत्तपत्राच्या चालकांवर फारच अनुकूल परिणाम झाला आणि १८४२ च्या ऑक्टोबरमध्ये मार्क्सला "ऱ्हाईनिशे त्सायटुंग"चे संपादकपद बहाल करण्यात आले.

स्वतंत्र रीतीने वर्तमानपत्र चालविण्याची पहिली संधी अशा रीतीने मार्क्सला मिळाली.

## ६. संघर्षाचे पाच महिने

मार्क्स "ऱ्हाईनिशे त्सायटुंग" चा ५ महिने संपादक होता. या पाच महिन्यांत अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडल्या.

मार्क्सच्या सतत अभ्यासू वृत्तीला "साम्यवादा" (कम्युनिझम) संबंधी अधिक खोलवर अभ्यास करण्याची आवश्यकता भासावी असा प्रसंग अगदी प्रारंभीच आला. या वृत्तपत्रामध्ये घरांच्या व इतर सामाजिक प्रश्नासंबंधी अहवाल प्रसिद्ध करण्यात आले आणि त्यावर काही संपादकीय अभिप्राय देण्यात आले होते. त्याच्या आधारावर एका वर्तमानपत्राने, "त्सायटुंग" साम्यवादी बनत चालले आहे, अशी टीका केली. संपादक या नात्याने या टीकेला तात्पुरते उत्तर लिहिण्याचे काम मार्क्सने करून टाकले; पण त्याचे समाधान झाले नाही. त्याने या विषयाचा नीट अभ्यास करण्याचा निश्चय केला.

याचवेळी, मार्क्सचे बर्लिनमधील डावे हेगेलवादी मित्र व सहकारी ब्रूनो बॉअर वगैरेंबरोबर त्याचे भांडण झाले. स्वतःला कट्टर व्यक्तिस्वातंत्र्यवादी म्हणविणारे

हे लोक बर्लिनमध्ये अगदी बेजबाबदारपणाने व अनिरुद्ध स्वातंत्र्याने वागू लागले होते. आणि त्यामुळे मार्क्सकडे त्यांनी पाठविलेले लेखही खालच्या दर्जाचे येऊ लागले. इतक्यात, राज्यसत्ता, खाजगी मालमत्ता व कुटुंब पद्धती ताबडतोब मोडून-तोडून टाकावी या ब्रूनो बॉअरच्या प्रचाराला उत्तर देणारे रूगेने काढलेले निवेदन मार्क्सने आपल्या पत्रातून प्रसिद्ध केले. या निवेदनात म्हटले होते, " हे व्यक्तिस्वातंत्र्यवादी लोक वैयक्तिकदृष्ट्या चांगले असले तरी राजकीयदृष्ट्या केवळ रोमँटिक आहेत. त्यामुळे त्यांच्या वागण्याने व विचारांनी प्रगतिकारक कार्याचे केवळ नुकसानच होते. " हे निवेदन 'त्सायटुंग' मध्ये आल्याबरोबर त्या लोकांनी मार्क्सवर उद्दाम व अपमानकारक पत्रांचा पाऊस पाडला. मार्क्सने प्रथम तिकडे लक्षच दिले नाही, परंतु अखेरीस या प्रश्नाचे पर्यवसान या गटाचे व मार्क्सचे राजकीय संबंध तुटण्यात झाले. त्यावेळी या सर्व लेखक मंडळींनी मार्क्सला " तडजोडवादी " म्हणून बदनाम करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणामुळे मार्क्सला त्यावेळी बराच त्रास झाला तरी अधिक नुकसान त्याच्या या बर्लिनच्या मित्रमंडळींचेच झाले, त्यांच्यापैकी बहुतेकांचा पुढे पुरोगामी राजकारणाशी संबंध राहिला नाही.

याचवेळी रूटेन्बर्ग प्रकरण निर्माण झाले; आणि त्यावेळीही मार्क्सने अत्यंत धिमेपणाने वर्तन केले. रूटेन्बर्ग हा महाक्रांतिकारक आहे असे समजून प्रशियाचा राजा त्याच्यावर फार जळफळत असे. प्रथमपासूनच मार्क्सच्या सूचनेप्रमाणे त्याला 'त्सायटुंग' च्या संपादकमंडळावर घेण्यात आलेले होते. या रूटेन्बर्गला १२ डिसेंबरपर्यंत संपादकमंडळावरून काढून टाकण्याचा राजाने हुकूम दिला. हा हुकूम कितीही उर्मटपणाचा असला तरी वर्तमानपत्र जिवंत ठेवण्यासाठी तो पाळावा, अशा मताला मार्क्सने अनुमती दिली. शिवाय रूटेन्बर्गच्या क्रांतिकारकपणाबद्दल मार्क्सला फारशी खात्री नव्हती. तेव्हा या अडचणीतून, 'त्सायटुंग'ला वाचविण्यासाठी व बर्लिनच्या मित्रमंडळाकडून ठपका दिला गेला तरी त्याची पर्वा न करता, मार्क्सने रूटेन्बर्गला बाहेर काढले.

पण खरी अडचण पुढेच आली. मार्क्सच्या संपादकत्वाखाली " ऱ्हाईनिशे त्सायटुंग "चा प्रभाव व लोकप्रियता सारखी वाढत होती. ऑक्टोबरमध्ये मार्क्स संपादक झाला त्यावेळी या पत्राचे ८८५ वर्गणीदार होते; नोव्हेंबरमध्ये ही संख्या १८३० वर गेली. याच सुमारास मोजेलच्या खोऱ्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर 'त्सायटुंग'मधून जी चर्चा झाली तिच्यामुळे ऱ्हाईनलंडच्या गव्हर्नराचा खोटेपणा

उघडकीला येऊन त्याची फटफजिती झाली आणि त्याने त्या वृत्तपत्रावर दात धरला. यामुळे 'ऱ्हायनिशे त्सायटुंग'वर प्रथम दुहेरी आणि नंतर तिहेरी सेन्सॉरशिप लादण्यात आली. इतकेच नव्हे तर पत्रावर बंदी घालण्याचा सरकारने जानेवारीत निर्णय घेऊन टाकला. ही बातमी बाहेर फुटताच पत्राच्या वर्गणीदारांची संख्या ३२०० पर्यंत वाढली आणि पत्रावर बंदी घातली जाऊ नये म्हणून हजारों अर्जांचा बर्लिनच्या कचेरीत पाऊस पडला. इतक्यात त्सायटुंगच्या चालकांनी चुकीचे पाऊल टाकून, वर्तमानपत्राचे स्वरूप सौम्य करण्याचे आश्वासन सरकारला दिले.

चालकांच्या या नव्या धोरणामुळे ता. १७ मार्च रोजी मार्क्सने संपादकपदाचा राजीनामा दिला. अशा रितीने मार्क्सच्या राजकीय जीवनातील हे पहिले पर्व समाप्त झाले; यावेळी मार्क्स २५ वर्षांचा होता.

मार्क्सच्या जीवनांतील पुढील पर्वाकडे नजर टाकण्यापूर्वी या काळातील आणखी एका घडामोडीची नोंद घेतली पाहिजे. मार्क्सच्या वैचारिक क्रांतीला या काळात फॉयरबॉखच्या लेखनाने फार मोठा हातभार लावला. "ख्रिश्चन धर्माचे सार" हा ग्रंथ १८४१ मध्ये प्रसिद्ध झाल्यापासून फॉयरबॉखच्या लेखनाकडे मार्क्स आकर्षित झाला होता. ह्या पुस्तकात फॉयरबॉखने हेगेलच्या तत्त्वज्ञानाची चिरफाड केली. त्याच्या "परमश्रेष्ठ कल्पने"चा धुव्वा उडविला आणि घोषणा केली की, "धर्माची स्थापना माणूस करतो, धर्म माणसाला निर्माण करीत नाही." परमेश्वराची (अगर परमतत्त्वाची) कल्पना हा मानवाच्या कल्पनाशक्तीचा विलास असून त्याच्या कल्पनेतील स्वस्वरूपाची ती लहान मूर्ती असते, असे मत फॉयरबॉखने स्पष्टपणे मांडले. या मतांची मार्क्सच्या विचारांवर चांगलीच छाप पाडली, विशेषतः भौतिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी हेगेलच्या तत्त्वज्ञानातून कोणतेच मार्गदर्शन मिळत नाही, असा अनुभव त्याला संपादक असताना आलेला असल्यामुळे तर तो या नव्या विचारांकडे फारच उत्साहाने वळला. या पुस्तकाच्या वाचनाने त्याला नवी चेतना मिळाली पण त्याच्या कुशाग्र बुध्दीला त्यातील उणीवाही ताबडतोब समजल्या. हेगेलच्या निसर्गशास्त्राचा व धर्मशास्त्राचा जसा परामर्श फॉयरबॉखने घेतला होता तसा त्याला त्याच्या राज्यशास्त्राचा व कायदे-शास्त्राचा घेता आलेला नव्हता. मार्क्सने संपादकीय कामातून मुक्त होताच हे कार्य पूर्ण करण्याचा निश्चय केला.

"ऱ्हाइनिशे त्सायटुंग"चा राजीनामा द्यावा लागल्यानंतर, यापुढे जर्मनीत राहून स्वतंत्र, प्रगतिकारक विचारांचा पुरस्कार करता येईल ही आशा मार्क्सच्या

मनातून नष्ट झाली. तेव्हा त्याने जर्मनीबाहेर जाण्याचा, त्या काळच्या इतर क्रांतिकारकांप्रमाणे मायभूमीबाहेर राहून काम करण्याचा निर्णय घेतला.

## ७. विवाह आणि मातृभूमींतून निर्गमन

जर्मनीबाहेर जाण्यापूर्वी विवाह करण्याचा आणि जेनीला बरोबर घेऊनच नव्या आयुष्याला प्रारंभ करण्याचा मार्क्सने निर्णय घेतला. त्याचा व जेनीचा वाङ्निश्चय होऊन आता ७ वर्षे झाली होती. या सात वर्षांत – आणि विशेषत: जेनीच्या वडिलांच्या मृत्यूनंतर आणि 'त्सायटुंग' मधून त्याला बाहेर पडावे लागले या मध्यंतरीच्या काळात–या दोघांना नाना प्रकारच्या कौटुंबिक त्रासांना तोंड द्यावे लागले. जेनीचे संपन्न कुटुंब आता राजनिष्ठही बनले होते; त्यामुळे तिच्या भावांचा वगैरे ह्या विवाहाला आणि मार्क्सच्या सर्व कृतींना संपूर्णपणे विरोध होता. त्यामुळे या काळात त्या दोघांनी पराकाष्ठेच्या मानसिक यातना सहन केल्या असतील; परंतु मार्क्सच्या अलौकिक स्वभावाचा असा एक गुण होता की आपल्या वैयक्तिक सुखदु:खांना तो कधी वाचा फोडीत नसे. उत्तर वयात जसा तो या बाबतीत नि:स्तब्ध राहिला तसाच तरुण वयातही तो संयमी होता. सामाजिक जीवनाचे हितचिंतन–ह्या विषयावरील त्याच्या क्रियाप्रतिक्रिया व विचार हीच त्या काळातही जगाला ज्ञात असलेली त्याच्या व्यक्तिमत्त्वाची बाजू होती. या ६–७ वर्षांत, आपल्या वैयक्तिक परिस्थितीचा सहकारी मित्रांजवळ त्याने फक्त दोन वेळा उल्लेख केला आहे आणि तोसुद्धा अगदी ओझरता.

तेव्हा सांगायचा मुद्दा इतकाच की सगळ्या अडीअडचणींना तोंड देऊन, ता. १८ जून १८४३ रोजी मार्क्सचा व जेनीचा विवाह झाला. अत्यंत भिन्न परिस्थितीत वाढलेली जेनी मार्क्सला सर्वस्वी अनुकूल व त्याच्या विचारध्येयाशी तन्मय झालेली होती. आणि म्हणूनच मार्क्सच्या भविष्यकालीन कष्टमय जीवनात ती एक मोठा आधार ठरली, हा काही योगायोग नव्हे. विवाहानंतरचे पहिले सहा महिने जेनीच्या आईच्या घरी राहून, १८४३ च्या डिसेंबरमध्ये ही तरुण पतिपत्नी आपल्या आवडत्या जन्मभूमीचा तात्पुरता निरोप घेऊन पॅरीसला निघून गेली.

"जर्मन-फ्रेंच वार्षिकपत्र" नावाचे नवे प्रकाशन पॅरिसहून रूगेच्या सहकार्याने प्रसिद्ध करण्याची सर्व योजना ठरवूनच मार्क्स पॅरीसला गेला. फ्रेंच जनतेचे क्रांतिकारक हृदय आणि जर्मन जनतेची प्रगतिकारक बुद्धी यांचा संगम या

वर्तमानपत्रात दिसला पाहिजे ही मार्क्सची कल्पना होती आणि ती कल्पना फॉयरबॉखच्या ग्रंथावरून स्फुरली होती. म्हणून फॉयरबॉखनेही " जर्मन-फ्रेंच वार्षिकपत्रा " वर काम करण्यासाठी पॅरीसला यावे असा मार्क्सने त्याला आग्रह केला; परंतु या अज्ञात सागरात उडी घेण्याची हिंमत त्याने केली नाही.

## ८. जर्मन-फ्रेंच वर्ष-पत्रातील लेख

इतक्या अपेक्षेने सुरू करण्यात आलेल्या " जर्मन-फ्रेंच वार्षिकपत्राचा " एकच द्विवार्षिक अंक १८४४ च्या फेब्रुवारीत प्रसिद्ध झाला. हाच पहिला व अखेरचा ठरला, याचे मुख्य कारण मार्क्स व रूगे या प्रमुख सहकाऱ्यांमध्ये मतभेदांना प्रारंभ झाला हे होते.

रूगे व मार्क्स यांच्यातील वैचारिक मतभेदांची थोडीशी चुणूक वार्षिक-पत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या " पत्रव्यवहारात " दिसून येते. मार्क्सच्या पत्राने सुरू करण्यात आलेल्या या पत्र–चर्चेत मार्क्सने मांडले होते की, क्रांतीचा काळ जवळ आला असून लोकांना एकत्र आणणाऱ्या नव्या तत्त्वज्ञानाची आवश्यकता आहे, ते आपण त्यांना दिले पाहिजे. मार्क्सने लिहिले आहे, " जगाला स्वतःच्या आशा-आकांक्षांची व संघर्षाची ओळख पटविण्यासाठी मदत करणे, हा आपल्या पत्राचा उद्देश असला पाहिजे. " हे मूल्यमापन रूगेला बिलकूल पसंत पडले नाही; जर्मन लोकांबद्दल आणि त्यांच्या भवितव्याबद्दल तो संपूर्णपणे निराश झालेला होता.

या वार्षिक-पत्रात मार्क्सने दोन लेख लिहिले; पहिला लेख होता–" हेगेलच्या कायदेशास्त्रावरील टीका. " फॉयरबॉखने हेगेलच्या धर्मशास्त्रावर टीका करून अर्धवट सोडलेले काम पूर्ण करण्यासाठी मार्क्सने हा लेख लिहिला.

फॉयरबॉखने हेगेलवर टीका करताना निष्कर्ष काढला होता की, " धर्माची स्थापना माणूस करतो, धर्म माणसाला निर्माण करीत नाही. " मार्क्सने पुढे जाऊन लिहिले की, माणूस कधी एकटा रहात नाही. माणूस म्हणजे मानवी जग, राज्यसत्ता, समाज; हे मानवी जग सध्या उलटेपालटे झालेले असल्यामुळे त्याच्या कल्पनाही उलट्यापालट्या झालेल्या दिसतात आणि म्हणूनच जगाने धर्म निर्माण केला म्हणण्याऐवजी धर्माने जग निर्माण केले असे सांगितले गेले आहे. धर्म हा या जगाचा सांस्कृतिक सुगंध आहे; म्हणून धर्मावर टीका केली तर ती या जगावरची टीका ठरते, धर्माविरुद्ध शस्त्र उपसले तर ते सबंध



मार्क्सची पत्नी - जेनी

" गृहिणी सचिवः सखी मिथः
प्रियशिष्या ... ... ... "

…ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४९५८५ वि: चरित्र
क्रमांक १२३६ दि. …१०।३।६

समाजावर उपसले जाते, धार्मिक कल्पनांवर हल्ला करून त्या नाहीशा करावयाच्या पण समाज आहे तसाच राहू द्यावयाचा ही गोष्ट अशक्य आहे.

परंतु जर्मनीत मात्र परिस्थिती बदलण्याचा हा संघर्ष तत्त्वज्ञानाच्या पायावरूनच केला पाहिजे; कारण इंग्लंड–फ्रान्सच्या मानाने राजकीयदृष्ट्या जर्मनी अत्यंत मागासलेला देश आहे. ते देश ७५ वर्षांपूर्वी जे राजकीय–आर्थिक प्रश्न सोडवीत होते ते जर्मनीत आज निर्माण होत आहेत.

इंग्लंड–फ्रान्समधील अर्थव्यवस्थेत भांडवलदारी व्यक्तिस्वातंत्र्याचा संपूर्ण विकास झाला असून तेथे आता सर्व संपत्तीवर समाजाचे नियंत्रण असावे किंवा नाही या प्रश्नावर झगडा चालू आहे; तर जर्मनीत अर्थव्यवस्थेवर अजून सरंजामशाहीचा पगडा असल्याकारणाने भांडवलदारी म्हणजे खाजगी मालमत्तेचे स्वातंत्र्य संपूर्णपणे विकसित करण्याचा झगडा सुरू आहे. एका ठिकाणी प्रश्नाची सरगाठ सुटायला आली आहे तर दुसऱ्या ठिकाणी अद्याप पहिली गाठ मारण्याचा प्रश्नच सुटलेला नाही.

परंतु राजकीय दृष्टीने जर्मनी मागासलेला असला तरी तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात तो फार पुढारलेला आहे. कारण हेगेलने कायदेशास्त्र व राज्यसत्ता यासंबंधी जे विवेचन केले आहे, त्यामुळे आजच्या पुढारलेल्या जगाच्या ज्वलंत समस्यांबद्दलचे विचार मांडले गेलेले आहेत. फॉयरबॉखने हेगेलची धर्माची कल्पना फोल ठरविली असली तरी त्यामुळे इंग्लंड–फ्रान्स यांच्या राजकीय टप्प्याची क्रांति जर्मनीत होऊ शकणार नाही. याचा अर्थ जर्मनीत अर्धवट स्वरूपाची म्हणजे केवळ राजकीय अशी क्रांति होऊ शकणार नाहीं.

जर्मनीत सबंध मानवजातीची मुक्तता करणारी क्रांति होऊ शकेल. ही क्रांति ज्याला आजच्या समाजात कोणतेही मानवी हक्क राहिलेले नाहीत, अशा एका वर्गाकडून होईल. हा वर्ग आज जर्मनीत उदयास येत आहे.

अशा रीतीने, तत्त्वज्ञानाने काढलेले निष्कर्ष खरे ठरण्यासाठी कामगारवर्गाची गरज लागते आणि कामगारवर्गाला क्रांति यशस्वी करण्यासाठी तत्त्वज्ञानाचा उपयोग हत्यार म्हणून करावा लागतो.

मार्क्सने तरुणपणी लिहिलेल्या श्रेष्ठ दर्जाच्या विचारप्रवर्तक लेखात या लेखाची गणना केली जाते. या लेखाची भाषा काहीशी शब्दावडंबर माजविणारी असली तरी लेखावरून मार्क्सच्या विचार–संपन्नतेची चांगलीच कल्पना येऊ शकते.

या वार्षिकपत्रात मार्क्सने लिहिलेला दुसरा लेख, ब्रूनो बॉअरने लिहिलेल्या "यहुदी लोकांचा प्रश्न" या लेखातील काही विचारांसंबंधी होता.

यहुदी लोक सर्व युरोपचे सावकार होते. धार्मिकदृष्ट्या ते अत्यंत कट्टर व अंधश्रद्धाळू होते. त्या काळात त्यांचा, ते यहुदी धर्माचे म्हणून सामाजिकदृष्ट्या छळ होत असे, त्यांना कोणतेही नागरिक हक्क नव्हते.

हेगेलवादी तरुण मंडळी धर्मावर टीका करीत तेव्हा खिश्चन धर्माप्रमाणेच यहुदी धर्मावरही प्रहार करीत. फॉयरबॉखने लिहिले होते की, "यहुदी धर्म हा अहंमन्यतेचा धर्म आहे." ब्रूनो बॉअरने या विचारांना उचलून धरले आणि सांगितले की, "यहुद्यांनी आजपर्यंत सर्व ऐतिहासिक प्रगतीला विरोध केलेला आहे. त्यांच्या धर्माने त्यांना कपटी बनविले असून मानवी समाजापासून अलग पाडले आहे. तेव्हा त्यांनी यहुदी धर्माचा त्याग केला तरच त्यांना मुक्ती मिळेल, नाहीतर मिळणार नाही. अर्थात मुक्त—स्वतंत्र—होण्यासाठी ख्रिश्चन लोकांनीही ख्रिश्चन धर्माचा त्याग करण्याची आवश्यकता आहेच; परंतु यहुदी धर्मियांनी प्रथम खिश्चन होऊन मग नंतर तोही धर्म टाकला पाहिजे."

ब्रूनो बॉअरच्या या लेखावर मार्क्सने लिहिलेल्या लेखालाही एका स्वतंत्र प्रबंधाचे स्वरूप प्राप्त झाले; कारण, राजकीय स्वातंत्र्य अगर मुक्तता आणि मानवी मुक्तता याबद्दलचे नव्या प्रकारचे, खोलवर विवेचन करणारे विचार त्या लेखात मार्क्सने मांडले.

मार्क्सने लिहिले की, आधुनिक राज्यसत्ता व्यक्तिस्वातंत्र्याच्या घोषणेवर उदयास आलेली आहे; तिच्यात सर्व धर्माच्या व व्यवसायांच्या लोकांना राजकीय हक्क देण्यात आलेले असतात. तेव्हा यहुदी लोकांनाही ख्रिश्चन लोकांप्रमाणेच ह्या राज्यव्यवस्थेत हक्क आहेत. परंतु त्याचा अर्थ त्यांना खरेखुरे स्वातंत्र्य–मानवी स्वातंत्र्य–प्राप्त झाले आहे, असा नव्हे. राजकीय स्वातंत्र्य व मानवी स्वातंत्र्य भिन्नभिन्न आहेत. आधुनिक राज्यव्यवस्थेचे सर्वांना सभासदत्व बहाल करणे हे राजकीय स्वातंत्र्य देणे होय; या राज्यव्यवस्थेमध्ये सर्वांना सामाजिक उन्नतीसाठी कार्य करता येणे म्हणजेच खरे व्यक्तिस्वातंत्र्य. आजच्या राज्यव्यवस्थेत यहुदी लोकांना राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झालेले आहे. त्यांना सामाजिक स्वातंत्र्य पाहिजे असल्यास ज्या सावकारी देवघेवीच्या आधारावर ते यहुदी बनले आहेत ती नष्ट झाली पाहिजे. म्हणजे ज्यावेळी आजच्या स्वरूपातला पैशांचा व्यवहार नष्ट करणारी क्रांति होईल तेव्हाच फक्त यहुदी लोकांचा प्रश्न सुटेल.

या लेखात मार्क्सने मांडलेल्या विचारात समाज व राज्यसत्ता (सरकार) यांचे संबंध प्रथमच स्पष्टपणे उघड झालेले आहेत. हेगेल म्हणतो त्याप्रमाणे, राज्यसत्ता म्हणजे नैतिकमूल्यांचे अधिष्ठान नसून, समाजातील भिन्नभिन्न, विरोधी व संघर्षात्मक प्रवृत्तींच्या व शक्तींच्या समूहांना एकत्र ठेवणारी शक्ती आहे, हा महत्त्वाचा निष्कर्ष मार्क्सने त्यात काढला आहे. आधुनिक सत्तेने माणसाला स्वातंत्र्य दिले म्हणतात, परंतु वास्तविक मानव खाजगी मालमत्ता, धर्म, अगर कावाडकष्ट यापासून मुक्त झाला नसून त्यांचा गुलाम बनला आहे, ही कल्पना मार्क्सने अत्यंत स्पष्टपणे मांडली आहे. मानवाच्या मुक्ततेसाठी त्याला जीवन देणाऱ्या सामाजिक शक्तींची नव्या पद्धतीने रचना केली पाहिजे, हा विचार मांडून मार्क्सने समाजवादी समाजरचनेच्या कल्पनांची नांदी गायली आहे.

हे दोन्ही लेख, कदाचित काहीशा कच्च्या स्वरूपात, मार्क्सने विवाहानंतर ऱ्हाईनलंडमध्ये घालविलेल्या सहा महिन्यतांच लिहिलेले असावेत. त्यांतील विवरण बहुश: तात्त्विक असले तरी मार्क्सच्या मनात आता सामाजिक–राजकीय तत्त्वज्ञानाची रूपरेखाही उमटू लागली होती; आणि पॅरिसच्या उत्साहवर्धक वातावरणात तिला लवकरच स्पष्ट स्वरूप प्राप्त झाले.

परंतु याच वेळी मार्क्सच्या व रूगेच्या वैचारिक प्रगतीत उत्तरोत्तर अंतर पडत गेले आणि त्यामुळे परिस्थितीतून निर्माण झालेल्या अडचणींना त्यांना एकमताने तोंड देता आले नाही. वार्षिक-पत्राच्या प्रसिद्धीसाठी करण्यात आलेली खर्चाची व्यवस्था कोलमडून पडली. शिवाय प्रशियाच्या सरकारने या क्रांतिकारकांचा पिच्छा सोडलाच नव्हता. १८ एप्रिल १८४४ रोजी प्रसिद्ध झालेल्या सरकारी हुकुमाप्रमाणे या वार्षिक-पत्राला राज्यद्रोही ठरवून त्याच्यावर बंदी घालण्यात आली. रूगे, मार्क्स, हेन्रिक हैने वगैरेंनीं प्रशियन प्रांतात पाऊल टाकले तर त्यांना अटक करण्याचे फर्मान काढण्यात आले. इतकेच नव्हे तर वार्षिक-पत्राच्या ३०० प्रती सीमा प्रदेशात पकडून जप्त करण्यात आल्या. अशा रीतीने आर्थिक हानी सहन करण्याची रूगेची बिलकूल तयारी नव्हती; त्यामुळे वार्षिक-पत्र पुन्हा प्रसिद्ध झाले नाही.

## ९. पॅरिसच्या "समाजवादी" वातावरणातील एक वर्ष आणि हद्दपारी

१८४५ च्या जानेवारीत मार्क्सला पॅरिसमधून हद्दपार करण्यात आले. मार्क्सने पॅरिसमध्ये घालविलेल्या या एका वर्षात अनेक नवे अनुभव, नवी स्फूर्ती, नवी

गती मिळविली. मार्क्स-एंगल्स यांच्या चिरकालीन स्नेहाचा व सहकार्याचा नंदादीपही याच वर्षभरात प्रज्वलित झाला. हीही या काळातील एक महत्त्वाची घटना म्हटली पाहिजे.

फ्रान्समधील भांडवलदारी क्रांतीच्या अग्रभागी असलेल्या पॅरिसमध्ये मार्क्सच्या लेखन-मननाला पुन्हा बहर आला. तारुण्याच्या उंबरठ्यावर बर्लिन-मधील प्रारंभीच्या दिवसाप्रमाणे तो आताही सतत वाचीत होता, सतत लिहित होता, लिहिलेले बाजूला ठेवीत होता, पुन्हा वाचन करीत होता, पुन्हा नव्या कल्पनांना शब्दरूप देत होता.

फ्रेंच (भांडवलदारी) क्रांतीच्या इतिहासाच्या अभ्यासाच्या अनुषंगाने त्याने मागे मागे जाऊन १३ व्या शतकापर्यंतच्या फ्रान्सच्या इतिहासाचा अभ्यास केला. या वाचनाने एक फार महत्त्वाची वस्तुस्थिती त्याच्या निदर्शनाला आली. फ्रान्सचा सर्व इतिहास भिन्न भिन्न वर्गांच्या लढ्यांचा इतिहास आहे, वर्ग-संघर्षाचा इतिहास आहे, हे त्याला स्पष्टपणे दिसून आले. फ्रेंच इतिहासकारांच्या या दर्शनामुळेच इतिहासाच्या घडामोडींच्या एका स्वरूपाची पक्की खूणगाठ मार्क्सच्या मनात बसली. या सत्याला मार्क्सवादी विचारसरणीत कसे महत्त्वाचे स्थान मिळाले ते पुढे दिसून येईलच.

जर्मन-फ्रेंच वार्षिक-पत्रात एंगल्सचा "राष्ट्रीय अर्थशास्त्रासंबंधी टीकात्मक आढावा" हा लेख प्रसिद्ध झाला होता. या लेखाच्या अनुषंगाने मार्क्सने अॅडाम स्मिथ व रिकार्डो यांच्या अर्थशास्त्राचा अभ्यास केला आणि भिन्नभिन्न वर्गांची आर्थिक रचना समजावून घेण्याचा प्रयत्न केला. या त्याच्या अभ्यासावर आधारलेल्या हस्तलिखित लेखनावरून त्याने भांडवल व कामगारांचे श्रम यासंबंधीचे पक्के विचार त्या वेळीच केले होते असे आढळून येते. भांडवल व नफा यांची सांगड मात्र घातली गेली नव्हती. सामाजिक परिस्थितीनुसार माणसाच्या सामाजिक जाणीवा निर्माण होतात, ही भौतिकवादाची मुख्य कल्पनाही या अपूर्ण लेखनात मांडलेली आहे.

ऱ्हाईनिशे त्सायटुंगचा संपादक असताना समाजवादाचा खोलवर अभ्यास करण्याचा त्याने निश्चय केला होता; तो पार पाडण्याची त्याला आता संधी मिळाली; आणि समाजवादाच्या कल्पनांनी ओतप्रोत भरून राहिलेल्या पॅरिसमध्ये त्याने तो निश्चय पूर्ण केला. तत्त्वज्ञानाला सामाजिक शास्त्राच्या विशाल क्षेत्रात आणून सोडणारा लॉक, मानवी बुद्धी, प्रगती व चांगुलपणा यांच्या समान विकासाच्या आधारावर "मानवतावादाचा" पुरस्कार करणारे हेल्वेशिअस

आणि हॉलबाख् यांच्या ग्रंथांचा त्याने अभ्यास केला; तत्त्वज्ञान, कथा, काव्य, कादंबऱ्या सर्व मार्गांनी समाजवादी प्रश्न व कल्पना पॅरिसमध्ये पसरत होत्या. मार्क्सने त्या सर्व आत्मसात् केल्या.

परंतु समाजवादाच्या या सर्व कल्पनांत एक मोठे वैगुण्य होते; या कल्पना सत्ताधारी वर्गाच्या चांगुलपणावर व समजूतदारपणावर आधारलेल्या होत्या. त्याखेरीज इतर कोणताही शास्त्रीय आधार, मार्ग अगर साधने त्याकाळच्या विचारवंतांना अगर कामगारनेत्यांना माहीत नव्हती.

आणि तरीसुद्धा कामगार चळवळ वाढतच होती. हैन्रिख हैनेसारखे युरोपियन कीर्तीचे कवि कम्युनिस्टांची गौरव-गीते गात होते.

समाजवादासाठी काम करणाऱ्यांच्या निरनिराळ्या संघटना पॅरिसमध्ये अस्तित्वात आलेल्या होत्या. लोकशाही समाजवादी पक्षाने समाजवादाच्या स्थापनेसाठी सार्वत्रिक मतदानाच्या मागणीची घोषणा उठविली होती. कॅबेटने कामगारवर्गाच्या समाजवादाची घोषणा करून मोठ्या प्रमाणावर कामगारांना एकत्रित केले होते. तर प्रुधाँसारख्या कामगारवर्गातून वर आलेल्या नेत्याने खाजगी मालमत्ता नष्ट झाली पाहिजे ही घोषणा करून सर्वत्र मोठा उत्साह निर्माण केला होता.

कामगार चळवळ व समाजवादाचे तत्त्वज्ञान यांची सांगड घालणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या जन्माचा काळ नजीक आला होता.

समाजवादाचा अभ्यास पूर्ण करून मार्क्सने कामगारवर्गाचा अभ्यास करण्यास सुरवात केली होती. पॅरिस शहराच्या बाहेर असलेल्या कामगार वस्तीत तो नेहमी जात असे. तेथे "न्यायी जनांचा संघ" नावाच्या जर्मन कामगार-कारागिरांच्या गुप्त संघटनेशी त्याचा संबंध आला. फ्रेंच क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनांशी व त्यांच्या नेत्यांशीही त्याने संबंध जोडले होते. कामगार जगाशी तो परिचित होऊ लागला होता. "संपत्तीचा संचय करून पुढे येणाऱ्या वर्गाची क्रांति, असे भांडवलदारी क्रांतीचे स्वरूप असते; तर सर्वस्वी निर्धन वर्गाची क्रांति म्हणजे कामगारक्रांति; म्हणूनच ती सबंध मानवजातीची मुक्तता करते—कारण सर्वांत अधिक जखडल्या गेलेल्या वर्गाची ती मुक्तता करते," हे त्याचे विचार याच काळांत परिपक्व झाले.

याच विचारांच्या आधारावर त्याने १८४४ च्या जूनमध्ये झालेल्या सायलेशियाच्या विणकरांच्या उठावाचे विवरण व स्वागत केले. पॅरिसहून प्रसिद्ध



98020

होणाऱ्या " फॉर्वर्टस " या जर्मन भाषेतील वृत्तपत्रात मार्क्सचा हा लेख छापला गेला. रूगेच्या आणि मार्क्सच्या विचारसरणीतील महदंतर या विषयावरील उत्तर–प्रत्युत्तरात स्पष्ट झाले.

ऑगस्टअखेर लंडनहून घरी जाण्याच्या मार्गावर असलेला एंगल्स मार्क्सला भेटण्यासाठी पॅरिसला उतरला. जर्मन–फ्रेंच वार्षिक–पत्रात तत्त्वज्ञानावरील लेखात जे निष्कर्ष मार्क्सने काढले होते, तेच निष्कर्ष अर्थशास्त्रावरील लेखात एंगल्सने काढले होते. यामुळे दोघांनाही परस्पर भेटीची अत्यंत ओढ लागलेली होती. पूर्वी मार्क्स ऱ्हाईनिशे त्सायटुंगचा संपादक असताना त्यांची ओझरती भेट झालेली होती. परंतु आताच्या या भेटीत त्यांच्या चिरस्मरणीय मैत्रीचा प्रारंभ झाला.

बर्लिनचे व्यक्तिस्वातंत्र्यवादी विचारवंत ब्रूनो बॉअर वगैरेंच्या एका लेखाला उत्तर देण्याच्या निमित्ताने एंगल्स व मार्क्स यांनी " जगासंबंधीच्या दृष्टिकोना " बद्दल लेख लिहिण्याचे ठरविले. पॅरिसमधील १० दिवसांच्या मुक्कामात एंगल्सने आपला लेख लिहून टाकला; मार्क्सने त्याच्या स्वभावधर्माप्रमाणे अनेक महिने मेहनत करून आपले म्हणणे लिहून काढले; ते छापल्यानंतर ३०० पानांचा ग्रंथ तयार झाला. मार्क्स व एंगल्स यांच्या सहकार्याने निर्माण झालेला हा पहिला ग्रंथ. त्याचे नाव आहे " पवित्र कुटुंब. "

परंतु पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वीच मार्क्सवर नवे गंडांतर आले. प्रशियाच्या सरकारने वर उल्लेख केलेल्या " फॉर्वर्टस " या पत्राच्या संपादकांना व लेखकांना पॅरिसमधून हद्दपार करण्याची फ्रेंच सरकारकडे मागणी केली. आणि अखेरीस ११ जानेवारी १८४५ रोजी मार्क्स, रूगे आणि इतर अनेक जर्मन निर्वासित लेखकांवर पॅरिस सोडून जाण्याचा हुकूम बजावण्यात आला. रूगेने आपण राजनिष्ठ असल्याची ग्वाही देऊन स्वतःची सुटका करून घेतली.

मार्क्सने आपले बिऱ्हाड बेल्जिअममधील ब्रुसेल्समध्ये नेले.

पॅरिसमध्ये घालविलेल्या या एका वर्षातील त्याचे खाजगी जीवन कसे होते याची नेहमीप्रमाणेच फारशी माहिती मिळत नाही. तरी ते बरेच स्वास्थ्याचे असावे. पॅरिसमध्ये मार्क्सची पहिली कन्या जेनी हिचा जन्म झाला.

## १०. " पवित्र कुटुंबा " मधील विचार

पॅरिसमध्ये असताना मार्क्स व एंगल्सने–आणि मुख्यतः मार्क्सने–लिहिलेला " पवित्र कुटुंब " हा ग्रंथ मार्क्स पॅरिसहून हद्दपार होऊन ब्रुसेल्समध्ये रहावयास गेल्यानंतर प्रसिद्ध झाला.

पूर्वी मार्क्स व एंगल्सने "जर्मन–फ्रेंच वार्षिकपत्रा"त कामगार (व सर्वसाधारण जनता) आणि मानवी स्वातंत्र्य यासंबंधी जे विचार मांडले, त्यांना प्रत्युत्तर देताना बॉअर बंधूंनी अत्यंत विरोधी विचार मांडले होते. बॉअर बंधूंचे मत होते की शुद्ध ज्ञान हेच मुक्तीचे साधन आहे; ज्ञानाचा संपर्क नसलेली, संपूर्णपणे अज्ञानी असलेली जनता आत घुसल्यामुळेच जगातील आजपर्यंतची आंदोलने अयशस्वी झाली आहेत; पुष्कळदा या आंदोलनातील मूळ वैचारिक गाभाच खालच्या दर्जाचा होता, म्हणूनच सामान्य लोक त्यात सामील झाले आणि त्यांनी त्या चळवळी धुळीस मिळविल्या. याच विचारसरणीच्या आधारावर बॉअर बंधू सर्व जनआंदोलनांबद्दल तिरस्कार व्यक्त करीत. ख्रिश्चन व यहुदी धर्माची चळवळ, समाजवादी आंदोलन, फ्रेंच क्रांती व इंग्लंडची औद्योगिक क्रांती अयशस्वी होण्याचे कारण त्यांच्या मते "बुद्धी" व "जनता" यांच्यातील विरोध हेच होते; बुद्धिहीन जनता ज्या आंदोलनात भाग घेते ते आंदोलन निष्फळ झाल्याखेरीज राहणार नाही, असे त्यांचे मत होते.

या सर्व तर्ककुतर्कांचा मार्क्स–एंगल्सच्या "पवित्र कुटुंबात" धुव्वा उडविण्यात आला आहे. उदाहरणार्थ, त्यांनी लिहिले की, फ्रेंच क्रांतीत जनतेने भाग घेतल्यामुळेच भांडवलदारांचा फायदा झाला. पुढे भांडवलदारांनी जनतेच्या हिताचे संवर्धन सोडून दिले आणि म्हणून त्या क्रांतीतील यश लयाला गेले. ही क्रांती भांडवलदारांच्या दृष्टीने यशस्वी झाली पण कामगारांच्याच दृष्टीने अयशस्वी झाली, कारण भांडवलदारांची क्रांतीची कल्पना व कामगारांची मुक्तीची कल्पना अगर त्यांचे हित यात विरोध आला.

त्याचप्रमाणे बुद्धी व जनतेचे हित यातील विरोधाच्या कल्पनेवरही त्यांनी चांगलाच हल्ला केला. जनतेने हितसंरक्षणार्थ चालविलेल्या आंदोलनाच्या व चळवळीच्या अभ्यासातून व ज्ञानातूनच तत्त्ववेत्ते आपली विचारसरणी निर्माण करीत असतात असे सांगून मार्क्सने सांगितले की, "ज्ञानी महापुरुष इतिहास निर्माण करीत नाहीत. ज्यावेळी सामान्य लोक राजकीय कार्यात अधिकाधिक प्रमाणावर भाग घेऊ लागतात, त्यावेळी त्यांच्या कृतीतून इतिहास निर्माण होतो."

आणि आधुनिक जगात, सर्व समाजाची मुक्तता करणारी क्रांती कामगारांच्या राजकीय आंदोलनातून जन्माला येईल. श्रमशक्तीच्या आधारावर जगणारा कामगार मानवी मूल्ये हरवून बसलेला असतो. परंतु त्याच्या अनुभवामुळे जागृत होऊन तो जगातील अमानुष, अन्यायी परिस्थिती नष्ट करण्यासाठी उठाव करतो.

हा काही या अगर त्या कामगाराच्या बुद्धिमत्तेचा अगर ताकदीचा प्रश्न नाही. हा कामगारांच्या ऐतिहासिक कार्याचा प्रश्न आहे. विशिष्ट परिस्थितीत, समाजाची दुःखातून, दारिद्र्यातून, अन्यायातून मुक्तता करण्याचे कार्य कामगारवर्गाकडून पार पाडले जावयाचे असते.

हे विचार मांडून मार्क्सने कामगारवर्गाच्या तत्त्वज्ञानातील एक महत्त्वाचा पैलू—कामगारवर्गाच्या ऐतिहासिक भूमिकेबद्दलचा विचार—प्रथमतः स्पष्टपणे मांडला.

## ११. " जर्मन विचारप्रणालि "

मार्क्सला फ्रान्समधून हद्दपार करूनही प्रशियन सरकारचे समाधान झाले नाही. बेल्जिअममधूनही त्याला हद्दपार करावे, असा त्याने बेल्जियन सरकारच्या मागे ससेमिरा सुरू केला. अखेरीस १ डिसेंबर १८४५ रोजी मार्क्सने जर्मन राष्ट्रीयत्व ( नागरिकत्व ) सोडून दिले.

मार्क्स ब्रुसेल्सला रहावयास गेल्यानंतर थोड्याच दिवसांनी मार्क्स व एंगल्स दोघेजण इंग्लंडला गेले आणि तेथे ते ६ आठवडे राहिले. या मुक्कामात मार्क्सने अर्थशास्त्रावरील पुस्तकांचे वाचन केले. दोघांनीही इंग्लंडमधील चार्टिस्ट चळवळीच्या व समाजवादी चळवळीच्या नेत्यांबरोबर संबंध दृढ केले.

इंग्लंडच्या प्रवासाहून परत आल्यानंतर दोघांनी मिळून एका नव्या पुस्तकाच्या लेखनास प्रारंभ केला. पुस्तकाचे नाव " जर्मन विचारप्रणाली " असे ठेवण्यात आले. यात हेगेल आणि त्याचे तरुण अनुयायी यांच्या तत्त्वज्ञानावर चर्चा करण्यात आली होती. हेगेलच्या आध्यात्मिक (आधिभौतिक) तत्त्वज्ञानाला भौतिक तत्वज्ञानाच्या मार्गावर आणल्याबद्दल फॉयरबॉखला धन्यवाद देऊन भौतिक जगाच्या विकासाचे चैतन्यतत्त्व स्पष्टपणे न मांडल्याबद्दल त्याला दोष देण्यात आला. ८०० पानांच्या ह्या दोन विभागांच्या पुस्तकात बौद्धिक कसरत व पाल्हाळ बराच होता. तरीसुद्धा तत्कालीन विचार-विकासाच्या दृष्टीने ते महत्त्वाचे होते. परंतु त्याला योग्यवेळी प्रकाशक न मिळाल्यामुळे ( मार्क्सच्या शब्दांत वर्णन करावयाचे म्हणजे ) " ते उंदरांच्या टीकात्मक कुरतडण्याला बळी पडले. " पुढे या पुस्तकाचे दोन्ही भाग रशियन क्रांतीनंतर मार्क्स-एंगल्स प्रकाशन–संस्थेने प्रसिद्ध केले. समाजाच्या इतिहासात उत्पादन–साधनांचा विकास होऊ लागल्यापासूनच्या अवस्था या पुस्तकात, पुढीलप्रमाणे देण्यात आलेल्या

आहेत; (१) जमातींच्या मालकीची मालमत्ता असलेला समाज (म्हणजे प्राथमिक साम्यवादी समाज) आणि गुलामगिरीचा प्रारंभ. (२) प्राचीन जमातींच्या मालकीची व शासनसंस्थेच्या मालकीची मालमत्ता असलेला (गुलामगिरी अवस्थेतील) समाज. (३) सरंजामदारी समाज. (४) भांडवलदारी समाज. थोडक्यात म्हणजे मार्क्स-एंगल्स यांनी आपल्या सुप्रसिद्ध ऐतिहासिक भौतिकवादाच्या सिद्धांताची रूपरेखा पहिल्याप्रथम सूत्र रूपाने या ग्रंथात मांडलेली आढळते. या सिद्धांतामुळे जागतिक इतिहासाच्या कल्पनेत क्रांती कशी घडून आली व इतिहासाला शास्त्रीय स्वरूप कसे आले ते आपण पुढे पाहू.

"जर्मन विचारप्रणाली" या पुस्तकाचा दुसरा भाग जर्मन समाजवाद्यांसंबंधी होता. या भागात त्या वेळच्या तथाकथित "खऱ्या समाजवादी" लेखकांच्या विचारांची व कामगिरीची छाननी करण्यात आलेली होती; आणि फ्रान्स, बेल्जियममधील राजकीय आंदोलनासंबंधी त्यांनी मांडलेल्या विचारावर कडक टीका करण्यात आली होती. मार्क्स व एंगल्स जरी हेगेल-फॉयरबॉखच्या तत्त्वज्ञानाकडून समाजवादाकडे आले असले तरी त्यांनी तत्त्वज्ञानाला इंग्लंडच्या औद्योगिक विकासाच्या अभ्यासाची जोड दिली होती; तत्त्वज्ञानाला अर्थशास्त्राचा पाया देऊन समाजवादाचे शास्त्र बनविण्याचा प्रयत्न चालविला होता; उलट वरील "खऱ्या समाजवाद्यांनी" हेगेलच्या अध्यात्मवादाला समाजवादी घोषणा चिटकवून क्रांतिकारक चळवळीवर टीका करण्यास प्रारंभ केला. अर्थशास्त्राच्या व समाजवादाच्या परिस्थितीसंबंधी संपूर्ण अज्ञान असता जर्मन जनतेची क्रांती करू पहाणाऱ्या या लोकांवर मार्क्स-एंगल्सने हल्ला करण्याचे ठरविले होते; अर्थात् त्यात त्यांचा हेतू मात्र त्या लोकांना सुधारण्याचा होता. कामगारवर्गासंबंधी त्यांचा दृष्टिकोन सुधारून निरनिराळ्या देशांतील सरकारांविषयी त्यांनी कशी भूमिका घ्यावी हे त्यांना दाखवून देण्याचा मार्क्सचा उद्देश होता. कामगारवर्गाने उगवत्या भांडवलदारांचे सहाय्य घेऊन सरंजामशाही सरकारांचा पाडाव केला पाहिजे, हे मत काहीशा टोकाला जाऊन मार्क्स त्या काळात मांडीत असे.

रूगे वगैरेंबरोबर वैचारिक मतभेद झाल्यापासून मार्क्सला प्रकाशक मिळवणे कठीण झाले होते. त्याच्याच परिणामी "जर्मन विचारप्रणाली" तेव्हा धूळ खात पडले.

"खऱ्या समाजवादी" विचारसरणीच्या नेत्यांबरोबर मार्क्सचा हा जो झगडा झाला त्यापेक्षा अधिक मोठा संघर्ष त्याला वाईटलिंग व प्रुधाँ यांच्याविरुद्ध करावा

लागला. हे दोघेही कामगारवर्गाला स्फूर्ती देणारे, नेकीचे नेते होते; परंतु त्यांच्या विचारसरणीतील दोषांमुळे चळवळीत फूट पडू लागताच मार्क्सला त्यांच्या विरुद्ध लेखणी उचलावी लागली, अर्थात् त्यापूर्वी त्यांच्याशी मतैक्य निर्माण करण्याचे त्याने अत्यंत मनापासून प्रयत्न केले.

एकीकडे लेखन–मनन करीत असताना त्याचवेळी मार्क्स–एंगल्स प्रत्यक्ष संघटनेच्या कार्यासही लागले. कामगारवर्गाच्या ऐतिहासिक कार्याबद्दलचे विचार जनतेत रुजविण्याच्या कार्याला ते लागले होते. या वेळेपर्यंत अनेक मोठ्या शहरांतून कम्युनिस्ट गट निर्माण झाले होते. त्यांचे एकमेकांशी कायम स्वरूपाचे संबंध प्रस्थापित करण्याच्या हेतूने ब्रुसेल्स, पॅरिस, लंडन, तसेच कोलोन वगैरे जर्मनीतील शहरांत अशा ( कम्युनिस्ट कॉरेस्पॉन्डन्स् ) कमिट्या स्थापन करण्यात आल्या. हे कार्य करीत असतानाच त्यांना वर उल्लेख केलेल्या कामगार–नेत्यांबरोबर —" खरे समाजवादी ", आणि वाईटलिंग व प्रुधाँ यांच्याबरोबर सामना करावा लागला.

## १२. " तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य "

" आर्थिक विरोधावर आधारलेली समाज–पद्धती—दारिद्र्याचे तत्त्वज्ञान " हा प्रुधाँचा ग्रंथ १८४७ मध्ये प्रसिद्ध झाला आणि त्याला " तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य " हा ग्रंथ लिहून मार्क्सने ताबडतोब उत्तर दिले.

मार्क्सच्या या ग्रंथाने जगाच्या इतिहासात नव्या विचारांचे दालन उघडले. ऐतिहासिक भौतिकवादाच्या सिद्धांताचे संकलित व शास्त्रशुद्ध निरूपण प्रथमतः याच ग्रंथात मांडण्यात आले. मार्क्सच्या यापूर्वीच्या लेखातही ज्या कल्पना व जे विचार इतस्ततः विखुरलेले होते ते सर्व सूत्रबद्ध होऊन ह्या पुस्तकात ग्रथित झाले आहेत. निसर्गाच्या विकासाचे नियम विशद करणाऱ्या डार्विनच्या सिद्धांतांना निसर्गशास्त्रात जे स्थान आहे तेच अढळ स्थान मार्क्सने या पुस्तकात मांडलेल्या इतिहासाच्या विकासाच्या सिद्धांतांना इतिहासशास्त्रात व समाजशास्त्रात प्राप्त झाले आहे.

प्रत्येक ऐतिहासिक काळातील आर्थिक उत्पादनपद्धती आणि तिच्या आधारावर निर्माण होणारी समाजव्यवस्था ही त्या त्या ऐतिहासिक कालखंडातील राजकीय व वैचारिक घडामोडींचा आधार असतात–या मुख्य प्रमेयाची मार्क्सने या ग्रंथात मांडणी केली.

भांडवलदारी समाज आणि त्याचे आर्थिक व नैतिक सिद्धांत व संस्था चिरकालीन टिकणाऱ्या असतात, हे प्रुधाँचे मत खोडून काढताना मार्क्सने लिहिले की, "भौतिक उत्पादनाच्या पद्धतीनुसार माणसाचे सामाजिक संबंध निर्माण होतात आणि या सामाजिक संबंधांना अनुसरून माणसाची तत्त्वे, विचार व कल्पना तयार होतात; त्यांना जन्म देणारी परिस्थिती बदलली की त्या बदलतात."

भांडवलशाही "सुधारण्याचा" मार्ग प्रुधाँने आपल्या पुस्तकात सांगितला होता. रिकार्डोने सिद्ध करून दाखविले होते की, भांडवलदारी समाजात वस्तूंची देवाणघेवाण त्या निर्माण करण्यासाठी लागलेल्या श्रम-कालाच्या आधारावर होत असते. भांडवलशाही समाजात कामगारांना सहन कराव्या लागणाऱ्या यातना व दारिद्र्य नष्ट करण्यासाठी रिकार्डोच्या वरील सिद्धांताचा आधार घेऊन प्रुधाँने सुचविले की, सर्वांनी कामगार बनावे आणि ज्यांच्या उत्पादनासाठी सारखे श्रम लागलेले आहेत अशा वस्तूंची देवाणघेवाण करावी म्हणजे समाजात सर्वत्र समानता निर्माण होईल.

मार्क्सने आपल्या पुस्तकाच्या पहिल्या भागात अर्थशास्त्राच्या आधारावर, भांडवलदारी समाजात समानता व न्याय निर्माण करणे व टिकणे का अशक्य आहे याची छाननी केली आणि दुसऱ्या भागात हेगेलच्या विरोध–विकासाच्या तत्त्वज्ञानाच्या आधारावर समाजाचा विकास कसा होतो ते दाखवून भांडवलशाही "सुधारता" येते हे प्रुधाँचे मत खोडून काढले.

प्रुधाँने सुचविल्याप्रमाणे समाजातील सर्व व्यक्ती कामगार बनून भांडवलदारी उत्पादन चालू राहील हेच अशक्य आहे, कारण ते उत्पादन वर्गभेदावर आधारलेले आहे. रिकार्डोचा सिद्धांत मान्य करून कामगारांनी वेतन घ्यावयाचे म्हटले म्हणजे कामगारांच्या जीवनास व प्रजोत्पादनास आवश्यक लागणाऱ्या खर्चापेक्षा एक फुटका पैसासुद्धा त्यांच्या पदरी अधिक पडणार नाही. म्हणजे या मार्गाने समानता निर्माण होणार नाही; तर आजच्या गुलामगिरीची मगरमिठीच अधिक बळकट होईल. याशिवाय, सामाजिक उत्पादन वाढले तर कामगारांना वाढता हिस्सा मिळवून देता येईल, ही प्रुधाँची कल्पनाही वास्तवाशी जुळण्यासारखी नव्हती. १७७० मध्ये इंग्लंडमधील कामगार जितके उत्पादन करीत होते त्याच्या २७ पट अधिक उत्पादन ते १८४० मध्ये करीत होते. परंतु त्यांचे दारिद्र्य नवे

रूप धारण करून उभे होते; उत्पादनातील अधिक हिस्सा मिळून कमी झाले नव्हते. आणि ते तसे कमी होणारेही नव्हते. कामगारांचे दारिद्र्य हे वर्गभेदावर आधारलेल्या ऐतिहासिक परिस्थितीतून निर्माण झालेल्या वस्तुस्थितीचे एक अंग होते; ती वस्तुस्थिती—ती उत्पादन पद्धती—बदलल्याखेरीज ते नष्ट होणार नव्हते. भांडवलदारी नफ्यामुळे दारिद्र्य निर्माण होते आणि नफ्यावर आधारलेली भांवलदारी उत्पादनपद्धती नफा नष्ट केला अगर झाला तर टिकून रहाणार नाही.

प्रश्नाच्या आर्थिक बाजूसंबंधी इतके विवेचन करून मार्क्सने इतिहासाच्या गतकालीन विकाससंबंधी निष्कर्ष काढला आणि भविष्यकालीन गतीसंबंधी सिद्धांत मांडला की:

प्रत्येक ऐतिहासिक कालखंडांतील आर्थिक उत्पादनपद्धती आणि तिच्या आधारावर निर्माण होणारी समाजव्यवस्था ही त्या त्या ऐतिहासिक कालखंडातील राजकीय व वैचारिक घडामोडींचा (इतिहासाचा) आधार असतात; आणि म्हणून सबंध इतिहास हा वर्गलढ्यांचा इतिहास बनलेला आहे; सामाजिक विकासाच्या निरनिराळ्या अवस्थेतील पिळवणूक करणारे व पिळले जाणारे आणि सत्ताधारी व सत्ताहीन वर्ग यांच्यांतील संघर्षाचा तो इतिहास आहे; आणि आज हे संघर्ष अशा अवस्थेला येऊन पोहचले आहेत की, पिळला व दडपला गेलेला वर्ग–कामगारवर्ग–हा पिळवणूक व दडपशाही करणाऱ्या वर्गापासून—भांडवलदार वर्गापासून—स्वतःची मुक्तता करताना, त्याचवेळी सबंध समाजाची पिळवणूकीतून कायमची मुक्तता करतो.

पुस्तकाच्या दुसऱ्या भागात मार्क्सने हेगेलच्या तत्त्वज्ञानासंबंधीची प्रुधाँची मते कशी चुकीची आहेत हे सांगून त्याच्या तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य उघड करून दाखविले. प्रुधाँने मांडल्याप्रमाणे, विकासाच्या प्रत्येक अवस्थेची एक चांगली बाजू आणि दुसरी वाईट बाजू कल्पून चांगली घ्यायची आणि वाईट टाकून द्यायची–अशा पद्धतीने चांगल्याचा समन्वय करावयाचा हा निव्वळ भ्रम आहे; हेगेलच्या विरोध–विकासवादाच्या तत्त्वज्ञानाची गल्लत आहे. वास्तवात प्रुधाँ जिला वाईट बाजू समजतो तीच लढे निर्माण करून इतिहास घडवीत असते. सरंमजामदारी समाजव्यवस्थेतील शहरी संपन्न जीवन व ग्रामीण कारागिरी जिवंत ठेवून सरंजामी गुलामगिरी नष्ट करावयाची आणि भांडवलशाहीतील भांडवली उत्पादन कायम ठेवून कामगारवर्गाच्या नष्ट करावयाच्या यातना ह्या कपोलकल्पित कल्पनांवर हल्ला करून मार्क्सने विकासाच्या दुहेरी स्वरूपाचे विवेचन केले. परस्पर विरोधी शक्तींच्या

आधारावर होणारे उत्पादन, त्यांत होणारा उत्पादनशक्तीचा विकास–दडपल्या गेलेल्या शक्तीचा सतत संघर्ष आणि भौतिक परिस्थिती परिपक्व होताच यशस्वी संघर्षामुळे होणारी मुक्तता–हे समाजविकासाचे चक्र मार्क्सने स्पष्ट शब्दांत, उदाहरणासहित, उलगडून दाखविले.

अशा रीतीने, हेगेलच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाला भौतिक तत्त्वज्ञानाच्या पायावर उभ्या करणाऱ्या फॉयरबॉखला मानवी समाजाच्या विकासाची जी गुरुकिल्ली मिळाली नव्हती ती मार्क्सने शोधून काढली. इतिहासाची चैतन्यशक्ती, समाजाच्या विकासाची स्फूर्तिदेवता—साम्यवादी व वर्गविहीन समाज निर्माण होईपर्यंत—वर्गसंघर्ष अगर वर्गलढे ही आहे, हे सांगून मार्क्सने मार्क्सवादी विचारसरणीतील महत्त्वाची पायाभरणी केली; आणि समाजविकासाचा इतिहासच केवळ नव्हे, तर समाज बदलण्याच्या शास्त्राचाही जगाला परिचय करून दिला.

## १३. " कम्युनिस्ट लीग " चा जन्म

मार्क्सवादी विचारांच्या मुक्त मालेतील या रत्नाला प्रकाशात आणण्यासही कोणी मिळेना; अखेरीस मार्क्सला स्वतःच्या पदरचे पैसे खर्च करून ते जगापुढे आणावे लागले. सुदैवाने, याच सुमारास, १८४७ च्या मेमध्ये, ' जर्मन-ब्रुसेल्स वृत्तपत्र ' या द्विसाप्ताहिकाने मार्क्सचे लेखन प्रसिद्ध करण्यास प्रारंभ केला.

प्रशियाच्या राजाने सर्व राज्यांतल्या विधानसभांच्या प्रतिनिधींची संयुक्त बैठक बोलावून अधिक पैसे वसुलीसाठी त्यांची मान्यता मिळविण्याचे प्रयत्न चालविले होते; या संयुक्त बैठकीतील चर्चेवर मार्क्स व एंगल्स यांनी लेख लिहिले. जनहिताबद्दल बेपर्वा असलेल्या सरकारला अर्थसहाय्य नाकारल्याबद्दल या लेखातून संयुक्त परिषदेच्या प्रतिनिधींचे अभिनंदन करण्यात आले. या लेखांपैकी " ख्रिश्चन सरंजामदारी समाजवाद " आणि " राजेशाही की लोकसत्ता " हे दोन लेख भाषेच्या, मांडणीच्या व विचारांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. पहिल्या लेखात, " ख्रिश्चन धर्मसुद्धा समाजवादच सांगतो मग साम्यवादी तत्त्वज्ञानाचा उपयोग काय ? " ह्या फसव्या प्रश्नाला इतिहासाच्या दाखल्यांच्या सहाय्याने उपरोधिक व तिखट उत्तर देण्यात आले असून, दुसऱ्या लेखात " सरंजामदार की भांडवलदार " या खोट्या समस्येचा समाचार घेण्यात आलेला आहे.

या वेळेपर्यंत ब्रुसेल्समधील कम्युनिस्ट गट बराच मोठा झाला होता. मार्क्स–एंगल्स व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपला आंतरराष्ट्रीय परिवारही वाढविला होता.

छापील अगर स्टेन्सिल् केलेल्या पत्रकांच्या सहाय्याने मार्क्स व एंगल्स समाजवादी चळवळीत फिरणाऱ्या चुकीच्या विचारांचा समाचार घेत होते आणि शास्त्रीय विचारांच्या आधारावर, आज आपल्या नजरेसमोर चाललेल्या समाज-स्थित्यंतरात भाग घेणे हे आपले कर्तव्य आहे, समाजवादाची कल्पनारम्य चित्रे रंगविणे नव्हे, असे विचार आग्रहपूर्वक मांडीत होते. या त्यांच्या विचारांनी समाजवादी गटात जिवंतपणा खेळू लागला. लंडनच्या "न्यायी संघा"ने मार्क्स व एंगल्स यांना आपल्या संघटनेत सामील होण्याची विनंती केली. त्या निमित्ताने झालेल्या चर्चेमुळे १८४७ च्या उन्हाळ्यात लंडनमध्ये भरलेल्या परिषदेत "कम्युनिस्ट लीग"ची स्थापना करण्यात आली, तिची घटना व कार्यक्रम ठरविण्यात आले. भांडवलशाहीचे उच्चाटन, कामगारसत्तेची स्थापना, वर्गभेदावर आधारलेल्या जुन्या समाजव्यवस्थेचा नाश आणि वर्गविहीन, नव्या समाजाची उभारणी, हे ध्येय कम्युनिस्ट लीगने घोषित केले. 'न्यायी संघाच्या'च्या "सर्व मानव भाई-भाई" या घोषणेच्या जागी "जगातील कामगारांनो, एक व्हा!" हे अधिक क्रांतिकारक व आंतरराष्ट्रीयवादी ब्रीदवाक्य कम्युनिस्ट लीगने घोषित केले. या पहिल्या परिषदेला मार्क्स स्वतः उपस्थित नव्हता; पण एंगल्स व त्याचे इतर सहकारी प्रामुख्याने होते.

लीगने सर्वप्रथम कामगारांसाठी शिक्षणमंडळे स्थापन केली; उघड रीतीने काम करण्यास संधी मिळावी आणि चळवळीसाठी नवे कार्यकर्ते मिळवावेत असे दोन हेतू ही मंडळे चालविताना नजरेसमोर ठेवण्यात आले होते. मंडळातर्फे आठवड्यातून दोन दिवस कार्यक्रम ठेवण्यात येत; एक दिवस राजकीय-सामाजिक प्रश्नांवर चर्चा करण्यात येई आणि एक दिवस गायन वगैरे सामाजिक कार्यक्रम चालत. काही ठिकाणी वाचनालये आणि काही ठिकाणी कम्युनिझमविषयी अभ्यासवर्ग सुरू करण्यात आले. ब्रुसेल्समध्ये सुरू करण्यात आलेल्या अशा शिक्षणमंडळाच्या कार्यक्रमाला १०० पेक्षा अधिक लोक सतत उपस्थित राहू लागले होते.

२९ नोव्हेंबर रोजी १८३० च्या पोलंडमधील क्रांतीचे अभिनंदन करण्यासाठी निरनिराळ्या समाजवादी संस्थांतर्फे सर्वत्र सभा झाल्या. लंडनमधील अशा एका सभेमध्ये मार्क्सचे भाषण झाले. मार्क्सने सांगितले, "जुने पोलंड लयाला गेले आहे; किंबहुना जुने इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स लयाला जात आहेत. पण त्याबद्दल सर्व देशांतील बहुसंख्य जनतेला दुःख वाटणार नाही, कारण घालवून बसण्यासारखे त्यांच्या जवळ काहीच नाही ... ... या नव्या परिस्थितीत क्रांती होऊन

इंग्लंडच्या कामगारवर्गाची भांडवलशाहीपासून मुक्तता झाली तर ती सर्व दडपल्या गेलेल्या लोकांची मुक्तता ठरेल. जर्मन-पोलिश-फ्रेंच जनतेची इंग्लंडमध्ये मुक्तता होईल." मार्क्सचे हे भाषण चालू असता श्रोत्यांचे डोळे आनंदाने चमकू लागले, त्यांनी मोठमोठ्याने संमतीदर्शक उद्गार काढून त्याच्या विचारांचे स्वागत केले आणि हात पुढे करून बंधुभाव प्रदर्शित केला. "राजांच्या कटाला जनतेच्या कटाने उत्तर देण्याचा निर्णय या सभेत घेण्यात आला." याच दिवशी लंडनमध्ये कम्युनिस्ट लीगच्या दुसऱ्या परिषदेला प्रारंभ झाला. लीगचे आजचे धोरण व भावी कार्यक्रम यासंबंधी १० दिवस चर्चा झाली. आणि अखेरीस, साम्यवादाची मूलभूत तत्त्वे मांडणारा जाहिरनामा तयार करण्याची कामगिरी मार्क्स व एंगल्स यांच्याकडे सोपविण्यात आली. १८४८ च्या २४ जानेवारीपर्यंत ती कामगिरी त्यांनी पार पाडली नाही म्हणून त्यांना ताकीद मिळून १ फेब्रुवारीपर्यंत काम पूर्ण करण्यास सांगण्यात आले. या काळात ब्रुसेल्समध्ये मार्क्सचे प्रचाराचे कार्य जोरात चालू होते. दुर्दैवाने मार्क्सची या काळातील फारच थोडी भाषणे उपलब्ध आहेत. त्यापैकी जर्मन कामगारमंडळासमोर त्याने दिलेले "मोल-मजुरी व भांडवल" या विषयावरील भाषण फार महत्त्वाचे आहे.

या व्याख्यानात मार्क्सने कामगारांना किती पगार मिळतो, आणि भांडवल म्हणजे काय, या प्रश्नांची शास्त्रीय उत्तरे कामगारांना समजतील अशा रीतीने मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्याने सांगितले, कामगारांना पगार मिळतो म्हणजे तो जे उत्पादन करतो त्यातील एक हिस्साच त्याला दिला जातो, असे सांगितले जाते ते खरे नाही. कामगार जे उत्पादन करतो ते बाजारात जाऊन त्याची विक्री होण्यापूर्वीच किंबहुना पुष्कळदा कामगारांच्या कार्याला प्रारंभ होण्यापूर्वीही, त्याला पगार द्यावा लागतो. भांडवलदार हा पगार त्याला त्याने विकत घेतलेल्या उत्पादनक्षम श्रमशक्तीबद्दल देत असतो, आणि या श्रमशक्तीचे मूल्य भांडवलदार इतर कोणत्याही वस्तूचे मूल्य ठरवितो त्याचप्रमाणे ठरवितो; म्हणजे तिच्या उत्पादनाला आवश्यक लागणाऱ्या खर्चाइतके मूल्य कामगाराच्या श्रमशक्तीबद्दल भांडवलदार देतो.

आता भांडवल म्हणजे काय? विशिष्ट उत्पादनसंबंध निर्माण झाले तरच भांडवल अस्तित्वात येते. म्हणजे स्वतःच्या श्रमशक्तीखेरीज ज्याच्या मालकीचे जगात काहीही नाही असा कामगारवर्ग अस्तित्वात असणे ही भांडवल अस्तित्वात येण्याची आवश्यक अट आहे, कारण संचित (साठविलेल्या) श्रमशक्तीच्या

स्वरूपात भांडवल अस्तित्वात असले तरी जिवंत कामगारांच्या श्रमशक्तीच्या उपयोगाने ते स्वतःची वाढ करून घेते तेव्हाच ते "भांडवल" बनते. म्हणून भांडवल व मोल–मजुरी करणारे कामगार परस्परावलंबी आहेत.

याचा भांडवलदार व कामगार यांचे हितसंबंध एकच आहेत असा अर्थशास्त्रज्ञ जो अर्थ सांगतात तो खोटा आहे. भांडवलदारी उत्पादन वाढीस लागले तर एकूण कामगारवर्गाचे हित होते, इतक्या मर्यादेत तो अर्थ बरोबर आहे. अशा काळात कामगारांचे पगारही कदाचित् थोडेफार वाढतात; परंतु भांडवलदारांचे नफे मात्र फारच मोठ्या प्रमाणावर वाढतात. आर्थिकदृष्ट्या कामगारांची परिस्थिति कदाचित् सुधारते, परंतु सामाजिकदृष्ट्या अधिक बिघडते; भांडवलदार व कामगार यांच्यातील सामाजिक भगदाड अधिकच मोठे होते. परंतु ही क्रियासुद्धा सातत्याने चालत नाही. भरभराटीने चालणारे उत्पादन मागणीपेक्षा अधिक होऊन साठू लागले की पुन्हा अरिष्ट निर्माण होते आणि त्यातही प्रथमतः व मुख्यतः कामगारवर्गाचा एक विभागच बळी दिला जातो.

मार्क्सने दिलेल्या या एका व्याख्यानाच्या सारांशावरूनच तो प्रचाराचे काम किती गंभीरपणाने करीत होता हे दिसून येते. बाकुनिनसारख्या क्रांतिकारकांना मात्र, "या व्याख्यानांनी मार्क्स कामगारांना तर्कट बनवून बिघडवीत आहे," असे वाटत असे.

## १४. "कम्युनिस्ट जाहिरनामा"

अखेर मार्क्सने आपले काम वेळेवर पूर्ण केले आणि १८४८ च्या फेब्रुवारीच्या अखेरीस "कम्युनिस्ट जाहिरनामा" लंडनमधील छापखान्यातून छापून बाहेर आला.

मार्क्स व एंगल्स यांच्या विचारांना ग्रथित करणारी मार्क्सच्या लेखणीतून बाहेर पडलेली ही अमर कृती आज जगात एकमेव अद्वितिय असे स्थान प्राप्त करून बसली आहे.

कामगारवर्गाच्या क्रांतीची ही गाथा आहे. जगाबद्दलचा नवा दृष्टिकोन—पूर्णपणे विकसित झालेला सुसंगत भौतिकवाद; विकासाचे सर्वांत प्रगत व सर्वंकष तत्त्वज्ञान म्हणून विरोध–विकासवाद; वर्गलढ्याचे तत्त्व आणि नव्या साम्यवादी जगाच्या निर्मात्याचे—कामगारवर्गाचे—जागतिक ऐतिहासिक कार्य ही चतुःसूत्री यात स्पष्ट शब्दात गुंफण्यात आली आहे.

उत्पादनशक्तींच्या अधिक विकासाला अडथळे आणणारा वर्ग नष्ट होतो या नियमाला धरून, मानवतेच्या पुढील विकासक्रमाच्या, साम्यवादाकडे जाण्याच्या, मार्गात अडथळे आणणारा भांडवलदारवर्ग नष्ट होतो हे कम्युनिस्ट जाहिर-नाम्यात सिद्ध करण्यात आलेले आहे.

भांडवलशाहीचा विनाश करणारा आणि नव्या वर्गविहीन समाजाची रचना करणारा कामगारवर्ग हे कार्य वर्गलढे, कामगारक्रान्ती व श्रमजीवी वर्गाच्या राजकीय सत्तेची स्थापना करूनच पार पडतो.

कामगारवर्गाचे लढे विजयी होण्यासाठी कम्युनिस्ट पक्षाच्या अस्तित्वाची व पुढाकाराची गरज असते. कम्युनिस्ट पक्ष हा श्रमिक जनतेचा सर्वात पुढारलेला व कणखर विभाग असतो; इतर कामगारांजवळ नसलेले असे एक मोठे शस्त्र कम्युनिस्ट पक्षाजवळ असते व ते म्हणजे क्रांतिकारक तत्त्वज्ञान. त्याच्या जोरावर त्याला कामगार चळवळीची परिस्थिती, प्रगती व परिणाम यांचे आकलन होते.

कम्युनिस्ट पक्ष व त्याचे ध्येयधोरण याबद्दलच्या निंदानालस्तीला जाहिर-नाम्यात सडेतोड व मुद्देसूद उत्तरे देण्यात आली आहेत; आणि कामगारवर्गाचे खरे ध्येय व उद्दिष्ट सुस्पष्ट शब्दांत मांडले आहे. “कामगारवर्ग भांडवलदार वर्गाच्या हातून सर्व भांडवल क्रमाक्रमाने हिसकावून घेण्यासाठी, सर्व उत्पादन-साधने सरकारच्या हाती—म्हणजे राज्यकर्ता वर्ग या नात्याने संघटित झालेल्या कामगारवर्गाच्या हाती—केंद्रित करण्यासाठी व एकूण उत्पादनशक्तींची वाढ शक्य तितक्या वेगाने करण्यासाठी, आपल्या राजकीय वर्चस्वाचा उपयोग करील.” (जाहिरनामा पृष्ठ ६७ वे) भांडवलशाही नष्ट करून समाजवाद व वर्गविहीन समाज प्रस्थापित करण्यासाठी कामगारवर्गाला सत्ताधारी बनावे लागेल, व संक्रमणावस्थेत श्रमजीवी वर्गाची सर्वाधिकारी सत्ता स्थापावी लागेल, हा मार्क्सवादाचा प्रतिभाशाली सिद्धांत जाहिरनाम्यात प्रथम सूत्ररूपाने मांडण्यात आला आहे.

कामगारवर्गाच्या आंतरराष्ट्रीय बाण्याबद्दलही जाहिरनाम्यात अत्यंत स्पष्ट विचार मांडण्यात आलेले आहेत. राष्ट्रीय गुलामगिरीचा अंत आणि राज्य जिंकण्यासाठी व संपत्तीचे अपहरण करण्यासाठी चाललेल्या युद्धांचा शेवट हे कामगार सत्तेचे स्वाभाविक परिणाम असतात.

भांडवलदारी राजवटीत जे काम करतात ते दरिद्री रहातात आणि जे मालक असतात ते ऐश्वर्यात लोळतात. कामगारराज्यातच प्रथम, श्रमिकांचे श्रम हे त्यांचे जीवन संपन्न व सुखमय बनविण्याचे साधन ठरते,–असे अनेक बहुमोल विचार कम्युनिस्ट जाहिरनाम्यात मांडण्यात आलेले आहेत.

जाहिरनाम्यात त्या काळच्या अशास्त्रीय समाजवादी विचारांवर व चळवळींवर टीका आहे—ती अद्यापही जुनी झालेली नाही; कामगार चळवळीतील सद्य:कालीन अपप्रवृत्तींना ती आजही लागू पडते.

जाहिरनाम्यात कामगारवर्गाच्या पक्षाचा कार्यक्रम व कार्यपद्धतीचे विवेचन आहे. कम्युनिस्ट पक्ष कामगारवर्गाच्या तावडतोबीच्या उद्दिष्टांसाठी, त्या त्या वेळच्या त्याच्या हिताच्या दृष्टिकोनातून काम करतो; परंतु आजच्या चळवळीतच तो त्या चळवळीच्या भवितव्याचेही संरक्षण करतो. राजकीय व सामाजिक क्षेत्रातील प्रतिगामी पद्धतिविरुद्ध असलेल्या प्रत्येक पुरोगामी, क्रांतिकारी चळवळीला कम्युनिस्टांनी मदत केली पाहिजे.

गुलामगिरीच्या शृंखला तोडून विजयश्री प्राप्त करून घेण्यासाठी पुढे येण्याची हाक कामगारवर्गाला देऊन जाहिरनाम्याने, " जगातील कामगारांनो एक व्हा ! " या घोषणेचा उच्च स्वराने उद्घोष केला आहे.

" कम्युनिस्ट जाहिरनामा " जन्माला येऊन १०० वर्षे पूर्ण होऊन गेली आणि त्याच्यातील काही विधाने इतिहासाने तेवढी बरोबर ठरविली नाहीत. तरी या १०० वर्षांतील घडामोडींनी जाहिरनाम्यातील विचारांना व तत्त्वांना दुजोराच दिला आहे. जाहिरनाम्याच्या द्रष्ट्यांना जगभर कामगारक्रांतीचा विजय क्षितिजावर दिसत होता तितक्या लवकर तो आला नाही, पण त्यामुळे जाहिरनाम्यातील विचारांची मूळ दिशा मुळीच अशास्त्रीय ठरली नाही.

जगाच्या आरंभापासूनच्या इतिहासाचे सार, कामगारवर्गाच्या क्रांतिकारक अनुभवांचा निष्कर्ष आणि भावी समाजरचनेचे अमोघ शस्त्र असा हा कम्युनिस्ट जाहिरनामा मार्क्सच्या लेखणीतून उतरला त्यावेळी युरोपीय राष्ट्रे क्रांतीच्या उंबरठ्यावर उभी होती.

## १५. युरोपमधील १८४८ च्या क्रांतीचे उठाव

२४ फेब्रुवारी १८४८ रोजी फ्रान्समध्ये राजाविरुद्ध बंड सुरू झाले. त्याचे पडसाद युरोपमधल्या सर्व राष्ट्रांतून उठले. बेल्जिअमचा लिओपोर्ड राजा त्यामुळे

इतका घाबरला की त्याने आपणहून सिंहासनाचा त्याग करण्याची तयारी दाखविली. परंतु भांडवलदारांनी दयाळू होऊन त्याला जीवदान दिल्यानंतर त्याने सर्वत्र जोराने दडपशाहीला प्रारंभ केला. जाहीर सभांवर बंदी बसवून त्या उधळण्यात आल्या आणि सर्व परकीय निर्वासितांच्या मागे सहस्र पोलिसांना पिटाळण्यात आले. त्या धुमाळीत मार्क्सला व त्याच्या पत्नीला—जेनीला—मुद्दा पकडून तुरुंगात घालण्यात आले. पुढे दोघांचीही मुक्तता करण्यात आली; परंतु त्यांच्यावरचा हद्दपारीचा हुकूम मात्र रद्द करण्यात आला नाही. ब्रुसेल्समधून हद्दपार झालेला मार्क्स क्रांतीने गजबजलेल्या पॅरिसमध्ये जाऊन राहिला. तेथे कम्युनिस्ट लीगच्या मध्यवर्ती कमिटीच्या कार्याची धुरा त्याने आपल्या शिरावर घेतली आणि देशोदेशींच्या चळवळींना व उठावांना मार्गदर्शन केले.

यावेळी पॅरिसमध्ये जर्मन कवी हरवेग याने एका कटाची तयारी चालविली होती; पॅरिसमध्ये रहाणाऱ्या जर्मन कामगारांनी जर्मनीवर सशस्त्र हल्ला करून तेथे क्रांती घडवून आणावयाची असा हा कट होता. या साहसबाजीला मार्क्सने विरोध केला आणि जर्मन कामगारांनी व कम्युनिस्ट लीगच्या कार्यकर्त्यांनी एक एकट्याने जर्मनीत शिरून क्रांतिकारक चळवळीस चालना द्यावी, असा आदेश दिला; आणि त्यानुसार लीगचे बहुतेक सर्व कार्यकर्ते जर्मनीत घुसले. मार्क्सही काही सहकाऱ्यांसह ऱ्हाईनलंडमध्ये शिरून कोलोन येथे जाऊन राहिला.

निर्वासितांनी जर्मनीत घुसण्याच्या या मोहिमेला प्रारंभ करण्यापूर्वी जर्मनीतील क्रांतीच्या तावडतोबीच्या मागण्या मांडणारा जाहिरनामा कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने मार्क्स–एंगल्स यांनी तयार केला. जर्मनीतील क्रांतीने पार पाडावयाची मुख्य कार्ये त्यात पुढीलप्रमाणे मांडण्यात आलेली होती : संयुक्त लोकशाहीवादी प्रजासत्ताक जर्मनीची स्थापना; जनतेला सार्वत्रिक मतदानाचा व शस्त्रे धारण करण्याचा हक्क; सर्व सरंजामदारी करांवर व सेवाचाकरीवर संपूर्ण बंदी; राजेरजवाडे व सरदार–सरंजामदार यांच्या जागीरदाऱ्यांचे राष्ट्रीयीकरण, खाणी–रेल्वे वगैरेंचे राष्ट्रीयीकरण; चढत्या उत्पन्न–कराची आकारणी; इत्यादी. हा कार्यक्रम जनतेत लोकप्रिय करण्याचे कार्य कार्यकर्त्यांवर सोपविण्यात आले.

कोलोनमध्ये कम्युनिस्ट कार्यकर्त्यांचा एक चांगलाच गट तयार झाला होता. त्याच्या सहाय्याने मार्क्सने "लोकशाही लढ्यांचे मुखपत्र" काढण्याची तयारी केली. त्याप्रमाणे, मार्क्सच्या संपादकत्वाखाली "नॉये ऱ्हाइनिशे

त्सायटुंग" चा पहिला अंक १ जून १८४८ रोजी प्रसिद्ध झाला; आणि क्रांतिकारक चळवळींना मार्गदर्शन करण्याचे कार्य या मुखपत्राद्वारे सुरू झाले.

मार्चमध्ये झालेल्या उठावांच्या आधारावर जर्मनीत भांडवलदारांच्या हातात सत्ता आली होती तरी त्यांना अद्याप राजेशाहीचे वरदान सोडवत नव्हते, जर्मन-ऐक्याचा व लोकसत्ता स्थापण्याचा कार्यक्रम हातात घेण्याचा धीर होत नव्हता. उलट, फ्रँकफोर्ट राष्ट्रीय विधानसभेने ऑस्ट्रियाच्या राजपुत्राला राजप्रमुख नेमण्याचा निर्णय घेतला.

बर्लिनमध्ये जनतेने उठाव करून प्रशियाच्या राजाच्या सैनिकांचा पाडाव केला होता, परंतु भांडवलदार डळमळीतच राहिले. त्याचा फायदा घेऊन इंग्लंडला पळून गेलेला प्रशियाचा राजपुत्र परत आला. त्याच्या निषेधार्थ बर्लिनच्या कामगारांनी उठाव केला आणि शस्त्रागारावर हल्ला चढविला. बर्लिनच्या विधान-सभेने आता लोकशाहीला पोषक ठरणारी बाजू घ्यावी, सरंजामदारी-पोलिसी राजवटीबरोबर तडजोड करण्याची भूमिका सोडून द्यावी, असा इशारा 'नॉये ऱ्हाइनिशे त्सायटुंग' मधील लेखातून मार्क्सने दिला. स्वतःच्या हितसंबंधांशी निगडित असलेल्या शेतकऱ्यांबरोबर कायमचे संबंध बांधल्याशिवाय आणि जनते-बरोबर निदान तात्पुरती मैत्री केल्याशिवाय, भांडवलदारी क्रांती सरंजामदारांवर व प्रतिगाम्यांवर कुरघोडी करून विजयी होऊ शकणार नाही, ही भूमिका मार्क्सने या लेखात स्पष्टपणे मांडली.

याच सुमारास पॅरिसच्या रस्त्यात चार दिवस लढाई चालून फ्रेंच कामगारांचा पराजय झाला. "लोकशाहीने कोणाची बाजू घ्यावी ?" ह्या संबंधी लिहिलेल्या लेखात मार्क्सने पॅरिसच्या कामगार हुतात्म्यांचा गौरव करून, त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी आपण राहिले पाहिजे, असे अत्यंत प्रभावीपणाने मांडले. या लेखामुळे वाचकांच्या विचारांना नवी दिशा मिळाली. पण त्सायटुंगच्या शेअरहोल्डर्समध्ये घबराट निर्माण झाली—इतका त्या लेखातील प्रत्येक शब्द तिखट व तीक्ष्ण होता.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात त्सायटुंगच्या टीकेचा मुख्य रोख रशियातील झारशाही-विरुद्ध होता. युरोपात लोकशाही क्रांतीचा विजय होऊ लागला तर ती धुळीला मिळविण्यासाठी क्रांतीचा शत्रू असलेला रशिया पुढे सरसावेल असे मार्क्सने भविष्य केले होते आणि ते खरे ठरले. प्रशियन साम्राज्याचे वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी प्रशियाच्या राजाला झारने सैन्याची गुप्तपणे मदत देऊ केली; आणि पुढे हंगेरीची क्रांती चिरडण्यासाठी झारने प्रत्यक्षच मदत करून

मार्क्सच्या विचारांची सत्यता जगाच्या नजरेस आणली. झारची सत्ता अबाधित असेपर्यंत प्रशिया–ऑस्ट्रियाच्या राजेशाह्या नष्ट होणार नाहीत आणि प्रशिया व ऑस्ट्रियाच्या राजेशाह्या नष्ट झाल्याशिवाय जर्मन क्रांती विजयी होणार नाही; म्हणून जर्मनीने रशियाविरुद्ध युद्ध पुकारले पाहिजे–असा मार्क्सचा आग्रह होता. मात्र परराष्ट्रांबद्दल द्वेषभावना पसरविण्याच्या विरुद्धही त्याने त्याचवेळी आग्रहपूर्वक विचार मांडले आणि पोलंड, इटली, व हंगेरीच्या लोकांना पाठिंबा देण्याची मोहीम सुरू केली.

या वेळी ऑस्ट्रिया, प्रशिया व रशिया या तीन देशांच्या साम्राज्यवाद्यांनी पोलंडचे तुकडे करून ते वाटून घेतले होते. युरोपांतील क्रांतिकारक परिस्थितीचा परिणाम होऊन, प्रशियाने गिळंकृत केलेल्या पोलंडने स्वातंत्र्याच्या काही मागण्या पुढे मांडल्या. बर्लिन सरकारने एकीकडे या स्वातंत्र्य चळवळीला आमिष दाखविले आणि त्याच वेळी तेथे जर्मन आणि यहुदी यांच्यात भांडणे लावून दिली. या यादवी युद्धासंबंधी मार्क्सने लिहिलेल्या लेखात प्रशियन सैनिकांच्या अत्याचारांवर व साम्राज्यवाद्यांच्या कारवायांवर पुरा प्रकाश पाडला आहे.

पण या प्रश्नावर मार्क्सने मुख्य लेखन केले ते जर्मन भांडवलदारांच्या भूमिकेबद्दल. प्रशियन ( बर्लिन ) सरकारने पोलिश जनतेला दिलेल्या आश्वासनांचा भंग करून पोलंडचे छोटे छोटे तुकडे जर्मनीत घातले होते. तेथल्या प्रतिनिधींना फ्रँकफोर्ट विधानसभेत बसविण्याच्या प्रश्नावर जेव्हा चर्चा सुरू झाली तेव्हा मार्क्सने या प्रश्नावर ८–९ लेख लिहिले. प्रशियन लष्करशहांची खुशामत न करण्याचे धाडस जर्मन भांडवलदारांना अखेर झालेच नाही आणि त्यांनी या प्रतिक्रांतीला संमती दिली. पोलंडच्या क्रांतीचा हा घात जर्मनीच्या क्रांतीचाही घात होता, कारण झारविरुद्धच्या लढ्यातील एक हत्यार त्यामुळे निकामी झाले होते, हे दाखवून देऊन मार्क्सने भांडवलदारांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले.

ऑगस्टच्या अखेरीस व सप्टेंबरच्या सुरवातीस मार्क्सने बर्लिन व व्हिएन्नाला जाऊन क्रांतिकारक शक्तींची जमवाजमव करण्याचा प्रयत्न केला; परंतु सप्टेंबर-मध्ये घडलेल्या घटनांनी फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या क्रांतिपर्वातील पहिला भाग खलास केला.

हॉलष्टैन व श्लेज्वीग या डेन्मार्कशी संबंधित असलेल्या पण संस्कृतीने मुख्यतः जर्मन असलेल्या प्रांतांवरून डेन्मार्क व जर्मनी यांचे भांडण जुंपले. या भांडणात रशिया–प्रशिया व ब्रिटन या बड्या सत्तांनी डेन्मार्कच्या बाजूने हस्तक्षेप केला.

आणि प्रशियाने जर्मनीच्या वतीने तह करून टाकला. या संघर्षातही भांडवलदारांनी प्रथम जोर केला आणि नंतर माघार घेतली. जनतेच्या मदतीने रशिया–प्रशिया ब्रिटनविरुद्ध युद्ध पुकारले जावे, असा आदेश "त्सायटुंग" ने दिला. त्याच्या परिणामी फ्रँकफोर्टच्या ५० मैलांच्या परिसरातून हजारो लोक क्रांतीच्या पूर्तीसाठी जमू लागले. परंतु ऐन वेळी विधानसभेने कच खाल्ली आणि क्रांतीचे नेतृत्व करण्याऐवजी स्वत:चे विसर्जन केले. त्याच वेळी, मार्क्सने भाकित केल्याप्रमाणे, बर्लिनचे मंत्रिमंडळही गडगडले आणि तेथे लष्करी नोकरशाहीची स्थापना झाली. अशा रीतीने, केवळ संसदीय लोकशाहीवर अवलंबून राहिल्यामुळे आणि जनतेला धिक्कारल्यामुळे भांडवलदारी क्रांती अस्ताला गेली आणि प्रतिक्रांतीचा विजय झाला.

जागृत शक्तींचा बालेकिल्ला असलेल्या ऱ्हाईनलंडची प्रतिक्रांतिकारकांना फार धास्ती वाटत होती. प्रशियन सैन्याचा तिसरा हिस्सा ऱ्हाईनलंडमध्ये घुसविण्यात आला. त्या परिस्थितीत तुरळक तुरळक उठाव करणे निरुपयोगी होते; लोकशाही शक्तींची प्रांतव्यापी जमवाजमव करणे आवश्यक होते.

जूनमध्ये फ्रँकफोर्टमध्ये ८० लोकशाहीवादी संस्थांची परिषद झाली आणि त्यांनी मध्यवर्ती संघटना उभारण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर कोलोन येथे ऱ्हाईनलंड वेस्टफालिया विभागाची संयुक्त मध्यवर्ती कमिटी स्थापन करण्यात आली. तिचेही मार्गदर्शन मार्क्सच करीत असे.

फ्रँकफोर्ट–बर्लिनमध्ये विजयी झालेल्या प्रतिक्रांतिकारकांना जनतेला चिथावून रस्त्यावर आणण्याची व रक्तपात घडवून आणण्याची खुमखुमी होती. त्यांनी त्सायटुंगच्या संपादकांविरुद्ध व लोकशाही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध खटले सुरू केले. परंतु आरोप इतके तकलादी होते की सर्वांची निर्दोष म्हणून सुटका होणे अपरिहार्य झाले. मार्क्सने त्याच वेळी प्रतिक्रांतिकारकांच्या डावाची जनतेला कल्पना दिली आणि सावधगिरीचा इशारा दिला. तरीसुद्धा अधिकाऱ्यांची कारस्थाने चालूच राहिली आणि २७ सप्टेंबरला कोलोनमध्ये लष्करी कायदा पुकारण्यात आला, त्सायटुंगच्या प्रकाशनावर बंदी घालण्यात आली.

हे दिवस त्सायटुंगच्या दृष्टीने मोठे कष्टाचे ठरले; संपादकमंडळावरील एंगल्ससह अनेक सभासदांना अटक टाळण्यासाठी परदेशात निघून जावे लागले; पत्राची सर्वच जबाबदारी मार्क्सवर पडली. आर्थिक अडचणीतून मार्ग काढण्यासाठी याने वडिलांच्या संपत्तीपैकी मिळणाऱ्या वाट्याच्या आधारावर कर्ज काढले आणि

त्सायटुंग व प्रचारकार्य जिवंत ठेवले. या गोष्टीचा खुद्द मार्क्सने कधीच, कुठेच उल्लेख केलेला नाही.

या काळात मार्क्सचे वैयक्तिक जीवन नेहमीप्रमाणेच असुरक्षित व अनिश्चित होते. मार्च-क्रांतीनंतर जर्मन राष्ट्रीय विधानसभेने सर्व जर्मन निर्वासितांना मतदानाचे व नागरिकत्वाचे हक्क देण्याचे ठरविले होते. त्यामुळे प्रशियन नागरिक म्हणून राहण्याची संधी मिळण्याची शक्यता मार्क्सच्या बाबतीतही निर्माण झाली. त्याने केलेल्या अर्जाला कोलोन शहर कौन्सिलने मान्यताही दिली. परंतु त्सायटुंग-मधील लेखन सरकारला पचले नाही आणि २२ ऑगस्ट रोजी मार्क्सला नागरिकत्व नाकारण्यात आल्याचे आणि तो परकीय असल्याचे कळविण्यात आले.

इतकी अनिश्चितता असताही मार्क्सने जेनीला व मुलांना कोलोनमध्ये आणले होते. आता त्यांना जेष्ठ कन्या जेनीच्या जोडीला लॉरा नावाची मुलगी व एडगर नावाचा मुलगा होता. याशिवाय हेलन डेमुथही कुटुंबातील एक झालेली होती; जेनीच्या माहेरच्या या मोलकरणीने मार्क्स कुटुंबाला सर्व सुखदु:खाच्या काळात अत्यंत निष्ठेने आधार दिला; मार्क्सच्या घरगुती जबाबदाऱ्यांचा मोठा हिस्सा हेलनने आणि पुढच्या काळात आर्थिक जबाबदारीचा हिस्सा एंगल्सने स्वीकारल्यामुळेच मार्क्सला थोडेफार स्वास्थ्य मिळून लेखन करता आले; हे पुढे ओघाने येईलच.

## १६. पुन्हा एकदा हद्दपारीची कुऱ्हाड

ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्ना येथील कामगार लढ्याच्या मार्गावर असल्याची गुणगूण लागताच मार्क्स ऑगस्टच्या अखेरीस तेथे गेला होता. हंगेरीतील स्वातंत्र्यलढा चिरडण्यासाठी ऑस्ट्रियन सरकार पाठवीत असलेल्या सैन्याला व्हिएन्नाच्या कामगारांनी ६ ऑक्टोबर रोजी रोखून धरले आणि बंडाचा झेंडा उभारला.

कोलोनमधील लष्करी कायद्याच्या काळात बंद झालेले त्सायटुंग १२ ऑक्टोबरला सुरू झाले तेव्हा या नव्या क्रांतिकारक परिस्थितीमुळे, आणि जर्मन कवी व क्रांतिकारक फर्डिनांड फ्रायलिग्राथ सहकारी बनला होता म्हणून मार्क्स फार आनंदात होता.

जर्मनीच्या कामगारांनी स्वदेशातील प्रतिक्रांतीचा पराभव करून व्हिएन्नाच्या शूर स्वातंत्र्ययोद्ध्यांना मदत करावी, असा प्रभावी आवाज मार्क्सच्या लेखनातून व फ्रायलिग्राथच्या काव्यातून त्सायटुंगमध्ये उमटू लागला.

परंतु ऑस्ट्रियाच्या भांडवलदारांनी क्रांतीचा विश्वासघात केला, शेतकऱ्यांनी पाठिंबा दिला नाही आणि कामगार–विद्यार्थी- छोटे भांडवलदार यांचा हा उठाव ३१ ऑक्टोबर रोजी व्हिएन्नात लष्कर घुसवण्यात यश मिळवून चिरडण्यात आला.

व्हिएन्नातील या घटनेच्या मागोमाग बर्लिनमधील विधानसभेवर गंडांतर आले. प्रशियन सरकारने विधानसभा बर्लिनमध्ये न भरविता ब्रँडेन्बुर्ग या लहान शहरात हलविण्याचा हुकूम दिला आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी बर्लिनमध्ये लष्कर घुसविले. विधानसभेने बर्लिन सोडण्यास नकार दिला परंतु बर्लिनच्या कामगारांनी पुरस्कार केलेले सशस्त्र प्रतिकाराचे धोरण न स्वीकारता तिने "सहिष्णु प्रतिकारा" चे धोरण स्वीकारले. लष्कर त्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हुसकावून लावीत असतानाच विधानसभेने एक चांगली गोष्ट केली; बर्लिनमध्ये विधानसभा अधिकृतपणे भरायला लागेपर्यंत सरकारला कर वसूल करण्याचा हक्क नाही, असे तिने जाहीर केले.

'त्सायटुंग' ने ही घोषणा उचलून धरली आणि निःशस्त्र प्रतिकाराच्या जोडीला जनतेने सशस्त्र प्रतिकारास प्रारंभ करावा अशी हाक दिली. खास पत्रक काढून कर-वसुलीच्या प्रतिकारासाठी कशा संघटना उभाराव्यात याचा कार्यक्रम प्रादेशिक लोकशाही संघटनेने दिला; शस्त्रास्त्रे पुरविण्याचे आश्वासन दिले. अशा रीतीने वास्तविक जे काम विधानसभेने करावयास पाहिजे होते ते लोकशाही संघटनेने हातात घेतले. इतक्यात विधानसभेच्या भीरुतेचा फायदा घेऊन सरकारने ५ डिसेंबरला विधानसभा बरखास्त केली. यानंतर ऱ्हाईनलंडमध्ये लष्कर घालण्यात आले आणि लोकशाही संघटनेतर्फे काढण्यात आलेल्या वरील पत्रकावर सह्या करणाऱ्यांवर खटले भरण्यात आले. मार्क्सने स्वतःची बाजू स्वतः मांडली आणि न्यायाधीशांना निरुत्तर करून सुटका करून घेतली ( ७ फेब्रुवारी १८४९ ).

या वेळेपर्यंत जर्मन कामगार एक संघटित शक्ती म्हणून पुढे येऊ लागला होता हे लक्षात घेऊन मार्क्स व त्याचे सहकारी विल्हेल्म् वोल्फ, शापर, हरमान इत्यादींनी लोकशाही संघटनेच्या ऱ्हाईन जिल्हा कमिटीच्या सभासदत्वाचे राजिनामे दिले; त्याबरोबर कोलोन वर्कर्स ॲसोसिएशनही तिच्यातून बाहेर पडली आणि सामाजिक लोकशाहीचे तत्व मान्य असलेल्या सर्व कामगारवर्गीयांची परिषद मेमध्ये घेण्याची तयारी सुरू झाली.

इतक्यात पुन्हा एकदा क्रांतीची ठिणगी पेटली. फ्रँकफोर्ट विधानसभेने तयार केलेली घटना प्रशियाच्या राजाला पसंत न पडून त्याने छोट्या छोट्या प्रांतांना

पुन्हा एकदा राजेशाहीच्या कब्जात घेण्याचा प्रयत्न केला. त्याच्या प्रतिकारासाठी सॅक्सनी, बाडन व बव्हेरिया-पॅलेटिनेट या जर्मनीच्या संस्थानात उठाव झाले. ऱ्हाईनलंडमध्येही तुरळक उठाव झाले परंतु ते सर्व चिरडण्यात आले.

क्रांतिकारक परिस्थितीचा जोर वाढू लागताच 'त्सायटुंग' चा जोरही वाढला होता. त्यानंतर मार्क्सला हद्दपार करण्यासाठी बर्लिन सरकार टपून बसले होते. अखेरीस ११ मे रोजी मार्क्सला त्सायटुंगच्या "भयंकर प्रवृत्ती" बद्दल जबाबदार धरून कोलोनहून हद्दपार करण्यात आले. हा हुकूम निघाला त्यावेळी मार्क्स कोलोनमध्ये नव्हता; त्सायटुंगची ढासळलेली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी तो पैसे जमवीत होता. मार्क्सच्या हद्दपारीमुळे त्सायटुंगचे जीवनही संपुष्टात येणार होते. म्हणून १९ मे १८४९ चा त्सायटुंगचा अंक "लाल अंक" म्हणून काढण्यात आला; त्यात जगाच्या पाठीवर कोठेही असलो तरी "कामगारवर्गाची मुक्तता" हेच आपले ध्येय राहील असे मार्क्सने जाहीर केले.

त्सायटुंगचा संसार आवरताना मार्क्सने देणेकऱ्यांची पै न् पै स्वतःजवळ असेल नसेल ते सर्व विकून चुकती केली; फक्त घराण्यातील चांदीच्या वस्तू त्याने स्वतःजवळ ठेवल्या; फ्रँकफोर्टला गेल्यानंतर त्या गहाण टाकून पैसे उभे केले, तेव्हा त्याच्या कुटुंबाला उभे रहाण्यास जागा मिळाली.

फ्रँकफोर्टहून मार्क्स बाडन व पॅलेटिनेट या उठावांच्या शहरात गेला. तेथे लोकशाही संघटनेने त्याला पॅरिसला भरणाऱ्या तेथील "राष्ट्रीय विधानसभे"च्या क्रांतिकारक गटाच्या परिषदेला प्रतिनिधी म्हणून जाण्यासाठी दिलेला आदेश मिळाला. परत येत असताना त्याला व एंगल्सला उठावात भाग घेतल्याच्या आरोपावरून अटक झाली. सुटका होताच मार्क्स पॅरिसला गेला; तेथे परिस्थिती चांगलीच तापलेली होती; परंतु मार्क्स ज्या परिषदेला गेला तिची उठावाची योजना अगदीच पडली आणि परिणामी मार्क्सवर पुन्हा एकदा अरिष्ट आले. या वेळी १९ जुलै १८४९ रोजी, त्याला फ्रान्समधल्या अत्यंत घाणेरड्या जिल्ह्यात जाऊन रहाण्याचा पोलिस खात्याने हुकूम दिला. फ्रेंच पोलिसांच्या या खुनी डावाला बळी न पडण्याचा व फ्रान्स सोडून जाण्याचा मार्क्सने निर्णय घेतला.

२३ ऑगस्ट १८४९ रोजी मार्क्स लंडनला जाण्यास निघाला; प्रवासापुरते पैसे जवळ नव्हते, म्हणून १५ सप्टेंबरपर्यंत जेनीला व मुलांना लंडनला जाण्यासाठी निघता आले नाही. या हद्दपारीच्या वेळी प्रवासात सोबतीला आलेला हा

निर्धनतेचा राक्षस पुढे फार काळपर्यंत मार्क्सच्या मानगुटीवर बसला; पण मार्क्सला अगर त्याच्या कुटुंबाला तो वाकवू शकला नाही.

## १७. क्रांती का थंडावली ?

मार्क्स लंडनला जाऊन पोचला आणि त्याने एंगल्सलाही तेथे बोलावून घेतले. ३–४ महिन्यात जागतिक युद्ध सुरू होईल अशी मार्क्सची कल्पना होती. त्यांनी नवे वर्तमानपत्र काढण्याची तयारी केली; त्यासाठी शेअर्स काढून ते विकण्यात आले. सुरवातीला जर्मन भाषेतून, ८० पानांचे मासिक प्रसिद्ध करण्याचे ठरले. मासिकाचे नाव "न्यू ऱ्हाईनिशे त्सायटुंग — आर्थिक व राजकीय घडामोडींचा आढावा (रिव्ह्यू)" असे ठेवण्यात आले. या काळात मार्क्स संकटाच्या भोवऱ्यात इतका सापडलेला होता की केवळ तो म्हणूनच त्यातून डोके वर करून कार्य करू शकला.

रिव्हयूच्या पहिल्या तीन अंकांत मार्क्सने, फेब्रुवारीत पॅरिसमध्ये कामगारांनी उठाव केल्यापासून ते हंगेरीच्या स्वातंत्र्यलढ्याची झारने कत्तल केली त्या काळापर्यंतच्या क्रांतिकारक उठावासंबंधीचे टीकात्मक लेख प्रसिद्ध केले आणि या लढ्यांमागे असलेल्या आर्थिक परिस्थितीच्या गुंतागुंतीचे विवरण केले.

रिव्हयूंत प्रचलित आर्थिक घडामोडींवरील लेखन बरेच येत असे. फेब्रुवारीच्या अंकात "फेब्रुवारी क्रांतीपेक्षा अधिक महत्त्वाची घटना" म्हणून कॅलिफोर्नियात सापडलेल्या सोन्याच्या खाणींचा उल्लेख करण्यात आलेला असून तो अत्यंत रास्त आहे. या सोन्याच्या खाणींमुळेच नजिकच्या काळातील फ्रेंच कामगारांचा क्रांतिकारक उठाव त्यावेळी बाजूला पडला.

हांबुर्गहून १८५० मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या या रिव्हयूचे एकंदर ६ अंक निघाले. त्यांत मार्क्सने १८४८–४९ या सालात फ्रान्स व जर्मनी या दोन देशांत घडलेल्या क्रांत्यांचे विश्लेषण व फलश्रुती दिली आहे.

दरम्यानच्या काळात लंडनमधील निर्वासित व मार्क्स–एंगल्स यांच्यात वितुष्ट निर्माण झाले होते. लंडन हे सर्व देशांतील निर्वासितांचे आश्रयस्थान बनलेले होते. त्यांच्यात काम करण्याचा मार्क्सने प्रयत्न केला; परंतु त्यांचे डोळे सदोदित मायदेशाकडे लागलेले असत. आपल्या देशात क्रांती होऊन परत जावयास मिळावे या आशेने ते भारलेले असत. त्यामुळे त्यांतून काहीच निष्पन्न झाले नाही. सर्व मंडळी फार तर कागदी ठरावापर्यंत एकत्र रहात, परंतु एखादा प्रत्यक्ष कार्यक्रम

हातात घेण्याचा प्रश्न आला की त्यांच्यातील भांडणांना ऊत येई. भांडणांचे मूळ कारण त्यांच्यातील वर्गभेद हे आहे, ही गोष्ट लक्षात येताच ही भांडणे कधीच सुटणार नाहीत हे जाणून मार्क्सने आपले लक्ष त्यांच्यातून काढून घेतले.

कम्युनिस्ट लीगच्या कामाला १८४९ च्या हिवाळ्यात प्रारंभ झाला होता. लीगचे बहुतेक सर्व सभासद लंडनला येऊन पोहोचले होते आणि त्यांच्यात नव्यांचीही भर पडली होती. १८५० च्या मार्चमध्ये जर्मनीत छोट्या भांडवलदारांच्या नेतृत्वाखाली क्रांतीचा उठाव होणार अशी चिन्हे दिसू लागली तेव्हा लीगच्या वतीने मार्क्स–एंगल्सने एक जाहीरनामा काढून जर्मनीच्या कामगार–वर्गाचे धोरण काय असावे याची आखणी करून दिली. हा जाहिरनामा " कम्युनिस्ट लीगच्या मध्यवर्ती कमिटीचा जाहिरनामा " म्हणून प्रसिद्ध आहे. या जाहिरनाम्यात मार्क्स व एंगल्स यांनी १८४८–४९ साली जर्मनीत झालेल्या क्रांतीचे विश्लेषण केले असून भांडवलदारी लोकशाहीवाद्यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या सरंजामशाहीविरोधी क्रांतीत कामगारवर्गाने कोणती भूमिका घ्यावी या विषयी त्यात अत्यंत बहुमोल विचार व्यक्त केले आहेत.

या जाहिरनाम्यात म्हटले आहे की, " आज लोकशाहीवादी छोटे भांडवलदार हासुद्धा एक पिळलेला वर्ग आहे. म्हणूनच ते कामगारवर्गाशी सहकार्य करण्यास तयार झाले आहेत. कामगारवर्गाने त्यांच्या राजकीय संघटनात विलीन व्हावे असा त्यांचा प्रयत्न असतो. कामगारवर्गाने याला मुळीच बळी पडता कामा नये. कामगारवर्गाने आपल्या संघटनांचे, आपल्या राजकीय पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व राखून लोकशाहीवादी छोट्या भांडवलदारांशी सहकार्य करावे. जेव्हा जेव्हा ते सरंजामदारी प्रतिगाम्यांविरुद्ध निकराने लढतील तेव्हा त्यांना संपूर्ण पाठिंबा द्यावा. त्यांच्या नेतृत्वाखाली क्रांती यशस्वी झाली व राष्ट्रीय प्रातिनिधिक विधानसभेची निवडणूक घेण्याचा प्रसंग आला तर कामगारवर्गाने त्या निवडणुकीत भाग घ्यावा. आपले स्वतंत्र उमेदवार उभे करावेत; आपले स्वतंत्र राजकीय अस्तित्व व पक्ष बळकट करावेत. कारण क्रांती यशस्वी होऊन हाती सत्ता येताच हे लोकशाहीवादी छोटे भांडवलदार कामगारांविरुद्ध उलटतील, सरंजामशाहीची पाळेमुळे उखडून काढण्याच्या क्रांतिकारक कार्याला अडथळा आणू पाहतील. अशावेळी कामगार-वर्गाने आपल्या स्वतंत्र राजकीय पक्षसंघटनेच्या जोरावर सरंजामशाहीचे निर्मूलन करण्याचे क्रांतिकार्य पुढे रेटले पाहिजे. त्यांना त्यावेळी ताबडतोब कम्युनिस्ट घोषणा व मागण्या पुढे मांडता येणार नाहीत परंतु भांडवलशाही पिळणुकीवर

बंधने घालण्याच्या, कामगारवर्गाला संघटनास्वातंत्र्य देण्याच्या मागण्या त्यांनी पुढे मांडल्या पाहिजेत व त्या मान्य करून घेण्यासाठी झगडले पाहिजे. थोडक्यात म्हणजे कामगारवर्गाने "लोकशाहीवादी छोट्या भांडवलदारांच्या भोंदू घोषणांनी भुलून न जाता आपला स्वतंत्र राजकीय पक्ष संघटित केला पाहिजे व 'अखंड क्रांती' (रेव्होल्यूशन इन् पर्मनन्स) ही त्याची रणगर्जना असली पाहिजे."

लेनिनने याच मौलिक विचारांचा विकास केला व पुढे रशियातील पहिल्या क्रांतीच्या [ १९०५ ] अनुभवातून भांडवलदारी–लोकशाही क्रांतीचा समाजवादी क्रांतीत विकास करण्याचा सिद्धांत काढला.

परंतु अपेक्षेप्रमाणे जर्मनीत अगर फ्रान्समध्ये जनता उठाव करू शकली नाही. क्रांतिकारक परिस्थितीत ओहटी निर्माण झालेली आहे, हे अनुमान मार्क्सने या वेळी काढले. परंतु इतर निर्वासित-नेत्यांना ते पटेना आणि उठाव व्हावेत म्हणून ते आततायीपणाने खटपट करू लागले. या प्रश्नावर कम्युनिस्ट लीगच्या मध्यवर्ती मंडळात उघड फूट पडली आणि ६ विरुद्ध ४ असे मतदान झाले. मार्क्सच्या बाजूने बहुमत पडल्यानंतरही त्याने फाटाफूट टाळण्याचा प्रयत्न केला. परंतु अल्पमतवाल्यांनी तो मानला नाही. या वेळी जर्मन कामगार शिक्षण मंडळात अल्पमतवाल्यांचा वरचष्मा असल्यामुळे मार्क्सने व त्याच्या निकट सहकाऱ्यांनी त्याचा राजिनामा दिला. ह्या सर्व घटना १८५० च्या नोव्हेंबरमध्ये प्रसिद्ध झालेल्या रिव्ह्यूत सविस्तरपणे देण्यात आल्या आणि रिव्ह्यूचे प्रकाशन बंद करण्यात आले. या अखेरच्या अंकात क्रांतिकारक उठावांना ओहोटी लागण्याचे आर्थिक कारण सांगण्यात आले आणि जोपर्यंत तेव्हा सुरू असलेला भांडवलदारी उत्पादनाचा उत्कर्ष कायम होता, आणि भांडवलशाहीतील अंतर्गत अरिष्ट जोरदार झाले नव्हते तोपर्यंत क्रांतिकारक परिस्थिती पुन्हा निर्माण होणार नाही, असे विचार मांडले होते

## १८. लुई बोनापार्टच्या लष्करी कटाचा अर्थ

यानंतर मार्क्सच्या जीवनात एका नव्या कालखंडाला प्रारंभ झाला. आता मार्क्सने आपले लक्ष मुख्यत: शास्त्रीय संशोधनावर व लेखनावर केंद्रित केले. उदरनिर्वाह होणेही या काळात कठीण झाले होते. त्या विचारापायी मार्क्सला सोसाव्या लागणाऱ्या यातना पाहून जेनीचे हृदय तिळतिळ तुटत होते. मार्क्स कुटुंब अत्यंत दारिद्र्यात दिवस काढीत होते. जेनीला झालेल्या मुलाचे पालनपोषण अगर औषधपाणी होऊ शकले नाही; त्यामुळे एक वर्षभर आजारीपणाचे हाल

सोसून तो बिचारा १८४९ च्या नोव्हेंबरमध्ये मृत्युमुखी पडला. लंडनमधील डीन स्ट्रीटवरील एका दोन खोल्यांच्या जागेत ही सर्व मंडळी रहात होती. आर्थिक हलाखी अधिकाधिक वाढत होती. असंख्य जर्मन निर्वासित बेकार हिंडत होते. रिव्ह्यूसाठी खर्ची पडलेला पैसा व शक्ती संसाराला जराही आधार देऊ शकली नाहीत. अखेर फ्रँकफोर्टमध्ये गहाण पडलेल्या चांदीच्या वस्तू विकून टाकण्यात आल्या; तेव्हाच मग मार्क्सला काही काळ लेखन वाचनासाठी फुरसत मिळाली. मार्क्सला पैशांची मदत करता यावी म्हणून १८५० च्या ऑक्टोबरमध्ये एंगल्स मँचेस्टरला कामधंद्यासाठी निघून गेला.

१८५० च्या ऑगस्टमध्ये मार्क्सने लिहिलेल्या एका पत्रावरून जेनी फार आजारी झाल्याचे दिसते; ६ महिन्यांपूर्वी तिने मुलीला जन्म दिला होता आणि बाळंतपण सुखरूप होऊनहि ती बिछान्यातून उठू शकत नव्हती; शारीरिक व्याधीपेक्षा मानसिक अस्वास्थ हेच त्याचे जास्त प्रमुख कारण होते; घरात एक फुटकी कवडीहि नव्हती.

आणि अशा परिस्थितीत सकाळी ९ वाजल्यापासून रात्री ७ वाजेपर्यंत मार्क्स ब्रिटिश म्युझियममध्ये बसून वाचन करीत होता. कामगारवर्गाच्या विजयासाठी अशा काही मेहनतीची व बौद्धिक तयारीची जरूरी आहे, याची त्या वेळच्या इतर पुढाऱ्यांना दादही नव्हती आणि त्याच वेळी मार्क्सचे विरोधक त्याच्यावर तो कामगारांना बहकवीत असल्याचा आरोप करून त्याची निंदानालस्ती करीत होते. या काळात मार्क्सने लिहावयास घेतलेले "राजकीय अर्थशास्त्राची मीमांसा" हे पुस्तक २–४ आठवड्यांत पूर्ण होईल असे त्यास वाटू लागले होते, म्हणून तो प्रकाशकाच्या शोधात होता; परंतु एका पाठोपाठ एकाने त्याला निराश केले.

त्याचवेळी कम्युनिस्ट लीगचे अस्तित्व पोलिसांना कळण्यासारखा पुरावा त्यांच्या हातात सापडल्यामुळे कोलोनमधील लीगची मध्यवर्ती कमिटी पकडली गेली; या साथीदारांना सहाय्य करण्याची जबाबदारीही मुख्यतः मार्क्सवरच होती.

अडचणींच्या या अंधःकारात अमेरिकेतील सर्वात लोकप्रिय साप्ताहिक "न्यू यॉर्क ट्रिब्यून" ने मार्क्सला लेखन करण्याचे आमंत्रण दिले आणि आशेची धुगधुगी निर्माण केली. सुरवातीला मार्क्सला इंग्रजी भाषेवरच्या प्रभुत्वाची खात्री वाटत नव्हती; म्हणून १८४८–५० च्या जर्मनीतील क्रांतिप्रतिक्रांतीच्या काळावरचे लेख एंगल्सने ठाकठीक करून दिले.

याचवेळी मार्क्सचा ब्रुसेलसच्या दिवसांपासूनचा क्रांतिकारक स्नेही वायडेमेयर न्यू यॉर्कमध्ये होता आणि त्याने तेथे मार्क्सचे लेखन प्रसिद्ध करण्याचे प्रयत्न चालविले होते. त्याच्या "क्रांती" मासिकासाठी मार्क्सने "१८ वी ब्रुमेअर–लुई बोनापार्टचा लष्करी कट" लिहिण्याचे आश्वासन दिले आणि कामाला सुरुवात केली.
(नेपोलियन बोनापार्टच्या पुतण्या लुई बोनापार्ट याने १८५१ साली १८ ब्रुमेअर (२ डिसेंबर) रोजी लष्करी कारस्थान करून कामगार–शेतकऱ्यांचा उठाव चिरडून स्वतःला 'फ्रेंच बादशहा' म्हणून जाहीर केले, ही घटना या पुस्तकाचा विषय आहे.)

याच विषयावर व्हिक्टर ह्यूगो व प्रुधाँ यांनी लिहिलेले ग्रंथ त्या वेळी फार लोकप्रिय झालेले होते; पण त्यांच्यापैकी कोणालाच या ऐतिहासिक घटनेचे नीटसे आकलन झालेले नव्हते. मार्क्सने आपल्या ग्रंथात, फ्रान्समधील वर्गलढ्यांनी अनुकूल परिस्थिती निर्माण केल्यामुळे एका सामान्य माणसाला वीराची भूमिका कशी पार पाडता आली याचे विवेचन केले आहे.

पुस्तक लिहायला घेतल्यानंतर दोन महिन्यांनीच, १८५२ च्या जानेवारीत, मार्क्स आतापर्यंतच्या सर्व मानसिक व शारीरिक ताणामुळे इतका आजारी झाला की फारच कष्टाने तो थोडेफार लिहू शकत असे. त्यात इतर परिस्थितीची भर होतीच. ता. २७ फेब्रुवारीला लिहिलेल्या पत्रात मार्क्सने लिहिले होते, "आता आमची परिस्थिती फारच छान झाली आहे. कपडे गहाण पडल्यामुळे मला घराबाहेर पडता येत नाही आणि कर्ज फार वाढल्यामुळे पोटभर जेवता येत नाही." तरीसुद्धा २५ मार्च रोजी पुस्तिकेचा अखेरचा भाग मार्क्सने लिहून पूर्ण केला. आणि न्यू यॉर्कला पाठवून दिला. इतक्या बिकट परिस्थितीत लिहिली गेलेली ही पुस्तिका वायडेमेयरला फ्रँकफोर्टच्या एका शिंप्याने आपली आयुष्याची सगळी कमाई दिल्यामुळेच प्रसिद्ध होऊ शकली. पुस्तिका छापली गेली पण त्यातून आर्थिक दृष्टया फारशी कमाई झाली नाही.

वास्तविक हे छोटे पुस्तक मार्क्सच्या बुद्धिमत्तेला शोभेसेच उतरलेले आहे; ते परिपक्व विनोद आणि वाङ्मयीन गुणांनीही नटलेले आहे. एका नुकत्याच घडलेल्या घटनेचे ऐतिहासिक भौतिकवादाच्या दृष्टीने परिक्षण करून तिचे रहस्य शोधून काढण्याचे श्रेय मार्क्सने मिळविले आहे. राज्यसंस्था व क्रांति यांचे परस्पर संबंध काय असतात, याचेही विवेचन त्याने केले आहे. त्यावेळच्या क्रांतीच्या तुफानी काळात, जेव्हा कामगारवर्ग व श्रमजीवि जनता यांची चळवळ,

धडाडी, व निर्मितीक्षम कामगिरी शिगेला पोचली होती, त्यावेळच्या कामगारवर्गाच्या लढ्यांच्या अनुभवाचा त्याने बारकाईने अभ्यास करून महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढले आहेत. कामगारवर्ग व शेतकरी जनता यांचे परस्पर संबंध काय असावेत याचे त्याने विवेचन केले आहे. भांडवलदारी क्रांतीपर्यंतच्या सर्व क्रांत्या राज्यतंत्र अधिक मजबूत बनवितात, तर कामगारक्रांती प्रचलित राज्ययंत्र फोडून-तोडून काढते आणि एका निराळयाच प्रकारच्या राज्यसंस्थेचा, पिळवणूक न करणाऱ्या राज्यसंस्थेचा पाया घालते, हे विचार मार्क्सने त्यात मांडले आहेत.

"क्रांती" च्या पहिल्या अंकात हा प्रबंध प्रसिद्ध झाला; त्यानंतर आणखी एकच अंक निघून हे प्रकाशनही बंद पडले.

"क्रांती" चा पहिला अंकसुद्धा निघतो की नाही या चिंतेत मार्क्स असतानाच त्याच्या घरात आणखी एक दुर्दैवी मृत्यु घडला; मार्क्सची एक वर्षापूर्वी जन्माला आलेली मुलगी मरण पावली. या हृदयद्रावक घटनेची नोंद जेनीच्या रोजनिशीत आहे. ती इतकी हृदयस्पर्शी आहे की त्या दिवसाबद्दलचे अविस्मरणीय प्रतिबिंब आपल्या मनावर उमटून जाते. जेनीने लिहिले आहे : "१८५२ च्या ईस्टरमध्ये आमची छोटी फ्रांझिस्का छातीत कफ झाल्यामुळे भयंकर आजारी झाली. तीन दिवस तिने मृत्युबरोबर सामना केला. तिचे मृत शरीर मागच्या लहान खोलीत ठेवून आम्ही सर्व पुढच्या खोलीत झोपायला गेलो. जमिनीवर बिछाने टाकून, मुलांना जवळ घेऊन, लाडक्या फ्रांझिस्कासाठी रडून आम्ही रात्र काढली. दिवस आत्यंतिक हलाखीचे होते. सकाळी उठून मी शेजारीच रहाणाऱ्या फ्रेंच निर्वासिताकडे गेले. त्याने मला स्नेहाने व सौजन्याने वागविले आणि दोन पौंड दिले; ते देऊन मी दफनपेटी आणली; बिचारी जन्माला आली त्या वेळी तिला पाळणा मिळाला नव्हता आणि मृत्युनंतर दफनपेटीही लवकर मिळाली नाही. अखेरच्या क्षणी तिला उचलून नेण्याच्या वेळी आम्हाला अत्यंत वाईट वाटले."

## १९. कोलोन कम्युनिस्ट खटल्याचा बोजवारा

असेच दिवस जात होते आणि कोलोन कम्युनिस्ट खटल्याचा बोजवारा उडविण्याची कामगिरीही मार्क्सवरच होती. १८५१ च्या मेमध्ये कम्युनिस्ट लीगच्या मध्यवर्ती कमिटीच्या सदस्यांना पकडण्यात आले होते; परंतु त्यांच्यावर कोणताही गुन्हा शाबीत करता येत नव्हता. केवळ ते एका गुप्त प्रचारसंघटनेचे सभासद होते हा शिक्षापात्र गुन्हा ठरत नव्हता.

" फ्रँको-जर्मन कटा " च्या नावाखाली फेब्रुवारी १८५२ मध्ये अनेक जर्मन कामगारांना पॅरिसच्या कोर्टाने लांब मुदतीच्या शिक्षा दिल्या; परंतु त्यामुळे कोलोनचा खटला उभा करता येईना. खटल्याची तारीख ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलूनही काही पुरावा जमवता आला नाही, तेव्हा प्रशियाच्या राजाने नेमलेल्या खास अधिकाऱ्याने खोटे कागदपत्र तयार करून खटल्याला सुरुवात केली. ही " मार्क्सच्या पक्षाच्या सभांची टांचणे " होती आणि त्यात जागतिक क्रांतीचा कट होता! ताबडतोब ही टांचणे खोटी आहेत असे सिद्ध करणारी सर्व सामुग्री मार्क्सच्या घरी तयार होऊ लागली.

त्यावेळी मार्क्सच्या घरात हा कारखाना कसा चालत असे, याचे मोठे सुंदर वर्णन जेनीने एका पत्रात केले आहे. मार्क्स रात्रंदिवस काम करीत होता. मग त्याने तयार केलेल्या कागदपत्रांच्या ६–७ नकला सर्व मिळून तयार करीत आणि त्या निरनिराळ्या मार्गांनी कोलोनला पाठविण्यात येत. हातांची बोटे दुखेपर्यंत स्वत: जेनी नकला करीत होती; कोणी लिहीत होते; कोणी निरोपांची ने आण करीत होते; कोणी सर्वांना जिवंत राहता यावे म्हणून चार पैसे जमवून आणीत होते; आणि मार्क्सची मुले आजुबाजूला खेळत होती;उड्या मारीत होती; कधी कधी बाबांकडून रागे भरून घेत होती.

अखेर मार्क्सचा विजय झाला; खटल्याचा बोजवारा उडाला. तरीसुद्धा राजा व सरकार दोषी ठरू नये म्हणून न्यायाधिशांनी आरोपींना ५–५, ६–६ वर्षे सक्तमजुरीच्या शिक्षा ठोठावल्याच. सर्व कम्युनिस्ट पुढाऱ्यांना फासावर लटकावून जनतेला दहशत घालण्याचा डाव मात्र मार्क्समुळे यशस्वी होऊ शकला नाही. हे पर्वतप्राय काम अंगावर घेण्यापूर्वी मार्क्स दारिद्र्याच्या अगदी खालच्या पायरीवर होता; घरात खायला अन्न नव्हते, वर्तमानपत्र विकत घ्यायला पैसे नव्हते, म्हणून ट्रिब्यूनसाठी लेखन करता येत नव्हते; आणि दारिद्र्याचा सर्वांत जवळचा मित्र आजारीपणाही घरात होताच. ह्या परिस्थितीतून मान वर काढून, मार्क्सने व त्याच्या कुटुंबाने, परदेशात राहून, बलिष्ठ प्रशियन सरकारला टक्कर दिली.

या खटल्यातून बाहेर आलेल्या खोटेपणाचे माप प्रशियाच्या सरकारच्या पदरात पुरेपुरे टाकण्यासाठी मार्क्सने खटल्यात उघडकीस आलेली अधिकाऱ्यांची बदमाषगिरी प्रकाशात आणणारी पुस्तिका डिसेंबरअखेर लिहून पुरी केली आणि ती स्वित्झरलंडमध्ये छापून घेतली; परंतु " कोलोन कम्युनिस्ट खटल्यामागील कारस्थानाचा गौप्यस्फोट " या पुस्तिकेच्या सर्वच्या सर्व प्रती सीमेवरच जप्त



मार्क्स, एंगल्स व मार्क्सच्या मुली

**जेनी, इलिआनोर आणि लॉरा**

झाल्या आणि प्रकाशनाचा खर्च मात्र मार्क्सच्या अंगावर पडला. तोपर्यंत मार्क्सची आर्थिक स्थिती अधिकच हलाखीची झालेली होती; कारण महिन्या-दीड महिन्यात तो इतर दुसरे कोणतेच काम करू शकला नाही. ही पुस्तिका अखेर अमेरिकेत प्रसिद्ध करण्यात मार्क्सला यश मिळाले; परंतु त्यामुळे ज्या उद्देशाने ती लिहिली गेली होती तो तितकासा सफळ झाला नाही.

१८५२ च्या नोव्हेंबरमध्ये मार्क्सच्या सूचनेवरून कम्युनिस्ट लीग बरखास्त करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले.

## २०. निर्वासित जीवनातील सत्त्वपरीक्षा

यानंतरच्या काळात मार्क्सने मुख्यतः 'न्यू यॉर्क ट्रिब्यून' साठी व चार्टिस्ट चळवळीच्या मुखपत्रासाठी लेखन केले. युरोपीयन राजकारणात क्रिमियाचे युद्ध, भारतीय घडामोडींपैकी १८५७ चा उठाव, चीनमधील ब्रिटिशविरोधी उठाव आणि तैपिंग बंड, स्पेनमधील क्रांतिकारक घडामोडी आणि अमेरिकेतील यादवी युद्ध या विषयांवर अत्यंत महत्त्वपूर्ण लेखन १८५१ ते १८६२ पर्यंतच्या काळात त्याने केले. त्यापैकी भारतीय प्रश्नासंबंधीच्या त्याच्या विचारांचे सार पुढे स्वतंत्रपणे देण्यात आले आहे; आणि इतर प्रश्नांच्या सविस्तर विवेचनात न जाता इथे इतके नमूद करणे आवश्यक आहे की, प्रतिगाम्यांविरुद्ध व दडपशाहीविरुद्ध झालेल्या प्रत्येक क्रांतिकारक चळवळीला त्याने पाठिंबा दिला; जनतेच्या प्रत्येक चळवळीचे मर्म शोधून काढून युरोपीयन वाचकांत तिला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. इतर सर्व वर्तमानपत्रे सत्ताधाऱ्यांच्या व विशेषतः ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या बाजूने आरडाओरड करीत असताना मार्क्सने त्या त्या देशातील लोकांची बाजू घेतली. आज ही गोष्ट आदरणीय वाटत असली तर आश्चर्यकारक मात्र वाटत नाही, परंतु त्या काळचा व त्या काळातील विचारसरणीचा विचार करता ती अद्‌भुतरम्य होती.

मानवतेच्या या मित्रावरील संकटाची परंपरा मात्र चालूच होती. ६ एप्रिल १८५५ रोजी मार्क्सचा अत्यंत लाडका मुलगा एडगर मरण पावला. ९ वर्षाच्या या आपल्या एकुलत्या एका मुलाच्या आजारीपणाबद्दल व मृत्यूबद्दल स्वतः मार्क्सने पुढीलप्रमाणे लिहिले आहे : "काळजीने माझी बायको अगदी आजारी झाली आहे. अशी तिची अवस्था पूर्वी कधी झाली नव्हती. माझे मन जड झाले आहे; डोके भरकटत आहे पण मला धीराने वागावे लागत आहे; इतक्या आजारीपणातही मुलाची स्वतंत्रवृत्ती व चांगुलपणा आहे तसाच आहे."

......" बिचारा लहानगा निघून गेला. आज ५ ते ६ च्या दरम्यान तो माझ्या हातावर (खरोखरीच) झोपून गेला" ...... "मुलगा गेल्यापासून घर अगदी सुन्न झाले आहे. त्याची आम्हांला क्षणोक्षणी आठवण येते. मी अनेक प्रकारांनी दुर्दैवाचा अनुभव घेतला आहे; पण खरे दुर्दैव काय असते हे मला आता समजले आहे."

एडगरच्या मृत्यूनंतर ६ महिनेपर्यंत मार्क्सच्या मनाची ही तळमळ जराही कमी झाली नव्हती आणि त्याचे जवळचे मित्र एंगल्स व फ्रायलिग्राथ त्याची परोपरीने समजूत घालून सांत्वन करीत होते. खुद्द मार्क्सची प्रकृतीही ठीक नव्हती; डॉक्टरांनी घर बदलण्याची सूचना दिली होती; अनेक वर्षे सोहो स्क्वेअरमधल्या घाणेरड्या हवेत राहिल्यामुळे सगळ्यांनाच फार त्रास झाला होता. एडगरच्या मृत्युनंतर त्या घरात रहाणेही अशक्य झाले होते; परंतु जागा बदलण्यास अनुकूलता निर्माण होण्यासाठीही घरात आणखी एक मृत्यू घडावा लागला. जेनीची आई १८५५ च्या उन्हाळयात मृत्यु पावली आणि तिने आपल्या मुलीसाठी जे थोडेसे पैसे ठेवले होते, त्यातून १८५६ च्या हिवाळयात त्यांनी मार्क्सच्या आवडत्या हॅमस्टेड टेकडीजवळ छोटेसे घर घेतले.

या नव्या घराबद्दल लिहिताना जेनीने म्हटले आहे, "पूर्वी आम्हांला ज्या खुराड्यातून रहावे लागले, त्याच्या मानाने हे घर म्हणजे खरोखरीच राजवाडा आहे, आणि ४०० पौंडात (सर्व जुने सामान घेऊन) हे सजविलेले असले तरी प्रारंभी नव्या दिवाणखान्यात मला अगदी प्रशस्त वाटत असे. मग पूर्वीच्या वैभवाची आठवण करून देणारे पडदे वगैरे सामान आम्ही सोडवून आणले...पण हे सुख फार काळपर्यंत टिकले नाही; पुन्हा एका पाठोपाठ एक वस्तू गहाण पडू लागल्या, तरीसुद्धा आम्ही तेथे फारच आनंदात होतो......"

या काळात मार्क्सचे कित्येक जुने क्रांतिकारक स्नेही मरण पावले होते आणि इतरांची कोणत्याही राजकीय पक्षाच्या अभावी दाणादाण झाली होती. इतक्यात १८५७ चे आर्थिक अरिष्ट आले. थोड्याच वर्षांत भांडवलदारी प्रगतीत खळ पडून अरिष्ट येईल, या मार्क्सच्या भाकिताप्रमाणे आलेल्या या अरिष्टाची चाहूल मार्क्सला प्रथम ट्रिब्यूनने त्याचा लेखनाबद्दलचा मोबदला एकदम निम्म्यावर आणल्यामुळे लागली. त्यावेळी एंगल्सला लिहिलेल्या पत्रात (आणि मार्क्सची बहुतेक सर्व पत्रे एंगल्सलाच लिहिलेली आहेत) मार्क्सने लिहिले आहे, "मी सध्या खूप काम करीत आहे. बहुतेक पहाटे ४ वाजेपर्यंत काम चालते. मी दोन

कामे हातात घेतली आहेत; एक अर्थशास्त्राची मूलभूत तत्त्वे लिहून काढण्याचे आणि दुसरे सध्याच्या अरिष्टासंबंधीचे लेखन. ट्रिब्यूनला पाठविण्याच्या लेखाच्या जोडीला मी सर्व घडामोडींची फक्तटाचणे करून ठेवीत आहे. परंतु त्यात माझा पुष्कळ वेळ जातो..."

अखेर अर्थशास्त्रावरचे हे पुस्तक मार्क्सने २१ जानेवारी १८५९ रोजी पूर्ण केले तेव्हा ते पोस्टाने पाठविण्यासाठी लागणाऱ्या तिकिटाचे पैसे त्याच्या हातात नव्हते. मार्क्सने लिहिले आहे, "मला नाही वाटत माझ्याशिवाय इतर कोणीही 'पैशा' बद्दल इतके लिहिले असेल आणि त्याच्या इतक्या अभावाचा अनुभव घेतला असेल. आजपर्यंत ज्या ज्या लेखकांनी या विषयासंबंधी लिहिले आहे त्यांनी त्यांच्या या संशोधनाच्या विषयाशी फार चांगले संबंध राखले आहेत."

## २१. राजकीय अर्थशास्त्राचे समालोचन

१८५१ मध्ये मार्क्सने लिहावयास घेतलेले हे पुस्तक १८५९ मध्ये पूर्ण झाले. "कामगारवर्गाची गीता" या अर्थाने पुढे प्रसिद्ध झालेल्या मार्क्सच्या सुप्रसिद्ध "भांडवल" ग्रंथातील पहिल्या तीन प्रकरणांची सामुग्री म्हणजे हा प्रबंध होय; थोडक्यात म्हणजे "भांडवल" ग्रंथाचा हा प्रारंभ होता. यात मार्क्सने मूल्यांचा सिद्धांत आणि पैशाचे रहस्य हे दोन विषय मांडून अर्थशास्त्रात नवी, मोलाची भर टाकली.

या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत तो हेगेलच्या अध्यात्मवादी विरोध-विकासवादाकडून शास्त्रीय, ऐतिहासिक विरोधविकासवादापर्यंत कशा पद्धतीने विचार करीत गेला याचे विवरण केले आहे. याचा निष्कर्ष त्याने पुढीलप्रमाणे दिला आहे: "हेगेलच्या तत्त्वज्ञानाच्या परीक्षणावरून माझ्या ध्यानात आले की, राजकीय अगर कायद्याच्या स्वरूपाचे आकलन फक्त त्यांचाच अभ्यास केल्याने होऊ शकत नाही; किंवा मनुष्याच्या बुद्धीच्या सर्वसाधारण विकासावरूनही ते कळत नाही; त्याची पाळेमुळे जीवनाच्या भौतिक परिस्थितीत असतात. तिला हेगेल "भांडवलदारी समाज" म्हणतो. या समाजाचा अभ्यास करून मी जे सर्वसाधारण निष्कर्ष काढले ते पुढीलप्रमाणे आहेत—सामाजिक उत्पादनात माणसाचे माणसांशी अपरिहार्यपणे संबंध निर्माण होतात; ते त्यांच्या इच्छेवर अवलंबून नसतात; हे संबंध भौतिक उत्पादकशक्तींच्या विकासाच्या अवस्थेशी जुळणारे असतात. या उत्पादनसंबंधांच्या समन्वयातून त्या समाजाची आर्थिक रचना तयार होते; राजकारण व कायद्याचा डोलारा याच भौतिक पायावर उभा

रहातो; आणि सर्व सामाजिक जाणिवांची विशिष्ट रूपे त्याला अनुसरून असतात. एकंदर जीवनाचा सामाजिक, राजकीय व बौद्धिक विकास भौतिक जीवनाच्या उत्पादनपद्धतीप्रमाणे ठरत असतो...माणसाची मानसिक क्रिया परिस्थितीला घडवीत नसते तर उलट त्याच्या सामाजिक परिस्थितीनुसार त्याच्या मानसिक क्रियाप्रक्रिया होत असतात. विकासाच्या विशिष्ट अवस्थेत समाजातील भौतिक उत्पादनशक्ती व प्रचलित उत्पादनसंबंध किंवा (कायदेशीर भाषेत सांगायचे म्हणजे) मालकीसंबंध यांचा संघर्ष येतो...मग हे मालकीसंबंध उत्पादनाच्या विकासाची साधने न रहाता उत्पादनावरील बंधने बनतात; आणि मग सामाजिक क्रांतीचा कालखंड सुरू होतो. समाजाचा आर्थिक पाया बदलला की कमीअधिक वेगाने वरचा प्रचंड डोलाराही बदलतो..... उत्पादनाच्या विशिष्ट अवस्थेतील सर्व शक्तींचा पूर्ण विकास झाल्याशिवाय ती अवस्था बदलत नाही, आणि जुन्या समाजाच्या कवचांतच, त्यांच्या अस्तित्वास आवश्यक अशा भौतिक परिस्थितीचा विकास झाल्याखेरीज नवे व उच्च प्रकारचे उत्पादनसंबंध जुन्याच्या जागी येत नाहीत. म्हणूनच पार पाडता येतील अशीच कार्ये मानवजात हातात घेत असते; कारण अशा कार्यासाठी आवश्यक अशा भौतिक परिस्थितीचा विकास झाल्याखेरीज —अगर होऊ लागल्याखेरीज—ते कार्य उपस्थित होत नाही. सर्वसाधारणपणे, आशियाई, प्राचीन कालीन (गुलामी), सरंजामदारी व आधुनिक भांडवलदारी उत्पादनाचे प्रकार एकापेक्षा एक प्रगत अशा आर्थिक-समाज-व्यवस्थांचे कालखंड आहेत. भांडवलदारी उत्पादन संबंध ही सामाजिक उत्पादन प्रक्रियेची अखेरची विरोधात्मक अवस्था होय; विरोधात्मक म्हणजे व्यक्तिगत विरोध या अर्थाने नव्हे, तर व्यक्तीच्या सामाजिक जीवन परिस्थितीतून उद्भवणारा विरोध या अर्थाने. परंतु भांडवलदारी समाजातच विकसित होणाऱ्या उत्पादन-शक्ती हा विरोध नष्ट करणारी परिस्थिती निर्माण करतात. म्हणून या सामाजिक अवस्थेच्या अस्ताबरोबर मानवजातीचा प्राथमिक इतिहास समाप्त होतो." ऐतिहासिक भौतिकवाद व विरोधविकासवादाचा इतका सुंदर संक्षेप इतरत्र मिळणे अगर स्वतंत्रपणे होणे शक्य नसल्यामुळे तो इथे जवळजवळ मार्क्सच्याच शब्दात दिला आहे.

मार्क्सचा मूल्याचा सिद्धांत मात्र इतक्या सुलभतेने मांडणे कठीण आहे.हा सिद्धांत मांडून मार्क्सने अॅडाम स्मिथ व डेव्हिड रिकार्डो यांच्या बरोबर स्थगित झालेल्या अर्थशास्त्राचा विकास केला. वस्तूंचे मूल्य म्हणजे तिच्या निर्मितीसाठी लागणारा

सामाजिक दृष्ट्या आवश्यक श्रमकाल, अशी व्याख्या देऊन भांडवलदारी अर्थशास्त्र थांबले होते; मूल्य निर्माण करणे हे मानवी श्रमशक्तीचे स्वाभाविक कार्य आहे, अशी त्याची विचारसरणी होती. पण मार्क्सने ती मानली नाही. त्याने मूल्य निर्माण करण्याच्या श्रमशक्तीच्या गुणाचा अधिक खोलवर विचार केला; त्याने कोणत्या प्रकारची श्रमशक्ती मूल्य निर्माण करते, का करते व कशी करते या प्रश्नांची उत्तरे शोधून काढली; यामुळेच त्याला "नफा" कसा व कोठून निर्माण होतो या गूढाचा शोध लावता आला.

माणसाची कोणती तरी गरज पूर्ण करणारा मानवी श्रमातून निर्माण झालेला पदार्थ जोपर्यंत फक्त उत्पादकाची किंवा त्याच्या कुटुंबियांची गरज भागवतो तोपर्यंत त्याला आपण 'वस्तु' किंवा 'उत्पादित वस्तु' असे म्हणतो. परंतु ती वस्तु विनिमयाच्या, अदलाबदलीच्या मार्गाने जेव्हा वापरासाठी तिऱ्हाइताच्या हाती पडते तेव्हा तिला क्रयवस्तु (कॉमॉडिटी) म्हणतात; कोणत्याही क्रयवस्तूचे दोन गुणधर्म असतात; एक ती माणसाची कोणती तरी गरज पूर्ण करते; दुसरा, तिची देवाणघेवाण करता येते. क्रयवस्तूंची देवाणघेवाण करून आपण दररोज, उपयुक्ततेच्या दृष्टीने निरनिराळ्या प्रकारांचे मूल्य असलेल्या क्रयवस्तूंना मूल्याच्या एका पातळीवर आणतो. उदाहरणार्थ, दोन पौंड साखरेबद्दल आपण एक पौंड चहाचा स्वीकार केला तर त्याचा अर्थ असा होतो की २ पौंड साखर व १ पौंड चहा यांची आपण देवाणघेवाण करतो, कारण त्यांची किमत आपण सारखीच समजतो; म्हणजे देवाणघेवाण ही नेहमी सारख्या किमतीच्या वस्तूंची होत असते. आता सर्व वस्तूंच्या निर्मितीला आवश्यक अशी एकच एक समान बाब जर कोणती असेल तर ती मानवी श्रम. म्हणजे वस्तूंची देवाणघेवाण करताना निरनिराळ्या प्रकारांच्या मानवी श्रमांना एका पातळीवर आणले जाते. हा अभिन्न, समान, अ-वैय्यक्तिक, सर्वसाधारण श्रम फक्त काळाच्या सहाय्याने म्हणजे दिवस–सप्ताह–महिना–अशा प्रकाराने, मोजता येतो. म्हणजे देवाणघेवाणीच्या दृष्टीने सर्व क्रयवस्तू म्हणजे एकजीव झालेल्या श्रमकाळाचे ठराविक माप असते. देवाणघेवाणीसाठी वस्तू तयार होतात तेव्हा त्यात उपयुक्तमूल्य [विशिष्ट प्रकारचे श्रम, उदा. विणणे, शिवणे, खणणे इ.] व देवाणघेवाणमूल्य (सर्वसाधारण मानवी श्रम) यांचा संगम असतो. आणि असाच संगम असलेली दुसरी वस्तू विशिष्ट उपयोग पण सर्वसाधारण समान मूल्य असलेली वस्तू—पैसा—जेव्हा इतिहासाच्या अनुभवातून अस्तित्वात येते तेव्हा देवाणघेवाणीला अवैय्यक्तिक

व पूर्ण स्वरूप प्राप्त होते. अशा रीतीने पैशाच्या रूपाने विशिष्ट सामाजिक उत्पादनसंबंध दृढ होतात, हे मार्क्सने दाखवून दिले. पैशाच्या या स्वरूपामुळे भांडवलदारी समाजात कामगारांची अव्यक्त पिळवणूक करणे कसे सोपे होते, याचे विवेचन मार्क्सने पुढे " भांडवल " या आपल्या ग्रंथात केले आहे.

अर्थशास्त्रावरील मार्क्सच्या पुस्तकाने त्याचे चहातेही प्रथम दिपून व गोंधळून गेले; हळुहळु त्यांना त्यातील शास्त्रीय सत्याचे आकलन होऊ लागले आणि सर्वत्र त्याचा स्वीकारही होऊ लागला. भांडवलवादी अर्थशास्त्रज्ञ मात्र पूर्वीप्रमाणेच आपले सिद्धांत लिहीत राहिले! शक्यतोवर मार्क्सचे नावही न घेता ते अर्थशास्त्रावरची पुस्तके लिहीत राहिले.

या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर मार्क्सचे लक्ष पुन्हा एकदा भांडवलदारी अरिष्टातून युरोपमध्ये सुरू झालेल्या राष्ट्रीय लढ्यांकडे वळले आणि पुढील संशोधनाचे व लेखनाचे काम लांबणीवर पडले. या काळातील इतिहासाकडे वळण्यापूर्वी मार्क्सने भारताबद्दल लिहिलेल्या लेखांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

## २२. भारतीय परिस्थितीचे समालोचन

मार्क्सच्या सर्वगामी बुद्धीने भारतीय प्रश्नावर केलेले लेखनही बहुमोल आहे; याचा संपूर्ण संग्रह अद्याप प्रकाशित झालेला नसला तरी ' न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून ' मधील लेख, " भांडवल " ग्रंथात जागोजाग असलेले हिंदुस्थानसंबंधीचे उल्लेख आणि मार्क्स-एंगल्स पत्रव्यवहार ही सामुग्रीही भारतीय समाजाच्या व राजकारणाच्या महत्त्वाच्या समस्यांवर प्रकाश टाकण्यास पुरेशी आहे. त्या सर्वांचे सार पुढील-प्रमाणे देता येईल :

आशियाई अर्थव्यवस्था या नावाने प्रसिद्धीस आलेल्या समाजरचनेत खाली तळाला खेडेगावात प्राथमिक अवस्थेतील साम्यवादी समाजपद्धतीचे ( जमिनीची सामायिक मालकी वगैरे ) अवशेष असतात; आणि वर शेंड्याला पाणीपुरवठा व सार्वजनिक बांधकामे यांची व्यवस्था पहाणारे व त्याच्या जोडीला युद्ध व लूट ही खाती चालविणारे मध्यवर्ती सरकार असते.

अर्थात् ही ग्रामीण समाजरचना समजावून घेणे हीच हिंदुस्थानचा इतिहास समजण्याची गुरुकिल्ली आहे...

जमिनीवर सामायिक मालकी, शेती व हस्तव्यवसाय यांचा संयोग आणि कधीही न बदलणारी श्रमविभागाची पद्धत हाच या अत्यंत पुरातन हिंदी

समाजाचा पाया आहे...हा समाज स्वयंपूर्ण व एकजिनसी असतो. त्याच्या उत्पादनाचा मुख्य भाग त्या समाजाच्या प्रत्यक्ष उपयोगासाठी असतो व त्याला क्रयवस्तूचे स्वरूप येत नाही...या समाजातील उत्पादनसंघटनेच्या साधेपणामुळे तीत कोणतेही फेरबदल घडून येत नाहीत. एकीकडे हे कधीही न बदलणारे समाज, व दुसरीकडे राज्ये मोडण्याचा व नवी राज्ये अस्तित्वात येण्याचा व राजघराण्यांत बदल होण्याचा अव्याहत क्रम यात फार विरोध आहे. समाजातील आर्थिक घटकांच्या रचनेवर राजकीय आकाशातील तुफानांचा काहीच परिणाम होत नाही.

ही परंपरागत हिंदी अर्थव्यवस्था, ब्रिटिश सत्तेच्या रूपाने परदेशी भांडवलशाहीचा हल्ला होताच मुळापासून उद्ध्वस्त झाली. ब्रिटिशांच्या पूर्वी ज्यांनी हिंदुस्थान जिंकला, त्यांनी हिंदुस्थानच्या आर्थिक पायाला मुळीच हात लावला नाही; उलट त्यांनी क्रमाक्रमाने या आर्थिक पायावरच स्वत:च्या राजवटीची उभारणी केली. ब्रिटिशांनी मात्र हिंदुस्थान जिंकल्यावर हा आर्थिक पायाच उखडून टाकला. परंतु युरोपात भांडवलशाहीने केलेले कार्य काही या परकीय भांडवलशाहीने हिंदुस्थानात केले नाही. युरोपात भांडवलशाहीने जुनी समाजरचना उध्वस्त करताना नव्या शक्तींची वाढ करण्याचे विधायक कार्यही पार पाडले; पण हिंदुस्थानात परदेशी भांडवलशाहीने हे विधायक कार्य मुळीच न करता फक्त विध्वंसक कार्य केले. पुढे ब्रिटिशांनी ब्रिटनमधील औद्योगिक भांडवलदारांच्या कारखान्यात तयार झालेला माल हिंदुस्थानात घुसवून विध्वंसनाच्या कार्यावर कळस चढविला. भारतीयांनी या काळात भोगलेल्या हालअपेष्टांना सीमा नाही. विणकरांच्या हाडांनी हिंदुस्थानच्या मैदानांना सफेदी चढली.

अशा रीतीने ब्रिटिशांनी हिंदुस्थानात सामाजिक क्रांती घडवून आणली. या क्रांतीने हातकारागिरीच्या धंद्यांची जुनी शहरे नष्ट करून तेथील जनतेला खेड्यापाड्यात गर्दी करण्यासाठी हुसकावून लावले...त्यामुळे सगळे लोक शेतीवर गर्दी करू लागले...आणि जनतेचे दारिद्र्यही वाढू लागले.

हिंदुस्थानमध्ये ही सामाजिक क्रांति घडवून आणण्यांत इंग्लंडचा हेतू केवळ स्वार्थ साधण्याचाच होता हे खरे. पण पुढे प्रश्न असा आहे की, आशियाच्या समाजव्यवस्थेत मूलगामी क्रांति घडवून आणल्याशिवाय मानवजातीला आपले (वर्गविहीन समाजरचनेचे) इतिहासदत्त कार्य तडीस नेता येईल काय ? नाही. आणि म्हणूनच ही क्रांती घडवून आणण्यात अजाणतेपणाने इंग्लंडने ह्या ऐतिहासिक कामगिरीला हातभार लावला आहे.

पुढचा प्रश्न असा की, इंग्लंडच्या या कामगिरीमुळे हिंदुस्थानांतील बहुजन-समाज दास्यमुक्त होणार आहे का ? मुळीच नाही; किंवा त्याच्या सामाजिक परिस्थितीत फारशी सुधारणाही होणार नाही. या गोष्टी केवळ उत्पादनसाधनांची सुधारणा होण्यावर अवलंबून नाहीत; उत्पादनसाधने जनतेच्या मालकीची होणेसुद्धा तितकेच आवश्यक आहे. पण या गोष्टीसाठी भौतिक परिस्थिती निर्माण करण्याचे कार्य पार पाडण्यास इंग्लिश भांडवलदारवर्ग चुकणार नाही. त्याने हिंदुस्थानात नवसमाजाची बीजे पेरली आहेत, पण जोपर्यंत खुद्द ब्रिटनमध्ये सध्याच्या राज्यकर्त्यांच्या वर्गाऐवजी औद्योगिक कामगारवर्गाची सत्ता स्थापन झालेली नाही, किंवा जोपर्यंत खुद्द हिंदुस्थानचे लोक इंग्रजांचे जोखड पूर्णपणे झुगारून देण्याइतके सामर्थ्यवान् झाले नाहीत, तोपर्यंत हिंदी जनतेला या नवसमाजाची फळे चाखावयास मिळणार नाहीत.

भारतासंबंधीच्या मार्क्सच्या तत्कालीन विचारांच्या या संक्षिप्त रूपरेषेवरून प्राचीन भारतापासून आधुनिक भारतापर्यंतच्या कालखंडातील समस्यांचा त्याने किती खोलवर व स्पष्ट विचार केला होता याचा प्रत्यय येतो.

## २३. कामगारवर्गाच्या सर्वाधिकारी सत्तेसंबंधीचा सिद्धांत

मार्क्सच्या चरित्राच्या उत्तरार्धाकडे वळण्यापूर्वी मार्क्सवादाच्या विचारप्रणालीत दृढमूल झालेल्या आणखी एका महत्त्वाच्या सिद्धांताची ओळख करून घेणे आवश्यक आहे. तो सिद्धांत “ कामगारवर्गाची सर्वाधिकारी सत्ता ” या नावाने ओळखला जातो.

मार्क्सने, कामगारवर्ग भांडवलदारी समाजव्यवस्थेचा अंत करून नव्या समाजव्यवस्थेची उभारणी करील हा सिद्धांत मांडतानाच, या नव्या समाजाचे राज्ययंत्र कसे असेल याबद्दलचे विचारही स्पष्टपणे मांडले आहेत. भौतिकवाद, समाजाच्या विकासाचे विरोधविकासी स्वरूप, सध्यांचा ( भांडवलदारी ) समाज, त्याचा अंतर्विरोध व त्याच्या परिवर्तनाचा सूत्रचालक कामगारवर्ग—या मार्क्सच्या विकसित होत गेलेल्या विचारसरणीच्या मर्मस्थानी हा प्रश्न असल्यामुळे त्याबद्दलचे त्याचे विचार त्याच्या संपूर्ण विचारसरणीचा अपरिहार्य भाग आहे. परंतु त्यावेळच्या विवाद्य प्रश्नांत त्याची गणना प्रामुख्याने नव्हती आणि म्हणून त्या संबंधीचे मार्क्सचे विचार प्रबंधाच्या अगर ग्रंथाच्या स्वरूपात मांडले गेलेले नाहीत, ते ठिकठिकाणी विखुरलेल्या स्वरूपात आहेत.

या प्रश्नाची पहिली मांडणी "कम्युनिस्ट जाहिरनाम्या"त झाली आहे. या ठिकाणी मार्क्स आणि एंगल्स लिहितात :

"आपण वर पाहिले की, कामगारवर्गाकडून केल्या जाणाऱ्या क्रांतीतील पहिले पाऊल, कामगारवर्गाला सत्ताधारीवर्गाच्या स्थानावर चढविणे, लोकशाहीची लढाई जिंकणे हे असते.

"कामगारवर्ग आपले राजकीय वर्चस्व, क्रमशः भांडवलदारवर्गाकडून सर्व भांडवल काढून घेण्यासाठी, सर्व उत्पादनसाधने राज्यसत्तेच्या—म्हणजे सत्ताधारी बनलेल्या कामगारवर्गाच्या—हातात केंद्रित करण्यासाठी, आणि एकूण उत्पादन-शक्ती शक्य तितक्या जलद गतीने वाढविण्यासाठी वापरेल.

"अर्थात सुरवातीला मालमत्तेच्या हक्कांवर आणि भांडवलदारी उत्पादनाच्या परिस्थितीवर, जबरदस्तीने आक्रमण केल्याशिवाय हे करणे शक्य होणार नाही."

यासाठी निरनिराळ्या देशांत, जमीन-उद्योगधंदे वगैरेसंबंधीचे, निरनिराळे कायदे करावे लागतील, असे सांगून "जाहिरनाम्यात" कामगारसत्ता कोणत्या स्वरूपाचे कायदे करील याचीही रूपरेषा देण्यात आलेली आहे.

पुढे १८४८-४९ मधील युरोपातील क्रांतीची लाट ओसरल्यानंतर मार्क्स-एंगल्स यांनी त्या काळात, भांडवलदारी अगर लोकशाही क्रांतीच्या त्या कालखंडात कोणत्या वर्गाने कोणती विशिष्ट कामगिरी केली याबद्दल आढावा घेऊन पुढे होणाऱ्या यशस्वी क्रांतीच्या स्वरूपासंबंधी आपल्या लेखातून चर्चा केली. "१८४८-५० या काळातील फ्रान्समधील वर्ग-लढे" या प्रबंधांत मार्क्सने क्रांतिकारक समाजवाद कसा असेल यासंबंधीचे विचार मांडताना लिहिले आहे :

"सर्वसाधारणपणे वर्गभेद नष्ट करण्यासाठी, वर्गभेद ज्यावर अवलंबून असतात ते उत्पादनसंबंध नष्ट करण्यासाठी, या उत्पादनसंबंधांना अनुरूप असलेले सर्व सामाजिक संबंध नष्ट करण्यासाठी, आणि या सामाजिक संबंधामुळे निर्माण होणाऱ्या विचारात क्रांती घडवून आणण्यासाठी अखंड क्रांतीचा, संक्रमण काळातील आवश्यक अवस्था म्हणून कामगारवर्गाच्या सर्वाधिकारी सत्तेचा उद्घोष केला पाहिजे."

फ्रान्समधील प्रतिक्रांतीचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी लिहिलेल्या "१८ वी ब्रुमेर" या लुई बोनापार्टच्या कारस्थानावरील ग्रंथांत मार्क्सने कामगारसत्तेचे वैशिष्ट्य सांगताना तिच्या राज्यसंस्थेबद्दल पुढील महत्त्वाचे विधान केले आहे :

" आजपर्यंतच्या ( कामगार क्रांतीपूर्वीच्या ) सर्व क्रांत्यांनी राज्ययंत्र मोडून तोडून टाकण्याऐवजी ते अधिक पोलादी बनविले आहे. "

इतिहासाच्या सुरवातीपासून सत्ताधारी वर्गांनी पिळवणूक व अन्याय टिकवून धरण्यासाठी अस्तित्वात आणलेले व वापरलेले आणि वापरून वापरून अत्यंत निर्घृण बनविलेले राज्ययंत्र—कामगारसत्ता प्रथम तोडून मोडूनच टाकते, हा मार्क्सचा अत्यंत महत्त्वाचा विचार वरील विधानांत समाविष्ट झालेला आहे.

पुढे पॅरिस कम्यूनच्या काळात पॅरिसच्या कामगारांनी पहिले कामगारराज्य स्थापन केले त्याचा गौरव करतानाही मार्क्सने कामगारसत्तेसंबंधीचे विचार मांडले आहेत.

१८७१ मध्ये लिहिलेल्या एका पत्रात मार्क्स म्हणतो :

" माझ्या " १८ वी ब्रुमेर " च्या शेवटच्या प्रकरणात, मी जाहीर केले होते की, फ्रान्समधील पुढील क्रांती—आजपर्यंतच्या क्रांतीप्रमाणे नोकरशाही-लष्करी राज्ययंत्र एकाच्या हातातून दुसऱ्याच्या हातात देणार नाही, तर ते मोडून टाकण्याचा प्रयत्न करील; आणि युरोपात जनतेच्या कोणत्याही खऱ्याखुऱ्या क्रांतीसाठी हीच पूर्वअट आहे. आणि हेच करण्याचा प्रयत्न पॅरिसमधील आपले शूर पार्टी कॉमरेड करीत आहेत. "

पुढे १८७५ मध्ये जर्मनीत सोशल डेमोक्रॅटिक पार्टीची स्थापना होण्याच्या वेळी तेथील कार्यकर्त्यांनी संधिसाधुपणाने कार्यक्रमात तडजोडी करून विचार-प्रवाहात अपप्रवृत्त्या आणल्या; त्यावर टीका करण्यासाठी लिहिलेल्या प्रबंधात मार्क्सने " गोथा कार्यक्रमांतील " राज्यसंस्थेसंबंधीच्या चुकीच्या विधानाबद्दलही आक्षेप घेतलेले आहेत. त्या संदर्भात मार्क्सने लिहिले आहे :

" भांडवलदारी समाज व साम्यवादी समाज यांच्या दरम्यान एकाचे दुसऱ्यात क्रांतिकारक परिवर्तन करणारा कालखंड असतो. त्याला अनुरूप असा एक राजकीय संक्रमणाचाही काल असतो; आणि या काळात राज्यसंस्था ही कामगार-वर्गाची सर्वाधिकारी सत्ताच असते, तिचे दुसरे कोणतेही स्वरूप असू शकत नाही. "

राज्यसंस्थेसंबंधीच्या मार्क्सच्या या विचारसरणीबद्दल पुढे, कामगारक्रांतीच्या कालखंडात फार मोठ्या प्रमाणावर चर्चा व वादविवाद झाले आणि कम्युनिस्ट पक्षांनी मार्क्सच्या विचारसरणीचाच अंगिकार करून विजय संपादन केले ही गोष्ट इतिहासाच्या वाचकांना माहीत आहेच.

# २४ पुन्हा एकदा क्रांतीच्या लाटेवर

ऑस्ट्रियाच्या साम्राज्यशाहीपासून स्वतंत्र होण्यासाठी व संयुक्त, स्वतंत्र इटलीच्या स्थापनेसाठी १८५९ मध्ये लढा सुरू होताच मार्क्सचे लक्ष त्याकडे वळणे स्वाभाविकच होते; आणि १८४८ च्या काळाप्रमाणे आताही त्याची इतर बाकीची कामे बाजूला पडली याचा उल्लेख २१ व्या प्रकरणाच्या अखेरीस आलेलाच आहे.

इटलीचे खरेखुरे स्वातंत्र्य व एकीकरण केवळ राष्ट्रीय उठावानेच होईल; आणि फ्रान्सचा राजा लुई बोनापार्ट याने "इटलीची मुक्तता" ही जी घोषणा उठविली आहे ती केवळ स्वार्थापायी उठविली आहे हे जाणून त्याच्या आहारी जाऊ नये, ही भूमिका मार्क्सने घेतली होती. बोनापार्टला पाठिंबा देणारा प्रचार हा केवळ इटलीच्याच नव्हे तर जर्मनीच्याही हिताच्या विरुद्ध होईल, कारण त्यामुळे युरोपातील प्रतिगामी शक्तींचा जोर वाढेल; हे विचार मांडण्यासाठी मार्क्सने १८६० मध्ये "हर फोग्ट" हे पुस्तक लिहिले आणि जर्मन निर्वासितांतील बोनापार्टबद्दल सहानुभूती बाळगणाऱ्यांवर कडक टीका केली.

याचवेळी फर्डिनंड लासालेबरोबर मार्क्सचा मोठा झगडा झाला. "इटलीचे युद्ध आणि प्रशियाचे कर्तव्य" या पुस्तिकेत प्रशियन साम्राज्यवाद्यांच्या मदतीने जर्मनीचे एकत्रीकरण घडवून आणण्याच्या कल्पनेचा लासालेने पुरस्कार केला होता. मार्क्सने सांगितले, हा क्रांतीचा मार्ग नव्हे, प्रतिक्रांतीचा मार्ग आहे; जनतेच्या प्रयत्नांनी लोकशाही मार्गांनीच जर्मनीचे राष्ट्र तयार झाले पाहिजे. जर्मन कामगारांच्या संघटनेचा लासाले प्रमुख झाल्यानंतर त्याने कार्यक्रम आखला तो कम्युनिस्ट जाहिरनाम्यातील कार्यक्रमापेक्षा एकदम निराळा होता; त्यामुळे मतभेद अधिकच वाढले. लासालेने कायदेशीर, शांततामय मार्गानेच कामगारांनी लढे लढवावेत आणि सार्वजनिक मतदानाचे अमृत प्राप्त करून घेऊन सर्व दुःखांचा शेवट करावा असा मार्ग दाखविला. तो कामगारांना सांगू लागला की प्रशियाचे सरकार तुम्हांला उत्पादक सहकारी संस्था काढण्यास मदत करील आणि अशा रीतीने तुमची पिळवणूक बंद होईल. वर्गलढा, संप, ट्रेड युनियन कार्य याबद्दल त्यांला आस्था नव्हती. मार्क्सचा मार्ग यापेक्षा अगदीच निराळा होता; शिवाय लासालेच्या मताने सर्व शेतकरी प्रतिगामी होते; तर मार्क्स त्यांना कामगारवर्गाचा दोस्त मानीत होता. प्रशियाच्या लष्करशहाबरोबर—बिस्मार्क बरोबर—लासालेने तडजोडीची बोलणी केली होती, आणि त्याने जर्मन लोकांना

र्वत्रिक मतदानाचा हक्क दिला तर ते त्याला त्याच्या राष्ट्रीय व परराष्ट्रीय धोरणात मदत करतील, असे आश्वासन दिले होते. हे जरी तेव्हा उघडकीस आले नव्हते तरी त्यांच्या दोस्तीची वस्तुस्थिती मार्क्सच्या तीक्ष्ण दृष्टीतून सुटली नव्हती.

याच वेळी रशियातील शेतकरी सरंजामशाहीविरुद्ध उठाव करीत होते. त्यांची ही जागृती व लढे युरोपियन क्रांतीला पोषक आहेत, हा संबंध मार्क्सने तावडतोब जोडला आणि त्यांना पाठिंबा दिला.

अमेरिकेतील यादवी युद्धाचे मार्क्सने अत्यंत महत्त्वाची आंतरराष्ट्रीय घडामोड म्हणून स्वागत केले. गुलामगिरीची समाजपद्धती व त्यामानाने पुढारलेली भांडवलदारी समाजपद्धती या दोहोतला हा झगडा आहे हे दाखवून मार्क्सने दोन्ही समाजपद्धतींची स्पष्ट शब्दांत तुलना केली. उत्तरेकडच्या संस्थानांना खराखुरा विजय लवकरात लवकर प्राप्त करून घ्यावयाचा असेल तर त्यांनी क्रांतिकारक पद्धतीने युद्ध चालविले पाहिजे, गुलामगिरीचा अंत केला पाहिजे; शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने शेतीचा प्रश्न सोडविला पाहिजे; सैन्याची पुनःसंघटना केली पाहिजे; त्यातील सर्व देशद्रोही लोकांना काढून टाकले पाहिजे आणि लोकशाही घोषणा उठवल्या पाहिजेत असा सल्ला मार्क्सने दिला. त्याबरोबरच गुलामगिरी कायम ठेवण्यासाठी लढणाऱ्या दक्षिण अमेरिकेतील संस्थानांना आपल्या सरकारकडून मदत दिली जाणार नाही, अशी खबरदारी घेण्याचा आदेश त्याने युरोपमधील कामगारांना दिला आणि खरोखरीच ब्रिटिश कामगारांनी प्रचंड निदर्शने करून दक्षिणेकडे आपल्या सरकारची मदत जाऊ दिली नाही.

या युद्धात योग्य बाजूला उभा राहिलेला युरोपातील कामगारवर्ग पुन्हा एकदा क्रांतीसाठी उठेल अशी अपेक्षा बांधून मार्क्स आपले अर्थशास्त्रावरील लेखन पूर्ण करण्याच्या मागे लागला.

## २५. "भांडवल"

"अर्थशास्त्राचे समालोचन" हा अर्थशास्त्रावरील अपूर्ण ग्रंथ पूर्ण करताना तयार झालेल्या नव्या ग्रंथाला मार्क्सने "भांडवल" हे नाव दिले. १८५९ मध्ये या कामात खंड पडल्यानंतर पुन्हा कामाला प्रारंभ करून १८६५ च्या अखेरीस त्याने ते पूर्ण केले; परंतु तेव्हाही ते कच्चे, भले जाडे हस्तलिखितच होते, त्यातून आजच्या स्वरूपाचे घडीव, घोटीव, सुंदर, "भांडवल" तयार करायला त्याला



फ्रेडरिक् एंगल्स

**मार्क्सचा परम मित्र, सहकारी**
**आणि साहाय्यकर्ता**

१८६६ च्या जानेवारीपासून १८६७ च्या मार्चपर्यंतचा वेळ लागला. अव्याहत व सर्वगामी तऱ्हेने कोणत्याही विषयाचा अभ्यास करण्याची, या ग्रंथनिर्मितीत दिसून आलेली त्याची कार्यपद्धती सर्व बुद्धिवंतांना एक उज्ज्वल आदर्श आहे. मध्यंतरी आजारीपणा, गरिबी, कर्ज व महत्त्वाची सार्वजनिक कामे यांची भर होतीच. पहिले पुस्तक पूर्ण करून स्वत: मार्क्स ते १८६७ च्या एप्रिलमध्ये हॅम्बुर्गला प्रकाशकाकडे घेऊन गेला. त्यानंतर फार काळ पत्र न लिहिलेल्या एका सहानुभूतिदाराला एक अतिशय सुंदर पत्र मार्क्सने लिहिले आहे, त्याच्या अखेरीस तो म्हणतो, " "मग तू म्हणशील की पत्राचे उत्तर का पाठविले नाही, तर त्याचे कारण असे की, मी एकसारखा मृत्यूच्या दारापर्यंत घिरट्या घालीत होतो आणि त्यामुळे मिळणारा प्रत्येक क्षण माझे पुस्तक संपविण्यासाठी खर्च करीत होतो. या पुस्तकासाठी मी माझी शरीरप्रकृती, माझे सुख व कुटुंब यांचा बळी दिला आहे...' व्यवहारदक्ष ' माणसांचे व त्यांच्या शहाणपणाचे मला फार हसू येते. आपले मन दगडासारखे असले तरच मानवजातीच्या दु:खाकडे दुर्लक्ष करून स्वत:च्या सुखाकडे लक्ष देता येते, परंतु ते तसे नसल्यामुळे पुस्तक पूर्ण न करता मी मरून गेलो असतो तर मी स्वत:ला फार अव्यवहारी समजलो असतो." मार्क्सच्या मनाची व जीवनाची घडण या पत्रात किती परिपूर्णतेने व्यक्त झाली आहे !

या पुस्तकाचा पहिला भाग म्हणजे क्रयवस्तू व पैसा या संबंधीचा पूर्वी लिहिलेला व तेव्हा काहीसा दुर्बोध असलेला विषय. जसा तो "भांडवला"त आहे अशाही अवस्थेत तो अजूनही कठीणच आहे; पण ज्यांना तो समजतो त्यांना तो फारच आवडतो.

दुसऱ्या भागापासून पुस्तक पुढे चालू होते. पहिला प्रश्न असा निर्माण होतो की पैशाचे रूपांतर भांडवलात कसे होते ? बाजारात जर समान मूल्यांची देवाण-घेवाण होते तर पैसेवाल्यांचा पैसा वाढतो कसा ? पैसा वाढतो याचे कारण असे की, आजच्या सामाजिक परिस्थितीत बाजारात अशी एक क्रयवस्तू असते की ती वापरली म्हणजे अधिक मूल्य निर्माण करते. ही क्रयवस्तु म्हणजे श्रम-शक्ती.

ही श्रमशक्ती जिवंत कामगाराच्या रूपाने वावरते. त्याच्या जीवनाला (व मुलाबाळांच्या पोषणाला) आवश्यक लागणाऱ्या वस्तूंच्या निर्मितीसाठी खर्ची पडणाऱ्या श्रमकाळाइतके मूल्य त्याच्या श्रमशक्तीबद्दल दिले जाते, पण मजूरीच्या

रूपाने कामगाराला मिळणाऱ्या या मूल्यापेक्षा अधिक मूल्य त्याची श्रमशक्ती विकत घेणारा मालक त्याच्या जवळून तयार करून घेतो. हे अतिरिक्त मूल्यच सतत, अखंडपणे भांडवलाची वाढ करते. हे मूल्य समाजातील वरच्या थरात विभागले जाते आणि त्याच्या आधारावर आजच्या सामाजिक जीवनाचा डोलारा उभारला जातो.

श्रमजीवी लोकांच्या श्रमाचा अपुरा मोबदला देऊन अतिरिक्त मूल्य स्वतः गिळंकृत करण्याची कारवाई मालक व श्रमिक असे वर्ग अस्तित्वांत आल्यापासूनच सुरू झाली आहे; पण भांडवलदारी उत्पादनपद्धतीत तिने कळस गाठला आहे.

अतिरिक्त मूल्यांचे दोन प्रकार आढळून येतात; केवळ अतिरिक्त आणि सापेक्ष अतिरिक्त. स्वतःच्या श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनासाठी लागणाऱ्या वेळेपेक्षा जास्त वेळ कामगारांकडून काम करून घेऊन भांडवलदार जो नफा कमावतो त्याला केवळ अतिरिक्त मूल्य म्हणता येईल. भांडवलदाराला त्याच्या मनाप्रमाणे वागायची मुभा दिली तर तो कामगारांना २४ तास काम करावयास लावून असे केवळ अतिरिक्त मूल्य त्याच्याकडून काढून घेईल. ज्यावेळी कामगाराच्या श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनासाठी लागणारा वेळ कमी व्हावा म्हणून नाना प्रकारच्या सुधारणा उत्पादनपद्धतीत घडवून आणल्या जातात, त्यावेळी (ठराविक वेळात) निर्माण होणाऱ्या नफ्याला सापेक्ष अतिरिक्त मूल्य म्हणता येईल. हे अतिरिक्त मूल्य कामगारांच्या श्रमातून निर्माण होते, ही वस्तुस्थिती भांडवलदारी उत्पादनपद्धतीत नेहमी लपविली जाते.

क्रयवस्तूची किंमत नेहमी पैशाने केली जाते आणि श्रमशक्तीच्या किंमतीबद्दल मजुरी दिली जाते. कामगाराने काम केल्यानंतर त्याला मजुरी दिली जाते त्यामुळे त्याच्या कामाचे त्याला पैसे मिळाले असा आभास उत्पन्न होतो. भांडवलदार फक्त काही तासांच्या श्रमाचे पैसे देतो आणि काही तासांच्या श्रमांचे देत नाही, ही वस्तुस्थिती संपूर्णपणे अज्ञात, अंधारात रहाते आणि भांडवलदारी समाज स्वातंत्र्याचा, लोकशाहीचा व दानधर्माचा भोक्ता म्हणून जगात मिरवतो.

भांडवलदारी उत्पादनपद्धतीत, अतिरिक्त मूल्याची (नफ्याची) निर्मिती सारखी होत रहाते आणि भांडवलदारांचे भांडवल वाढत जाते. भांडवलापासून नफा तयार होतो आणि पुन्हा नफ्यातून भांडवल तयार होते, असा चक्रवाढ वाढीचा क्रम सतत चालू रहातो. हा क्रम स्पष्ट करून मार्क्सने, सतत उद्योग, व्यवहारदक्षता, काटकसर इत्यादी गुणांनी भांडवलदार पैसे कमावतो आणि

आळस, बावळटपणा, उधळपट्टी व व्यसने इत्यादी दुर्गुणांनी कामगार दरिद्री बनतो, या भांडवलदारी प्रचारातील हास्यास्पदता दाखवून दिली.

भांडवलदारांचे भांडवल वाढत जाते त्याच वेळी, त्याच्याच बरोबर कामावर असलेल्या कामगारांच्या खांद्याला खांदा लावून बेकार कामगारांची राखीव फौज निर्माण होते. संपत्तीच्या वाढीबरोबर तिचीही वाढ होत जाते.

अशा रितीने दारिद्र्य, दुःख, गुलामी, पिळवणूक, अपमान व जुलूम यांच्या भाराखाली कामगारवर्ग वाढत असतानाच त्यांच्यात प्रक्षोभ निर्माण होतो; कामगारवर्गाची संख्येने व ज्ञानाने वाढ होते. तो एकत्रित येतो व संघटित होतो. भांडवलशाहीतून निर्माण झालेल्या मक्तेदारीमुळे उत्पादनाला खीळ बसू लागते. भांडवलदार व कामगार एकाच उत्पादन-पद्धतीत नांदणे अशक्य होते आणि भांडवलदारी उत्पादनपद्धतीची मृत्युघंटा वाजू लागते; मालकांची मालकी हिरावून घेतली जाते. भांडवलदारांच्या मालमत्तेवर समाजाची मालकी प्रस्थापित होते.

हे पहिले पुस्तक पूर्ण झाल्यानंतर मार्क्सने "भांडवल" या ग्रंथाचा दुसरा व तिसरा खंड लिहावयास घेतले; त्यासाठीही त्याने अव्याहत श्रम केले; परंतु मार्क्स मरण पावला तेव्हा ही दोन्ही पुस्तके हस्तलिखित स्वरूपातच होती. त्यांना व्यवस्थित करून प्रकाशनासाठी तयार करण्याचे काम पूर्ण होण्यापूर्वीच मार्क्स निधन पावला. १८६१ ते १८७८ पर्यंत मार्क्सने मेहनत करून तयार केलेली ही पुस्तके अपूर्ण असली तरी मार्क्सवादाचे शास्त्र विशिष्ट अवस्थेपर्यंत परिपूर्णतेला नेण्याचे श्रेय त्यांना पटकवता येईल इतकी ती महत्त्वाची आहेत.

कामगारांना अपूर्ण मोबदला देऊन तयार करून घेतलेला माल भांडवलदार जेव्हा बाजारात घेऊन जातो आणि त्याचा पुन्हा पैसा बनविण्याच्या खटपटीला लागतो तेव्हा त्याची कशी त्रेधातिरपीट उडते, याचे वर्णन "भांडवला" च्या दुसऱ्या पुस्तकात आहे. भांडवलदारी उत्पादनपद्धतीत येणाऱ्या "अरिष्टां" चे स्वरूप त्यात स्पष्ट करण्यात आले आहे आणि भांडवलदारी उत्पादनपद्धतीतील "अराजक" त्यात उघडे करण्यात आले आहे.

दुसऱ्या पुस्तकात, माल विकला जाईपर्यंत होणाऱ्या भांडवलाच्या हालचालींचे वर्णन केल्यानंतर मार्क्सने तिसऱ्या पुस्तकात अतिरिक्त मूल्याची वाटणी भांडवलदार व जमीनदारवर्गात नफा, व्याज व खंड या रूपांत कशी होते याचे रहस्य उलगडून दाखविले आहे. नफ्याचा सर्वसाधारण सरासरी दर कसा ठरतो व कसा घटत जातो याची फोड करून त्यातून भांडवलशाहीच्या विकासाबरोबर तिचे अंतर्विरोध

कसे तीव्र होत जातात, एका बाजूला भांडवलशाहीचे केन्द्रीकरण व मक्तेदारीची वाढ व दुसऱ्या बाजूला कामगारवर्गांचे दरिद्रीकरण व छोट्या भांडवलदारांचे व मध्यम वर्गाचे शोषणही कसे वाढत जाते, याचे मार्क्सने प्रतिभायुक्त विश्लेषण केले आहे.

" भांडवल " या ग्रंथाचे पहिले पुतक जरी कामगारवर्गात लोकप्रिय झालेले असले तरी दुसरे व तिसरे पुस्तकही भांडवलशाही समाजपद्धतीविषयीच्या कामगारांच्या ज्ञानाला व एकंदर कामगार चळवळीला अत्यंत उपयुक्त आहे. यात काहीच संशय नाही.

## २६. आंतरराष्ट्रीय श्रमिकांची संघटना

कामगारवर्गाच्या अंतिम व अपरिहार्य विजयाचे तत्त्वज्ञान निर्माण करून मार्क्सचे समाधान झाले नव्हते; कामगारवर्गाची लढ्यासाठी तयारी करणे हेहि त्याला तितकेच जिव्हाळ्याचे वाटत असे. " भांडवल " ( १ ले पुस्तक ) लिहिण्यात गुंतलेला असतानाच, किंबहुना ते काम काहीसे बाजूला सारूनच मार्क्सने कामगारवर्गाच्या आंतरराष्ट्रीय चळवळीचे मार्गदर्शन केले. " आंतरराष्ट्रीय श्रमिकांची संघटना " २८ सप्टेंबर १८६४ रोजी लंडनमध्ये भरलेल्या एका सभेत स्थापन झाली. अनुकूल राजकीय परिस्थिती आणि मार्क्ससारख्या कामगारवर्गाच्या धीरोदात्त विचारवंताचे पुढारीपण यामुळे या पहिल्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने पुष्कळ चिरस्थायी कार्य केले. या संघटनेची सर्व महत्त्वाची निवेदने मार्क्सने लिहिली; तिला लोकशाही संघटनेचे स्वरूप यावे म्हणून प्रयत्न केले; तिच्यासाठी अनेक तात्त्विक व व्यावहारिक संघर्ष केले.

या संघटनेच्या स्थापनेपासूनच मार्क्सला व एंगल्सला प्रुधाँचे फ्रान्समधील अनुयायी, ओवेनचे ब्रिटनमधील अनुयायी, मॅझिनीचे इटालीतील अनुयायी आणि लासालेचे जर्मनीतील अनुयायी यांच्याबरोबर सामना करावा लागला. ओवेनचे अनुयायी ट्रेड युनियन कार्य, कामगारांची निदर्शने, संप यांच्या विरुद्ध होते. भांडवलशाही नष्ट करण्याच्या कामगारवर्गाच्या राजकीय घोषणेचा तर त्यांना उच्चारही करवत नसे, प्रुधाँचे अनुयायी प्रत्यक्ष कामापेक्षा टोलेजंग कल्पनांच्या गप्पा मारण्यास पटाईत होते. त्यांना धर्माविरुद्ध युद्ध पुकारण्याचे महत्त्व सर्वात अधिक वाटत होते. झारने चालविलेल्या पोलंडच्या दडपशाहीचा निषेध त्यांना महत्त्वाचा वाटत नव्हता, कारण " राष्ट्र "ची कल्पना आता जुनी झाली आहे म्हणून राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या मागणीला अर्थ नाही, असल्या विचित्र

कल्पना ते मांडीत होते. त्यांना तोंड देऊन मार्क्सने दुसऱ्या व तिसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत, संपाच्या व टाळेबंदीच्या काळात बाहेरचे कामगार मालकांनी आणू नयेत; ८ तासांचा दिवस व्हावा; लहान मुलांचा कामाचा दिवस त्याहूनही लहान असावा आणि त्यांना व्यायाम व तांत्रिक शिक्षण मिळावे इत्यादी मागण्यांसाठी लढे करण्यासंबंधीचे ठराव मान्य करून घेतले. जर्मनीत लासालेच्या अनुयायांनी बिस्मार्कला जर्मनीचा उद्धारक मानण्यास सुरवात केली होती. त्यांच्या विरुद्ध लढा उभारून मार्क्स-एंगल्सनी तेथे आंतरराष्ट्रीय संघटनेला संलग्न अशा कामगारवर्गाच्या पक्षाची–जर्मनीच्या सोशलडेमोक्रॅटिक वर्कर्स पार्टीची–स्थापना केली. या तीन विरोधकांपेक्षा अधिक गोंधळ बाकुनिन व त्याच्या अनुयायांनी उडवून दिला. हे लोक पक्के अराजकवादी होते. या चारही मार्क्सविरोधकांची हातमिळवणी झाली; आणि त्यांनी आंतरराष्ट्रीय संघटनेच्या पुढारीपणाचे स्थान स्वतःच्या हातात घेण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यात त्यांना यश आले नाही,

या वेळी ब्रिटनच्या सुधारणावादी पुढाऱ्यांनी आयर्लंडच्या प्रश्नावर योग्य भूमिका घेतली नव्हती; मार्क्सच्या पुढाकाराखाली झालेल्या चर्चेनंतर आंतरराष्ट्रीय संघटनेने आयर्लंडच्या स्वातंत्र्यलढ्याला पाठिंबा दिला. आयर्लंडच्या स्वातंत्र्यप्राप्तीमुळे ब्रिटिश कामगारवर्गाची ताकद वाढेल, कारण त्यांच्यावर दडपण आणण्यासाठी आयरिश कामगारांचा उपयोग नंतर ब्रिटिश भांडवलदारांना करता येणार नाही, हे मार्क्सने स्पष्ट केले. त्याने सांगितले, “जे राष्ट्र दुसऱ्याला गुलामगिरीत ठेवते ते स्वतःही गुलाम बनते.” या चर्चेच्या वेळी मार्क्सने राष्ट्रीय व वसाहत राष्ट्रांच्या प्रश्नांचे स्वरूप, व त्यासंबंधातील कामगारवर्गाची भूमिका या प्रश्नांची मांडणी केली आणि भारत व चीनमधील स्वातंत्र्य-लढ्यांना पाठिंबा दिला; भांडवलदारी राष्ट्रीय राजकारणावर हल्ला केला आणि कामगारवर्गीय आंतरराष्ट्रीयवादाचे तत्त्व आग्रहपूर्वक पुढे आणले.

१८७०–७१ च्या फ्रेंच–प्रशियन युद्धात आंतरराष्ट्रीय संघटनेने फ्रेंच व जर्मन कामगारांना अत्यंत योग्य मार्गदर्शन करून राष्ट्रीय हिताचा व कामगार संघटना मजबूत करण्याचा रस्ता दाखविला. त्यामुळे १८ मार्च १८७१ रोजी पॅरिसमधल्या कामगारांनी क्रांती करून पॅरिस कम्युनची स्थापना करताच मार्क्सचा सल्ला मिळविण्याचा प्रयत्न केला. मार्क्सने नाना प्रकारांच्या मार्गांचा अवलंब करून त्यांच्या हातून चुका होऊ नयेत म्हणून इशारेवजा संदेश पाठविण्याचे प्रयत्न केले; परंतु वेढ्यात सांपडलेल्या कम्युनपर्यंत ते जाऊन पोहोंचणे फार कठीण

झाले. जगातील कामगारांनी या पहिल्या कामगारराज्याला मदत करावी म्हणून मार्क्सने हजारो पत्रे लिहून क्रांतीचे महत्त्व व स्वरूप त्यांना समजावून सांगितले. आंतरराष्ट्रीय संघटनेतर्फे तयार केलेल्या विनंति-पत्रात, मार्क्सने या क्रांतीचे मूल्यमापन केले; "फ्रान्समधील यादवी युद्ध" या नावाने प्रसिद्ध झालेली ही पॅरिस कम्यूनच्या अनुभवांचे निष्कर्ष ग्रथित करणारी पुस्तिका मार्क्सच्या इतर महत्त्वाच्या ग्रंथश्रेणीत शोभून दिसते. त्यात राज्ययंत्र व कामगारक्रांती या संबंधीच्या त्याच्या विचारांना भरीव व साधार स्वरूप प्राप्त झालेले आढळते.

पॅरिस कम्यूनच्या पराभवानंतर आंतरराष्ट्रीय संघटनेला कठीण दिवस आले. सर्व राष्ट्रांच्या भांडवलदारी सरकारांनी तिच्याविरुद्ध व मार्क्सविरुद्ध निंदानालस्तीची मोहीम सुरू केली. संघटनेत मतभेद निर्माण झाले. बाकुनिनच्या अनुयायांनी आतून संघटना पोखरण्यास प्रारंभ केला. कामगारवर्गाच्या पक्षाची, त्याच्या शिस्तीची काहीच गरज नाही, असा प्रचार त्यांनी सुरू केला. याच्या उलट पॅरिस कम्यूनच्या अनुभवाच्या आधारावर मार्क्स–एंगल्सनी राजकीय लढा सोडून देणे आत्मघातकी ठरेल हे दाखवून देऊन, समाजवादाच्या लढ्यासाठी कामगारांना आवश्यक असलेल्या क्रांतिकारक पक्षाची गरज आग्रहपूर्वक प्रतिपादन केली. आंतरराष्ट्रीय संघटनेने या भूमिकेला पाठिंबा देऊन, मालक वर्गाच्या सामुदायिक शक्तीविरुद्ध कामगारवर्गाची सामुदायिक वर्गशक्ती संघटित करण्याचा निर्णय घेतला. १८७२ मध्ये हेगमध्ये भरलेल्या परिषदेने हे निर्णय मान्य केले आणि त्यांना विरोध करणाऱ्या बाकुनिनची व त्याच्या अनुयायांची संघटनेतून हाकलपट्टी केली. या परिषदेत मार्क्सने प्रत्येक देशाच्या विशिष्ट परिस्थितीनुसार कामगारांची सत्ता स्थापन होईल; अमेरिका, इंग्लंड, हॉलंडमध्ये कदाचित् ती शांततेच्या मार्गाने होईल; परंतु इतरत्र क्रांतिकारक मार्गाचाच अवलंब करावा लागेल या विचारांवर जोर दिला.

हेग परिषद ही या पहिल्या आंतरराष्ट्रीय संघटनेची शेवटची परिषद ठरली. यानंतर बदललेल्या परिस्थितीनुसार, प्रत्येक देशात कामगारवर्गाच्या पक्षाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. आंतरराष्ट्रीय कामगारवर्गीय बाण्याच्या अनुभवाने विशाल बनलेली कामगार चळवळ व संघटना देशादेशात वाढीस लागल्या व त्यांची पाळेमुळे खोलवर रुजली; त्यांच्या परिसरात शेकडो कार्यकर्ते व पुढारी तयार झाले. मार्क्सचे घर कार्यकर्त्यांच्या येण्याजाण्याने गजबजून गेले. कामगारवर्गाचा महान् तत्त्ववेत्ता व नेता म्हणून मार्क्सला मान्यता प्राप्त झाली;

अर्थात् मतभेद, विरोध व क्वचित शत्रुत्व अशा आपत्तीही या काळातसुद्धा त्याला अगदीच अपरिचित होत्या असे नव्हे.

मार्क्सच्या कौटुंबिक परिस्थितीतही काहीसा बदल झाला. त्याच्या मुली आता मोठ्या झाल्या होत्या. त्या आईप्रमाणे सुंदर, आई-वडिलांप्रमाणे हुशार व कष्टाळू होत्या. आंतरराष्ट्रीय संघटनेच्या गडबडीच्या काळात संघटनेची नाना प्रकारची कामे या मुली आईच्या बरोबरीने घरचीच कामे समजून पार पाडीत असत. १८६६ मध्ये दुसरी मुलगी लॉरा व मार्क्सचा क्रांतिकारक अनुयायी लाफार्ग यांचा वाङ्निश्चय होऊन पुढे दोन वर्षांनी त्यांचा विवाह झाला. मार्क्सबद्दलच्या अत्यंत सुंदर आठवणी लाफार्गने लिहिल्या आहेत. १८७२ मध्ये मार्क्सची मोठी मुलगी जेनी हिचा विवाह चार्लस लॉंगे या पॅरिस कम्यूनच्या तरुण नेत्याबरोबर झाला. या दोघींच्या आयुष्यातील विवाहानंतरची पहिली काही वर्षे गरीबीशी सामना देण्यात गेली; तरी पुढे त्यांना आरोग्यसंपन्न, खेळकर व खोडकर मुले झाली. त्यांच्याबरोबर खेळण्यात मार्क्स-एंगल्सने घालविलेल्या आनंदाच्या काळातील अनेकांनी लिहून ठेवलेल्या आठवणीही अत्यंत हृदयंगम आहेत.

## २७. अखेरची दहा वर्षे

१८७३ ते १८८३ या मार्क्सच्या आयुष्यातील अखेरच्या १० वर्षांत "भांडवल" पुस्तक दुसरे व पुस्तक तिसरे ह्या दोन पूर्वी उल्लेख केलेल्या ग्रंथाखेरीज मार्क्सने केलेल्या लेखनात "गोथा कार्यक्रमावरील टीका" या पुस्तकाला फार महत्त्व आहे.

जर्मनीतील सोशल–डेमोक्रॅटिक वर्कर्स पक्षाने तेथील लासालेच्या पक्षाबरोबर संधिसाधुपणाने तडजोड करून गोथा येथे भरणाऱ्या पक्ष परिषदेसाठी जो कार्यक्रम तयार केला होता, त्यावर टीका करणारी पुस्तिका मार्क्सने १८७५ मध्ये प्रसिद्ध केली; तिच्या प्रासंगिक स्वरूपापेक्षा मार्क्सने तिच्यात कितीतरी नवे तात्त्विक प्रश्न चर्चेला घेतल्यामुळे तिला महत्त्व प्राप्त झाले आहे. भांडवलदारी समाजव्यवस्थेचा ऱ्हास आणि त्यानंतर उदयास येणाऱ्या साम्यवादी समाजव्यवस्थेचे स्वरूप याविषयी मार्क्सने तिच्यात विचार मांडले आहेत. भांडवलशाहीपासून समाजवादापर्यंत होणारे परिवर्तन व साम्यवादी समाजाच्या दोन अवस्था—समाजवाद व साम्यवाद —यांच्या बद्दलचे तर्कशुद्ध विचार मार्क्सने तिच्यात मांडले आहेत. साम्यवादाच्या पहिल्या अवस्थेत, आर्थिक परिपक्वता निर्माण झालेली नसताना, 'कामाप्रमाणे

दाम ' हे तत्त्व लागू राहील; पुढे बौद्धिक व शारीरिक श्रमांची विभागणी नष्ट झाल्यावर, जगण्यासाठी श्रम करण्याऐवजी आयुष्यातील महत्त्वाची गरज म्हणून माणूस श्रम करू लागल्यानंतर आर्थिक शक्तींचा विकास होऊन सहकारी संपत्तीचे झरे जोमाने उसळून आल्यानंतर, समाजाच्या निशाणावर पुढील घोषणा लिहिली जाईल—" प्रत्येकाकडून त्याच्या कुवतीप्रमाणे काम आणि त्याच्या गरजेप्रमाणे सर्व वस्तूंचा पुरवठा ". सर्वांना परिचित असलेल्या या विचारांची मांडणी मार्क्सने या पुस्तिकेच्या निमित्ताने प्रथमच केली. कोणताही प्रासंगिक महत्त्वाचा विषय असो, त्याला मार्क्सच्या प्रतिभाशाली लेखणीच्या प्रभावाखाली कसे चिरस्थायी मूलभूत व तात्त्विक स्वरूप प्राप्त होत असे याचा हा उत्कृष्ट पुरावा आहे.

ड्युहरिंग नावाच्या जर्मन प्राध्यापकाने लिहिलेल्या " समाजवादी पद्धती " या ग्रंथावर टीका करताना एंगल्सने " अँटी–ड्युहरिंग " नावाचा ग्रंथ लिहिला. या लेखनात मार्क्सने सहकार्य केले असून मार्क्सवादी विचारांच्या भांडारातील ते एक अमोल रत्न आहे. त्याचे स्वरूप मुख्यत: तात्त्विक असून विरोधात्मक व ऐतिहासिक भौतिकवादाच्या तत्त्वाची चर्चात्मक सुंदर मांडणी त्यात आढळते. हे पुस्तक १८७७ साली प्रसिद्ध झाले.

मार्क्स आता ६० वर्षांचा झाला होता. सतत परिश्रम व गरीबीतील हालअपेष्टांमुळे त्याची प्रकृती खालावली होती. १८८१ साली जेनी खूपच आजारी झाली. आणि अखेरीस तिला कॅन्सर झाला असल्याचे डॉक्टरांना अढळून आले. आणि त्याच वेळी प्लुरसी, ब्रॉन्काइटिस व न्युमोनिया या विकारांनी मार्क्स स्वत: अतिशयच आजारी पडला. त्यावेळी त्याची धाकटी मुलगी एलेनॉर व हेलेन डेमुथ यांच्या शुश्रुषेमुळे तो मृत्यूच्या दाढेतून बाहेर आला. त्या प्रसंगाचे वर्णन करताना एलेनॉरने लिहिले आहे : " पुढच्या मोठ्या खोलीत आईचा बिछाना होता आणि जवळच्या लहान खोलीत मूर ( मार्क्स ) होता. ज्यांची आयुष्ये संपूर्णपणे एकमेकात मिसळून गेलेली होती असे हे दोघे आता एका खोलीत नव्हते. मूरने आजारातून डोके वर काढले. ज्या दिवशी त्याला उठून आईच्या खोलीत येता आले, त्या दिवसाची ती सकाळ मी कधीच विसरणार नाही. जणु काही ते दोघे पुन्हा तरुण झाले होते; ती त्याची प्रेयसी होती आणि तिच्या प्रेमात सापडलेला तो तरुण होता–नव्या जीवनाची वाटचाल करण्यास ते निघत होते, आजारीपणाने अशक्त बनलेला वृद्ध आणि मरणोन्मुख वृद्धा एकमेकांचा अखेरचा निरोप घेत आहेत असे कोणालाच वाटले नसते. "

१८८१ च्या २ डिसेंबरला मार्क्सची प्रिय पत्नी जेनी मरण पावली तेव्हा तो स्वत:सुद्धा इतका अशक्त झालेला होता की तिच्या प्रेतयात्रेच्या वेळी तो दफनभूमीपर्यंत जाऊ शकला नाही. तिच्या इच्छेप्रमाणे कोणताही बाह्य देखावा न करता, कसलेही संस्कार न करता तिचे अखेरचे विधी उरकण्यात आले. तिच्या मृत्यूचे वर्णन मार्क्सच्या शब्दांत सांगायचे म्हणजे, " कोणत्याही प्रकारचा त्रास न होता तिला हळूच झोप लागली; अखेरपर्यंत तिचे डोळे टपोरे, तेजस्वी व सुंदर दिसत होते. तिला अखेरचा निरोप देताना एंगल्सने स्मशानभूमीत भाषण केले आणि तिला पुष्पांजली अर्पण केली. जेनी मार्क्सची स्तुती शब्दांनी करण्यासारखे शब्द त्याला शोधून काढणे कठीण गेले. "

जेनीच्या मृत्यूच्या वेळी एंगल्स म्हणाला, " आज मूर पण मरण पावला आहे. " त्यानंतर एकाच वर्षाने, १४ मार्च १८८३ रोजी मार्क्सने या जगाचा अखेरचा निरोप घेतला.

या काळातही हवा बदलण्याचे, प्रकृती सुधारण्याचे आणि राहिलेले " भांडवला " चे काम पूर्ण करण्याचे त्याचे प्रयत्न चालूच राहिले. या अखेरच्या दिवसांत त्याच्यावर त्याच्या मोठ्या मुलीच्या मृत्यूची दुर्धर बातमी ऐकण्याचा प्रसंग आला आणि त्याला परम दु:ख झाले. १४ मार्च १८८३ रोजी लंडनमधील स्वत:च्या अभ्यासिकेत खुर्चीवर बसल्या बसल्या त्याला अचानक मृत्यू आला. एंगल्सने वर्णन केल्याप्रमाणे; " त्या दिवशी जगातील एका सर्वश्रेष्ठ विचारवंताची विचारक्रिया थांबली; आणि जगातील एका अत्यंत कणखर हृदयाचे स्पंदन बंद पडले. " स्मशानभूमीतील भाषणाच्या अखेरीस एंगल्स म्हणाला :

" युगानुयुगे मार्क्सचे नांव जिवंत राहील ! युगानुयुगे मार्क्सचे कार्य जिवंत राहील ! ! "

मार्क्सच्या या अल्प-परिचयाचा शेवट करायला यापेक्षा अधिक समर्पक असे दुसरे कोणते शब्द मिळतील ?

## २८. उपसंहार

मार्क्स हा मुख्यत: राजकारणी पुरुष असल्यामुळे त्याचा परिचय करून देताना त्याच्या जीवनाच्या त्या भागावर अधिक लक्ष केंद्रित होते आणि त्यामुळे तो अत्यंत गंभीर, निरस, अरसिक माणूस असावा, असा कदाचित् समज होण्याचा संभव आहे. परंतु मार्क्स याच्या अगदी उलट होता. तो अत्यंत विनोदप्रिय,

खेळकर, रसिक व उत्साही होता. त्याच्या मित्रमंडळीची, स्नेहीसोबत्यांची व चहात्यांची संख्या फार मोठी होती आणि मार्क्सच्या सहवासात घालविलेल्या काळाबद्दलच्या अत्यंत सुखद आठवणी त्यांच्यापैकी बहुतेकांनी जतन केल्या आहेत.

त्याची कुटुंबीय मंडळी रविवारच्या संध्याकाळची वाट पहात असत. त्या संध्याकाळी मार्क्स कामधंदा बाजूला ठेवून सुटी घेत असे. विनोदप्रियता व पोटभर हसणे हे मार्क्सच्या स्वभावातील विशेष गुण होते. त्याच्या मुलींचा तर तो मित्रच होता. दूरवरच्या फेरफटक्यात त्यांना चालण्याचे श्रम जाणवू नयेत म्हणून तो त्यांना असंख्य गोष्टी सांगत असे. तो अत्यंत प्रेमळ पिता होता. किंचित् सावळा वर्ण, पिंगट केस व दाढी या त्याच्या रूपाला साजेसे " मूर " ( पठाण ) हे टोपण नाव त्याच्या मुलींनी त्याला बहाल केले होते. कम्युनिस्ट लीगचे सभासद मात्र त्याला तो ३० वर्षांचा होण्यापूर्वीपासूनच " पिताजी " म्हणत असत; सर्वच बाबतीत मार्क्सच्या विचारांत विचक्षणा असे. आपण पूर्वी पहिल्याप्रमाणे त्या काळचे अर्थशास्त्र त्याने उलटेपालटे करून टाकले; " भांडवलदार आहेत म्हणून कामगार जगतात " असे म्हणणाऱ्या जगाला त्याने सांगितले, " कामगार असतात म्हणून भांडवल निर्माण होते, जगते, वाढते. " त्या काळचे तत्त्वज्ञानही त्याने उलटेपालटे करून टाकले. " विचार आहेत म्हणून जग आहे, " असे म्हणणाऱ्या तत्ववेत्त्यांना त्याने सांगितले, " जग आहे म्हणून विचार आहेत. " त्याचप्रमाणे आईबाप व मुले यांच्या बद्दलही त्याचे विचार असेच जगावेगळे होते; तो म्हणत असे—" मुलांनी आपल्या आईवडिलांचे शिक्षण केले पाहिजे. "

कादंबऱ्या, कविता व शेक्सपिअरची नाटके वाचण्याची मार्क्सला खूप आवड होती. शास्त्रीय लेखनाच्या व वाचनाच्या मध्यंतरीच्या विश्रांतीच्या वेळात तो मोठ्या रसिकतेने ललित वाङ्मयाचे वाचन करीत असे. एका वेळी ३–४ पुस्तके वाचण्यास प्रारंभ करून ती एकदम संपवायची अशी त्याची वाचनाची विलक्षण रीत होती. त्याला युरोपमधील बहुतेक सर्व भाषा येत होत्या; आणि जर्मन, फ्रेंच व इंग्रजी भाषेत तो उत्कृष्टपणे लिहू शकत असे. " जीवनाच्या लढाईत परकीय भाषा हे एक हत्यार असते, " असे तो म्हणत असे. वयाच्या ५० व्या वर्षी काही महत्त्वाची कागदपत्रे वाचण्यासाठी त्याने रशियन भाषा शिकण्यास प्रारंभ केला. ६ महिन्यांच्या आतच पुश्किन, गोगोल यांचे साहित्य वाचण्यास त्याने सुरुवात केली.

इतिहासाप्रमाणेच गणिताचाही त्याला छंद होता. जेनीच्या अखेरच्या आजारीपणात इतर कशातही लक्ष लागेना तेव्हा तो गणितात मन घालून बसत

असे. त्या काळात त्याने " इन्फिनिटेसिमल कॅल्क्युलस " वर लिहिलेला लेख फार महत्त्वाचा आहे, असे त्या विषयावरील तज्ज्ञांचे मत आहे.

असामान्य बुद्धिमत्ता व आत्यंतिक मेहनत यांचा संगम म्हणजे मार्क्सचे व्यक्तिमत्व असे म्हणता येईल. पण त्यात आणखी एका गुणाची भर टाकली पाहिजे; मार्क्सचे मानवजातीवर नितांत प्रेम होते; " जगासाठी काम करा " हा त्याचा संदेश होता. शास्त्रज्ञ अगर विद्वान हा केवळ पुस्तकी पंडित नसावा हा त्याचा आग्रह असे. मार्क्स म्हणत असे, " शास्त्र हे केवळ स्वतःच्या सुखासाठी वापरू नका···ज्ञान मिळविण्याचे भाग्य ज्यांना लाभले, त्यांनी त्या ज्ञानाचा उपयोग मानवजातीच्या कल्याणासाठी केला पाहिजे. "

मार्क्सबद्दलच्या अशा आठवणी अनंत आहेत; त्याच्या व्यक्तिमत्वाचे असंख्य विलोभनीय पैलू आहेत; त्याबद्दल अनेक पुस्तके लिहिली जात आहेत; त्यांचा सर्वांचा समावेश या पुस्तकांत होणे शक्य नव्हते, इतकेच येथे सांगावयाचे आहे.

जाता जाता, आणखी एका गोष्टीचा इथे उल्लेख होणे आवश्यक आहे, ती म्हणजे मार्क्स–एंगल्स यांची मैत्री ! या दोघांच्या स्नेहाच्या, वैचारिक समगुणाच्या व सहकार्याच्या अनेक हृदयंगम कथा निर्माण झाल्या आहेत. मार्क्सच्या जीवनात एंगल्सला जे अनन्यसाधारण स्थान होते, त्याचे चित्र जितक्या स्पष्टपणे द्यावयास पाहिजे तितके ते या पुस्तकात आलेले नाही. मार्क्सच्या या चरित्राच्या पाठोपाठ प्रसिद्ध होणार असलेल्या एंगल्सच्या चरित्रात ही कमतरता भरून निघेल असे आश्वासन देऊन कार्ल मार्क्सचा हा अल्प परिचय पूर्ण करीत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# कार्ल मार्क्सच्या जीवनातील ठळक प्रसंग

| | |
|---|---|
| १८१८ मे ५ | ट्रीयर येथे जन्म. |
| १८३५ | ट्रीयर येथे प्रवेश परीक्षा पास. |
| १८३५–३८ | बर्लिन विश्वविद्यालयात इतिहास, तत्त्वज्ञान व वाङ्मय यांचा अभ्यास. |
| १८४१ | मार्क्स आपला प्रबंध ( थिसिस ) येना विश्वविद्यालयात सादर करतो. ' डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ' ही पदवी मिळवितो. |
| १८४२ | कोलोन् येथील ' ऱ्हाइनिशे त्सायटुंग ' चा संपादक. एंगल्सशी प्रथम भेट. |
| १८४३ | जेनी फॉं वेस्टफालेन्शी विवाह. |
| १८४३–४४ | पॅरिस येथे जर्मन–फ्रेंच वार्षिक पत्राचे संपादन. मार्क्स-एंगल्सच्या मैत्रीचा व वाङ्मयीन व क्रांतिकारक सहकार्याचा प्रारंभ. |
| १८४५ | पॅरिसहून हद्दपार—ब्रुसेल्सकडे प्रयाण. मार्क्स–एंगल्स यांच्या '**पवित्र कुटुंब**' या ग्रंथाचे प्रकाशन. '**जर्मन विचारधारा**' चे लेखन. |
| १८४७ | '**तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य**' या ग्रंथाचे प्रकाशन. |
| १८४५ नोव्हें. | मार्क्स व एंगल्स लंडनमध्ये ' कम्युनिस्ट लीग ' च्या दुसऱ्या परिषदेत भाग घेतात–कम्युनिस्ट जाहिरनामा तयार करण्याचा त्यांना परिषदेचा आदेश. |
| १८४८ फेब्रु. २४ | '**कम्युनिस्ट जाहिरनाम्या**'चे प्रकाशन. कोलोनहून "नॉये ऱ्हाइनिशे त्सायटुंग" चे प्रकाशन सुरू—जर्मन क्रांती. |
| १८४९ | जर्मनीतून हद्दपार. |
| १८५० | "**कम्युनिस्ट लीगच्या मध्यवर्ती कमिटीचा जाहीरनामा**"—मार्क्स व एंगल्स. |

| | |
|---|---|
| १८५० | " नॉये ऱ्हाइनिशे त्सायटुंग–राजकीय–आर्थिक समालोचन " याचे ६ अंक प्रसिद्ध होतात–त्यात " **फ्रान्समधील वर्ग–लढे, १८४८–५०**" व एंगल्सचे " **जर्मनीतील शेतकरी युद्ध** " हे ग्रंथ क्रमशः प्रसिद्ध झाले. |
| १८५१ | ' न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून ' या अमेरिकन पुरोगामी वर्तमान–पत्रासाठी खास वार्ताहर म्हणून नेमणूक. "**जर्मनीतील क्रांती व प्रतिक्रांती** " ही लेखमाला याच पत्रात प्रसिद्ध झाली. |
| १८५२ | " **लुई बोनापार्टची १८ वी ब्रुमेर** " हा मार्क्सचा ग्रंथ अमेरिकेत निघणाऱ्या ' रेव्होल्यूशन ' या जर्मन पत्रात क्रमशः प्रसिद्ध झाला. |
| १८५३ | "**कोलोनच्या कम्युनिस्ट खटल्याचा रहस्य-स्फोट**" हे मार्क्सचे पुस्तक अमेरिकेत प्रसिद्ध झाले. " **भारतातील ब्रिटिश सत्तेचे भावी परिणाम** " हा लेख न्यूयॉर्क ट्रिब्यूनमध्ये प्रसिद्ध झाला. |
| १८५७–५९ | "**भारताच्या स्वातंत्र्यसमरा**"विषयी मार्क्सची लेखमाला ' ट्रिब्यून ' मध्ये प्रसिद्ध. |
| १८६० जून | मार्क्सचा ग्रंथ ' **अर्थशास्त्राची मीमांसा** ' प्रसिद्ध. |
| १८६३–६५ | " **भांडवल** " या ग्रंथाचे काम. |
| १८६४, २८ सप्टें. | आंतरराष्ट्रीय श्रमिक संघाची (पहिल्या इंटरनॅशनलची) स्थापना. |
| १८६६ जाने. ते १८६७ मार्च | ' **भांडवल** ' ग्रंथाचा पहिला खंड मुद्रणासाठी तयार. |
| १८६७, १४ सप्टें. | ' **भांडवल** ' प्रथम खंड प्रकाशित. |
| १८६८ | ' **भांडवल** ' खंड २ व ३ यावरील मार्क्सचे काम थेट मृत्यूपर्यंत चालले. |

१८७० फ्रान्स व प्रशिया यांच्यात युद्ध चालू असता पहिल्या इंटर-नॅशनलमार्फत मार्क्सने फ्रेंच व जर्मन कामगारांना उद्देशून दोन जाहिरनामे प्रसिद्ध केले.

१८७१ १८ मार्च रोजी पॅरिसच्या कामगारांनी राज्यसत्ता काबीज करून 'पॅरिस कम्यून' स्थापन केले व काही काळ टिकवले. या घटनेचे ऐतिहासिक महत्त्व दाखवून देणारी मार्क्सची पुस्तिका "**फ्रान्समधील यादवी–युद्ध**"—प्रकाशन ३० मे.

१८७५ "**गोथा कार्यक्रमाची चिकित्सा**"—मार्क्स.

१८७८ एंगल्सचा ग्रंथ "**ॲंटि–ड्युहरिंग**" प्रकाशित.

१८८१, डिसें. २ जेनी मार्क्सचे निधन.

१८८३, जाने. ११ मार्क्सची ज्येष्ठ कन्या जेनी लॉंगेचे निधन.

१८८३, मार्च २४ कार्ल मार्क्सचा मृत्यु.

१८८५ 'भांडवल' खंड २ एंगल्सने प्रकाशित केला.

१८९४ 'भांडवल' खंड ३ एंगल्सने प्रकाशित केला.

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ४९५८५ वि: चरित्र
७८३५ दि: २।३।६८

REFBK-0014527